CMYK

४२ वा वर्धापन दिन

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, ९ ऑगस्ट २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २५२ । पाने १२+८+८ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कामगार विभागातील चार अधिकारी निलंबित

**मुंबई :** खासगी सुरक्षारक्षकांच्या आरोग्य तपासणीसाठी काढण्यात आलेली ५० कोटींची निविदा पाच वर्षांपर्यंत वाढवून ती २५० कोटींपर्यंत नेण्यासाठी कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याप्रकरणी कामगार विभागातील चार अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. यामध्ये उपायुक्त अशोक डोके यांचाही समावेश असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन यांच्याकडे ही चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठीचा प्रस्ताव कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला आहे.

### प्रवासी बस उलटून सात ठार

**चंबा:** हिमाचलच्या चंबा जिल्ह्यात शनिवारी सकाळी मोठा बस अपघात झाला. तीसा-बैरगढ रस्त्यावरील चालुज वळणाजवळ प्रवाशांनी भरलेली बस अचानक उलटली. या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला, तर ११ प्रवासी जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही बस बैरगढहून चंबाकडे जात असताना पाच किलोमीटर अंतरावर अचानक उलटली. अपघाताच्या वेळी बसमध्ये १८ जण होते. अपघातानंतर लगेचच गावकरी आणि स्थानिक रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेत तात्काळ मदत व बचाव कार्य सुरू केले.

### कर्नाटकात पंधरा बांगलादेशी पकडले

**बंगळुरू:** बंगळुरमध्ये बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी शनिवारी शोधमोहीम राबवत पंधरा बांगलादेशी नागरिकांना अटक केली. इलेक्ट्रॉनिक सिटी परिसरात पोलिसांनी १,९०९ लोकांच्या कागदपत्रांची तपासणी केली, त्यापैकी १५ जण बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. उर्वरित व्यक्तींची कागदपत्रे वैध असल्याचे आढळले. या तपासासाठी २९५ पोलिस कर्मचाऱ्यांची तेवीस स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. ■

# सीमेवर प्रकल्पांसाठी कठोर नियम

■ पाकिस्तान, चीन, बांगलादेशलगतच्या सीमेसाठी निर्देश ■ कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

सीमावर्ती भागाच्या ५० किमीच्या आत असलेल्या प्रकल्पांना यापुढे गृह मंत्रालयाची मंजुरी घेणे आवश्यक राहणार आहे. यामध्ये विशेषतः पाकिस्तान, चीन किंवा बांगलादेशशी संबंधित सीमांचा समावेश असेल. सीमा सुरक्षा मजबूत करण्यासाठी सरकारने नवे नियम जारी केले आहे, याशिवाय प्रकल्पात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

सीमावर्ती भागात उभारल्या जाणाऱ्या कोणत्याही सौर, पवन किंवा हायब्रीड प्रकल्पासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाची मंजुरी आवश्यक असेल. याव्यतिरिक्त, गृह मंत्रालयाने सीमावर्ती भागातील सौर ऊर्जा किंवा इतर ऊर्जा-संबंधित प्रकल्पांवर काम करणारे अभियंते, कर्मचारी आणि कामगारांबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. पाकिस्तान, चीन किंवा बांगलादेशशी संबंध असलेली कोणतीही व्यक्ती जी सीमावर्ती भागात अभियंता किंवा इतर कर्मचारी म्हणून काम करत असेल, तिला केंद्र सरकारची परवानगी आवश्यक असेल. राष्ट्रीय सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर ही मार्गदर्शक तत्त्वे जारी केल्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे. सीमावर्ती भागात उभारल्या जाणाऱ्या सौर, पवन आणि हायब्रीड ऊर्जा प्रकल्पांसाठीचे अर्ज नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाकडे सादर केले जातील. त्यानंतर ही फाईल गृह मंत्रालयाकडे जाईल, जिथे सुरक्षा मंजुरी दिली जाईल. त्यानंतर संरक्षण मंत्रालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळवले जाईल. कोणताही अर्ज थेट गृह मंत्रालय किंवा संरक्षण मंत्रालयाकडे सादर केला जाणार नाही.

(वृत्तसंस्था)


सीमावर्ती भागात उभारले जाणारे सौर प्रकल्प

#### बांधकामासाठी कडक नियम

नियंत्रण रेषा आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषा भागात कोणत्याही बांधकामाची उंची निश्चित करण्यात आली आहे. जर बांधकाम नियंत्रण रेषेपासून आठ किलोमीटर अंतरावर केले जात असेल, तर त्याची उंची तीन मीटर असेल. जर अंतर आठ ते वीस किलोमीटरच्या दरम्यान असेल, तर उंची पाच मीटर असेल. जर अंतर वीस ते पन्नास किलोमीटरच्या दरम्यान असेल, तर इमारतीची उंची १५ मीटरपर्यंतच ठेवावी लागेल. ■

#### पडताळणीसाठी विशेष पोलिस चौकी स्थापन

प्रकल्पाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर देखरेख ठेवण्यासाठी आणि त्यांची पडताळणी करण्यासाठी एक विशेष पोलिस चौकी स्थापन केली पाहिजे. प्रकल्पाला भेट देणाऱ्या परदेशी नागरिकांवर देखरेख ठेवली जाईल. सीमावर्ती भागातील प्रकल्पातील कर्मचाऱ्यांची पोलिस पडताळणी करणे आवश्यक असेल. सुरक्षेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आल्यास प्रकल्पाला परवानगी दिली जाणार नाही. ■

#### पवनचक्कीला वगळले

हा नियम पवनचक्कीसारख्या प्रकल्पांना लागू होणार नाही. सीमावर्ती भागातील एक किलोमीटरचा परिसर कठोरपणे प्रतिबंधित असेल. तेथे कोणत्याही प्रकारच्या उपक्रमाला किंवा प्रकल्पाला परवानगी दिली जाणार नाही. एक किलोमीटर ते पन्नास किलोमीटरपर्यंत सुरक्षा मंजुरी किंवा एक किलोमीटर ते वीस किलोमीटरपर्यंत नाहरकत प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी गृह मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालयाची असेल. ■



## युवाशक्ती भारताची ताकद

### प्रयागराजमध्ये राहुल गांधींनी तरुणांशी साधला संवाद

**प्रयागराज, ८ ऑगस्ट**

आज मी तुमच्याशी दुःख, आकडेवारी (डेटा) आणि संपत्तीबाबत बोलण्यासाठी आलो आहे. भारतात जगातील सर्वांत मोठी युवाशक्ती आहे. हीच देशाची ताकद, देशाचा अभिमान आहे. आपण अमेरिका, रशिया आणि चीनबद्दल बोलतो. भारताच्या तरुणाईपुढे हे सर्व काहीच नाही, असे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले. प्रयागराजमध्ये शनिवारी 'स्कूल की गुंज' या कार्यक्रमात ते बोलत होते.

राहुल गांधी पुढे म्हणाले, विद्यार्थी शिक्षण घेतात, शिक्षणावर पैसे खर्च करतात. परंतु, भारतात रोजगाराचे सर्व मार्ग बंद झाले आहेत, ही एक गंभीर समस्या आहे. आज जग 'मेड इन चायना', 'मेड इन बांगलादेश' बघते. पण तुमचे 'मेड इन इंडिया' नाही. याचे कारण नोटबंदी आणि जीएसटीची अंमलबजावणी आहे. यामुळे व्यावसायिकांना मोठे नुकसान झाले आहे. सरकारी नोकरीच्या जाहिराती फुटतात. आज देशातील दर हजार तरुणांपैकी केवळ १२ जणांना कायमस्वरूपी नोकरी मिळते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

(वृत्तसंस्था)

## नंदुरबारमध्ये ५३ बालकांवर चार वर्षांपासून अत्याचार

### ६४९ व्हिडीओ क्लिप्स

### ११०० हून अधिक फोटो जप्त

**नंदूरबार, ८ ऑगस्ट**

नंदुरबार शहरात एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. गत चार वर्षांपासून अल्पवयीन बालकांवर अत्याचार करणाऱ्या एका नराधमाचा कारनामा उघडकीस आला आहे. कोणत्याही तक्रारीची वाट न पाहता नंदुरबार पोलिसांनी स्वतःहून सुमोटो दाखल करत या प्रकरणाचा छडा लावत आरोपीला अटक केली आहे.

तपासादरम्यान तब्बल ५३ बालकांवर अत्याचार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून आरोपीकडून ६४९ हून अधिक व्हिडिओ आणि ११०० पेक्षा जास्त फोटो जप्त केले आहे.

विशेष म्हणजे, या प्रकरणाची कोणतीही तक्रार दाखल नसताना पोलिसांनी स्वतःहून 'सुमोटो' गुन्हा नोंदवला आणि तपासाचे चक्र फिरवले.

तपासात आरोपीच्या मोबाईल आणि डिजिटल उपकरणांमधून ५३ हून अधिक बालकांवरील अत्याचाराचे ६४९ व्हिडिओ आणि ११०० पेक्षा जास्त फोटो पोलिसांच्या हाती लागले आहेत.

पोलिस सध्या आरोपीची कसून चौकशी करत असून या डिजिटल पुराव्यांच्या आधारे पीडित बालकांची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. आरोपीच्या या कृत्यामागील मानसिक विकृती पाहून संपूर्ण समाजमन सुन्न झाले असून सामाजिक कार्यकर्त्यांनी या नराधमास कठोरात कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे.

(तभा वृत्तसेवा)

### एफसीआरए विधेयकाला आमचा विरोध : सुळे

**मुंबई :** एफसीआरए विधेयकाचा जो मसुदा तयार करण्यात आला आहे, त्याला आमचा विरोध आहे, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी जाहीर केले. त्या म्हणाल्या, राष्ट्रवादी काँग्रेस आणि समाजवादी पक्ष या विधेयकाला विरोध करत आहेत. सरकारने घाई करू नये. हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले पाहिजे. परिसीमन विधेयक अद्याप मांडलेच नाही. जेव्हा हे विधेयक सादर केले जाईल, तेव्हा त्यावर इंडिया आघाडीमध्ये चर्चा होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) सर्व खासदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटणार, या चर्चेवर खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, ही भेट दिवसाढवळ्या होणार आहे. शुक्रवारी लोकसभेतील अनेक खासदारांशी चर्चा झाली. महाराष्ट्रातील खासदारांना मदतीसाठी निधी मिळत नव्हता, त्यामुळे आम्ही पंतप्रधानांशी बोलून त्यांना भेटण्यासाठी औपचारिक भेटीची वेळ मागितली. ■

## फुटीर खासदार मोदींना का भेटले ?

### उद्धव ठाकरेंना पोटशूळ; पत्रकार परिषदेत आरोप

**मुंबई, ८ ऑगस्ट**

राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडणारे उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा पोटशूळ उठल्याचे पाहायला मिळत आहे. राजधानी दिल्लीत शिवसेनेच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन संवाद साधल्यानंतर ठाकरे गटाचा जळफळाट झाला आहे. विरोधकांवर टीका करण्यासाठी कुठलाही मुद्दा उरला नसल्याने, आता पंतप्रधान आणि खासदारांच्या अत्यंत स्वाभाविक अशा कौटुंबिक व राजकीय भेटीवरही ठाकरेंनी संताप व्यक्त केला आहे.

मुंबईत घाईघाईने घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठाकरेंनी पुन्हा एकदा त्यांच जुनाच 'गद्दार' आणि 'सुनावणी'चा पाढा वाचत सर्वोच्च न्यायालय, अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस तोंडसूख घेतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेच्या खासदारांशी ब्रेकफास्ट डिप्लोमसी अंतर्गत चर्चा केली आणि 'चिंता करू नका, मी तुमच्यासोबत आहे' असा धीर दिला.

परंतु, यावरून राजकीय नैराश्य आलेल्या उद्धव ठाकरेंनी थेट पंतप्रधानांच्या या आश्वासनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हा संदेश नेमका कोणासाठी? सर्वोच्च न्यायालयाला धमकी देण्यासाठी की अमित शाह आणि फडणवीस यांच्यासाठी? असा बाष्कळ सवाल ठाकरेंनी उपस्थित केला.

(तभा वृत्तसेवा)

#### सहानुभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न

पत्रकार परिषदेत बोलताना ठाकरेंनी देशातील 'जेन-झी' आंदोलनाचा हवाला देत केंद्र सरकारवर निष्फळ आरोप करण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधान आणि गृहमंत्री तरुणांना भेटत नाहीत, पण खासदारांना भेटतात अशी कोडी मांडत त्यांनी राजकीय सहानुभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. वास्तविक, महायुती भक्कमपणे काम करत असताना आणि कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जात असताना, ठाकरे मात्र जनतेच्या न्यायालयात जाण्याच्या बाता मारत 'गद्दारीचा व्हायरस' पसरल्याची आवई उठवताना दिसले. ■



### स्वातंत्र्यदिनापूर्वी मुंबईत बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी

**मुंबई, ८ ऑगस्ट**

१५ ऑगस्टपूर्वी मुंबईवर हल्ला करण्याची धमकी देणारा एक ई-मेल महापौर रितू तावडे यांना मिळाला. ई-मेल पाठवणाऱ्याची ओळख अद्याप पटली नसून, पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांनी मुंबईत सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे.

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांना, खलिस्तान समर्थक असल्याचे सांगत शुक्रवारी एक ई-मेल आला. त्यात १५ ऑगस्टपूर्वी शहरात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली. महापौर कार्यालय, मुंबई मेट्रो, शाळा आणि शेअर बाजाराच्या इमारतीत स्फोट घडवणार असल्याचे त्यात नमूद होते. या ई-मेलमध्ये अनेक खलिस्तान समर्थकांची नावेही आहेत. हा ई-मेल कोणी पाठवला हे अद्याप स्पष्ट झालेले नसल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांनी महत्त्वाच्या ठिकाणांवर व्यापक बंदोबस्त लावला असून, खबरदारीचा उपाय म्हणून बॉम्बशोधक आणि नाशक पथके तसेच श्वानपथक तैनात करण्यात आले. पोलिस ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध घेत आहेत. (तभा वृत्तसेवा)

## तेरा वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यमांवर बंदी ?

### संसदेत सादर करणार विधेयक

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

मुलांना इंटरनेट आणि समाज माध्यमांच्या दुष्परिणामापासून वाचवण्यासाठी आणि डिजिटल विश्वात त्यांची सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी संसदेत एक खाजगी विधेयक सादर केले जाणार आहे. भाजपा खासदार बैजयंत पांडा यांनी तयार केलेल्या 'सेफगार्डिंग हेल्दी इंटरनेट एन्व्हायर्नमेंट्स फॉर लिटल डिजिटल-नेटिव्ह्स' (शिल्ड) विधेयक-२०२५ मध्ये १३ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यम वापरावर बंदी घालण्याची तरतूद आहे.

विधेयकात समाज माध्यम खाती तयार करणे, डेटा गोपनीयता, ऑनलाईन गेमिंग आणि वैयक्तिक जाहिरात यासाठी अधिक कठोर नियमांचा प्रस्ताव आहे. (वृत्तसंस्था)

#### कंपन्यांवर तांत्रिक जबाबदाऱ्या निश्चित

ऑनलाईन प्लॅटफॉर्म मुलांसाठी अनुकूल बनवण्यासाठी तंत्रज्ञान कंपन्यांवर अनेक तांत्रिक जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. अल्पवयीन मुलांसाठी उपलब्ध असलेल्या प्लॅटफॉर्मवर वय पडताळणी प्रणाली लागू करणे आवश्यक आहे. पालकांना एक विशेष डॅशबोर्ड मिळेल. ज्यात मुलांच्या ऑनलाईन हालचालींवर नजर ठेवता येऊ शकते. त्याशिवाय स्क्रीन टाईमही निर्धारित करता येऊ शकतो. ■

#### १० कोटींपर्यंतच्या दंडाची तरतूद

सर्व प्लॅटफॉर्मवर एक विशेष 'रिपोर्ट चाईल्ड हार्म' बटण असणे आवश्यक आहे. तक्रारींना २४ तासांच्या आत प्रतिसाद देणे आणि ४८ तासांच्या आत त्यांचे निराकरण करणे बंधनकारक आहे. सर्वसाधारण हानिकारक सामग्रीबाबतच्या तक्रारी ३६ तासांच्या आत काढून टाकणे अनिवार्य असेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्लॅटफॉर्मना १० कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद राहणार आहे. ■

## देश विश्वगुरू होण्यासाठी...

(शेष पान १ वरून)

सर्वप्रथम सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी अमनोरा येस फाऊंडेशनतर्फे करण्यात आलेली विविध विकासकामे आणि खेळांची अत्याधुनिक मैदाने, भोजनशाळा, विद्यार्थ्यांनी तयार केलेली परसबाग आणि वसतिगृहाची पाहणी केली.

यावेळी सरसंघचालक म्हणाले की, एकेकाळी भारतीय समाज हा पूर्णपणे संघटित होता. परंतु, परकीय आक्रमणांमुळे समाज गुलाम बनत गेला व नंतर विघटित झाला. त्यातूनच मग समाजात वंचित घटकांची संख्या वाढत गेली. असे असले तरी समाजातील वंचित घटकांनी कधीही पारतंत्र्य स्वीकारले नाही. ते स्वातंत्र्यासाठी संघर्ष करीत राहिले. इंग्रजांच्या काळात पारधी-आदिवासींना गुन्हेगार ठरवले गेले, त्यामुळे त्यांचा विकास खुंटला. पारधी समाजाच्या विकासासाठी संघ अनेक वर्षे प्रयत्नशील आहे. या स्थितीत भय्यूजी महाराजांनी जी शाळा उभारली, त्या शाळेला नवे रूप देण्याचे तसेच येथील मुलांना स्वयंपूर्ण बनवण्याचे कार्य अमनोरा येस फाऊंडेशन करीत आहे. हे कार्य नक्कीच प्रशंसेस पात्र आहे.

प्रस्तावना करताना सिटी कॉर्पोरेशनचे एमडी अनिरुद्ध देशपांडे म्हणाले, डॉ. मोहनजी भागवत यांच्या सूचनेनुसारच अमनोरा येस फाऊंडेशन या शाळेच्या उत्थानासाठी कार्याला लागली आणि पाहता पाहता पारधी आदिवासी समाजातील मुले-मुली आज प्रगती आणि स्वयंपूर्णतेच्या आकाशात उंच भरारी घेत आहेत. हा आमच्यासाठी अत्यंत कृतज्ञतेचा क्षण आहे. वंचितांच्या विकासासाठी अमनोरा येस फाऊंडेशन अनेक उपक्रम राबवत असून, आगामी काळातही हे कार्य अव्याहतपणे सुरू राहील.

आदिवासी मंत्री डॉ. उईके यांनी पारधी व आदिवासींच्या विकासासाठी शासन सातत्याने प्रयत्नरत असून, त्यानुसार विविध योजना राबवल्या जात असल्याचे सांगितले. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले की, ही आश्रमशाळा खामगावचा गौरव असून, या ठिकाणी वंचित मुलांच्या विकासासाठी होणारे कार्य नक्कीच प्रशंसनीय आहे.

सूत्रसंचालन विवेक कुलकर्णी यांनी, तर आभारप्रदर्शन आश्रमशाळेचे मुख्याध्यापक राठोड यांनी केले.

कार्यक्रमात सरसंघचालकांच्या हस्ते १६ पारधी आदिवासी मुलींना प्रत्येकी १० हजार रुपयांच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. तसेच, विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. (तभा वृत्तसेवा)



पारधी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजारांचा धनादेश देण्यात आला. यावेळी व्यासपीठावर उपस्थित सरसंघचालक व मान्यवर

### मोज्तबा खामेनेईची प्रकृती चिंताजनक



**तेहरान :** इराणच्या सर्वोच्च नेतेपदी विराजमान झालेले मोज्तबा खामेनेई यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून, प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता कमी असल्याने नवीन नेता निवडीसाठी चाचपणी सुरू करण्यात आल्याची माहिती इराणी वृत्तवाहिनीने दिली आहे. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्या प्रशासनाच्या जवळच्या अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात मोज्तबांची प्रकृती चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. पर्यायाने इराणी सत्ताधाऱ्यांनी नवीन नेता निवडीसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी एकाही सार्वजनिक कार्यक्रम भाग घेतला नाही आणि ते केवळ लेखी निवेदनांद्वारे संवाद साधत आहेत. त्यांच्या वडिलांच्या घरावर झालेल्या हल्ल्यात ते जखमी झाले होते. त्यामुळे त्यांना भूमिगत व्हावे लागले. त्यानंतर, इस्त्रायली हल्ल्यांपासून वाचण्यासाठी ते मध्यस्थांच्या अत्यंत संथ जाळ्याद्वारे वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधत आहेत. ■



## ५ हजारांची पर्स केली परत; एस.टी. चालक-वाहकाचा प्रामाणिकपणा

**तभा वृत्तसेवा, मंगळवेढा, दि.८ ऑगस्ट-**

समाजात आजही प्रामाणिकणा जिवंत आहे याचा प्रत्यय मंगळवेढा आगारात आला. आगाराच्या घेरडी - मंगळवेढा बसमध्ये प्रवासात एका प्रवासी महिलेची ५ हजार रुपये असलेली पर्स वाहक व चालकाला सापडली. ती त्यांनी त्या महिलेल्या प्रामाणिकपणे परत केली. प्रामाणिकपणा दाखवल्याने वाहक व चालकाचे कौतुक होत आहे.

शनिवार ८ ऑगस्ट रोजी मंगळवेढा आगाराची घेरडी ते मंगळवेढा ही बस प्रवास करत होती. प्रवासात वाहक धम्मानंद शिंदे व चालक भाऊराव पांढरे यांना बसमध्ये एका महिलेची पर्स सापडली. ती ताब्यात घेऊन बघितली असता त्या पर्समध्ये रोख ५ हजार रुपये व इतर महत्त्वाचे साहित्य होते. त्यावेळी वाहक व चालकांनी सदर पर्स असणाऱ्या महिलेचा तात्काळ शोध घेतला.

यावेळी वाहक शिंदे व चालक पांढरे या दोघांनी कोणताही म ोह न ठेवता महिला प्रवाशाची ओळख पटवून तिर्ला मंगळवेढा बस स्थानकात प्रामाणिकपणे पर्स परत केली. पैसे असलेली पर्स मिळाल्याने संबंधित महिला प्रवाशाच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू तरळले. त्यांनी वाहक व चालक यांच्या प्रामाणिकपणा व माणुसकीबद्दल आभार मानले. वाहक धम्मानंद शिंदे व चालक भाऊराव पांढरे यांचे आगार व्यवस्थापक गुरुनाथ रणे व वाहतूक नियंत्रक शरद वाघमारे यांच्यासह मंगळवेढा आगार व प्रवाशांकडून कौतुक होत आहे.

## 'पीएफ'साठी ई-नामांकन बंधनकारक

### जुने १३ नियम मिळून बनविल्या तीन सोप्या श्रेणी

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) नवीन ईपीएफ योजना २०२६ अंतर्गत पीएफ काढणे, दाव्यांची पूर्तता आणि ई-नामांकनाच्या नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. पैसे काढण्याचे जुने १३ नियम मिळून तीन सोप्या श्रेणी बनवल्या आहेत. तर ऑटो-सेटलमेंटची मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे.तसेच ई-नामांकन बंधनकारक करण्यात आले आहे.

नवीन नियमांत आगाऊ किंवा अंशतः पैसे काढण्याच्या जुन्या १३ वेगवेगळ्या अटी आता केवळ तीन श्रेणींमध्ये एकत्रित करण्यात आल्या आहेत.यात अत्यावश्यक गरजा (आजारीपण, शिक्षण, विवाह), घराच्या गरजा आणि विशेष परिस्थिती यांचा समावेश आहे. तसेच खातेधारकांना अंशतः पैसे काढायचे असल्यास त्यांना एकूण पीएफ निधीपैकी किमान २५ टक्के रक्कम खात्यात जमा ठेवणे अनिवार्य असेल.त्या जमा रकमेवर खातेधारकाला व्याज मिळत राहील.




#### बेरोजगारीचा कालावधी वाढवला

नोकरी गमावल्यानंतर संपूर्ण पीएफ काढण्यासाठीचा प्रतीक्षा कालावधी २ महिन्यांवरून १२ महिन्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे.परंतु, जर नोकरी गमावली असेल तर लगेचच सुरुवातीच्या गरजांसाठी अंशतः पैसे काढण्याची परवानगी अद्यापही आहे. तसेच शिक्षणासाठी, पात्र प्रकरणांमध्ये आता संपूर्ण कालावधीसाठी १०० टक्के रक्कम काढण्याची मर्यादा घालण्यात आली आहे. शिक्षणासाठी १० वेळा तर लग्नासाठी ५ वेळा पैसे काढण्याची सुविधा देण्यात आली आहे. याशिवाय पात्र सदस्यांसाठी स्वयंचलित दावा मंजुरीची मर्यादा १ लाखावरून ५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत निधीचे त्वरित वितरण करणे शक्य होईल.

(वृत्तसंस्था)

#### सदस्याचे लग्न झाले असल्यास जुने नामनिर्देशन ठरणार अवैध

ऑनलाइन दावा निकाली काढण्याची प्रक्रिया आता अधिक जलद झाली आहे, म्हणजेच ३ ते २० कामकाजाच्या दिवसांत आणि विलंबासाठी दंडाचे नियम अधिक कठोर करण्यात आले आहेत. नामनिर्देशित व्यक्ती (नॉमिनी) न जोडता ऑनलाईन दावा अर्ज सादर करणे समस्याजनक ठरू शकते. जर एखाद्या सदस्याचे लग्न झाले असेल तर जुने नामनिर्देशन अवैध मानले जाऊ शकते. त्यामुळे कुटुंबाचा तपशील आणि नामनिर्देशित व्यक्तीची माहिती डिजिटल स्वरूपात अद्ययावत ठेवणे अनिवार्य आहे. ■




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, ९ ऑगस्ट २०२६ | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


## विचारपुष्प



हिंदू संस्कृतीच्या विशाल बंधुत्वाचे योग्य आकलन त्याच्या सैद्धांतिक अधिष्ठानाला समजून घेतल्याशिवाय शक्य नाही. वेदकाळापासून आजपावेतो हिंदूंचे तत्त्वज्ञान सांगते की पूर्ण ब्रह्मांड आत्मचेतनेने ओतप्रोत भरले आहे. सगळ्या चर-अचराच्या प्रत्येक वस्तूमध्ये आत्म्याचे चैतन्य आहे.

**- स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# ट्रम्प यांची वक्रदृष्टी

### भारतासह पाच देशांवर शंभर टक्के शुल्क
### रशियन तेल खरेदी रोखण्यासाठी कारवाई
### सिनेटमध्ये ८६-११ च्या बहुमताने विधेयक पारित



**वॉशिंग्टन, ८ ऑगस्ट**
रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के व्यापार शुल्क आकारण्याचा निर्णय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला आहे. सिनेटमध्ये 'ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण अॅक्ट ऑफ २०२६' हे विधेयक ८६-११ मतांनी मंजूर झाले. रशियाकडून पेट्रोलियम उत्पादने खरेदी करणाऱ्या भारतासह पाच देशांवर १०० टक्के शुल्क आकारणे विधेयकाचा उद्देश आहे. सिनेटमध्ये पारित झाल्यानंतर आता हे विधेयक प्रतिनिधीगृहात सादर केले जाईल. तेथे मंजुरी मिळाल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या सर्व देशांवर १०० टक्के शुल्क लावू शकतात. तसेच, रशियावर अधिक कठोर निर्बंध लादण्याची तरतूद विधेयकात आहे.

सिनेटमध्ये विधेयकाच्या बाजूने ८४ खासदारांनी मतदान केले, तर विरोधात ११ मते पडली. तेल खरेदीतून मिळणारा निधी रशिया युक्रेनविरोधातील युद्धासाठी वापरत असल्याचा आरोप अमेरिकन खासदारांनी केला. याला अटकाव म्हणून सिनेटमध्ये रशियन तेल खरेदी करणाऱ्या प्रमुख पाच देशांतून अमेरिकेत आयात करण्यात येणाऱ्या उत्पादनांवर शंभर टक्के शुल्क आकारण्यासाठी विधेयक सादर करण्यात आले होते. याचा परिणाम भारत, चीन, स्लोवाकिया, हंगेरी आणि अझरबैजानवर होणार आहे. हे विधेयक रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्याने आणले गेले. (वृत्तसंस्था)

### भारताशी शत्रुत्व परवडणारे नाही : रॉब वायडेन

अमेरिकेचे सिनेटर रॉब वायडेन आणि रँड पॉल यांनी भारतावर प्रस्तावित १०० टक्के शुल्क आकारण्यास विरोध केला. या निर्णयामुळे भारतासोबतचे संबंध ताणले जाऊ शकतात असे त्यांनी म्हटले. ज्यावेळी आम्ही चीनशी स्पर्धा करण्यासाठी भारताला सोबत घेण्याचा प्रयत्न करत आहोत, अशा वेळी त्यांच्यावर १०० टक्के शुल्क लादणे हे आमच्याच हिताच्या पूर्णपणे विरोधात असेल, असे त्यांनी म्हटले. पॉल यांनी प्रस्तावित शुल्कांना अमेरिकेसाठी स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे असल्याचे म्हटले आहे.

### ऊर्जा प्रकल्पांवरही निर्बंध

रशियाचे अधिकारी, शॅडो टँकर फ्लीट, मध्यवर्ती बँक आणि सरकारी ऊर्जा प्रकल्पांवरही निर्बंध घालण्याचे विधेयकात नमूद आहे. सुरुवातीला विधेयकाच्या मसुद्यात ५०० टक्के शुल्क लावण्याचा प्रस्ताव होता, परंतु नंतर ते कमी करून १०० टक्के करण्यात आले. दरम्यान भारताने जून २०२६ मध्ये रशियाकडून विक्रमी २६.१ लाख बॅरल प्रतिदिन कच्चे तेल खरेदी केले, जे देशाच्या एकूण तेल आयातीच्या ५२.४ टक्के होते. ,रशियाकडून तेल खरेदी करण्यात चीन पहिल्या स्थानी, तर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. अशात अमेरिकेकडून शुल्क आकारणे सुरू झाल्यास भारताला दुहेरी फटका बसणार आहे.

### वित्तीय संस्था येणार रडारवर

अमेरिकेच्या सिनेटने मंजूर केलेल्या या विधेयकाचा उद्देश जगातील रशियाच्या पहिल्या पाच तेल आयातदार देशांवर, तसेच रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, रशियन उद्योगपती आणि वित्तीय संस्थांवर आर्थिक निर्बंध लादणे आहे. रशियाशी संबंधित व्यापार निर्बंधांसोबतच, हे विधेयक १९९६ च्या इराण निर्बंध कायद्याला मुदतवाढ देते. या विधेयकाचा परिणाम इराणच्या ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांवर होत राहील.

# देश विश्वगुरू होण्यासाठी वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक

- सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन
- पारधी-आदिवासी आश्रमशाळेत भव्य क्रीडा संकुलांची उभारणी


क्रीडा संकुल व बंदिस्त क्रीडागृहाचे उद्घाटन करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत. बाजूला सद्गुरू दत्त धार्मिक ट्रस्टच्या अध्यक्ष डॉ. आयुषी देशमुख, आदिवासी मंत्री अशोक उईके, कामगार मंत्री अॅड. आकाश फुंडकर, आ. डॉ. संजय कुटे, आ. अंबादास दानवे व मान्यवर.

**खामगाव, ८ ऑगस्ट**
आज देशभरात आपण ज्यांना भटके-विमुक्त म्हणतो, तो समाज एकेकाळी ज्ञानदान करणारा होता. हा समाज आपले ज्ञान निरपेक्षपणे समाजाला वाटण्यासाठी बाहेर पडला आणि कालौघात वंचित राहिला. स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला म्हणून संपूर्ण पारधी-आदिवासी समाजावर गुन्हेगार जमात, असा शिक्का लावण्यात आला. परंतु, श्री सद्गुरू दत्त धार्मिक ट्रस्ट आणि अमनोरा येस फाऊंडेशनच्या पुढाकाराने पारधी मुलांसाठी अत्याधुनिक शाळा चालवताना पाहून अत्याधिक आनंद होत आहे. देशाला खऱ्या अर्थाने विश्वगुरू बनवायचे असेल तर, वंचित घटकाला मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. येथील श्री सद्गुरू धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्टच्या पारधी-आदिवासी आश्रमशाळेत पुणे येथील अमनोरा येस फाऊंडेशनच्या पुढाकारने तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक तीन क्रीडा संकुले व विविध प्रकारच्या सुविधांचे उद्घाटन करताना सरसंघचालक बोलत होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, कामगार मंत्री अॅड. आकाश फुंडकर, श्री सद्गुरू धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट, इंदूरच्या विश्वस्त डॉ. आयुषी देशमुख, सिटी कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर अनिरुद्ध देशपांडे, आ. संजय कुटे, आ. अंबादास दानवे उपस्थित होते.

(शेवटच्या पानावर)

# यूपीआय व्यवहार असणार 'फ्री'

UNIFIED PAYMENT INTERFACE

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट -**
जर तुम्ही दररोजच्या छोट्या व्यवहारांसाठी यूपीआय वापरत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, आता बहुतेक यूपीआय व्यवहारांसाठी ग्राहक किंवा छोट्या व्यावसायिकांवर कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. याचा अर्थ दुकानदार आणि ग्राहकांवर अतिरिक्त शुल्काचा बोजा पडणार नाही. डिजिटल पेमेंट पूर्वीप्रमाणेच सोपे आणि परवडणारे असेल.

विशेष म्हणजे, कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक २०२६ नुकतेच संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आले. याचा उद्देश पेमेंट आणि सेटलमेंट सिस्टिम्स कायदा २००७ च्या कलम १०अ मध्ये सुधारणा करणे आहे. परंतु, हे विधेयक सादर होण्यापूर्वी देशभरात यूपीआय वापरकर्त्यांवर अतिरिक्त शुल्काचा बोजा पडणार, अशी चर्चा होती.

आता या चर्चांना विराम लागला आहे. सामान्य नागरिकांनी केलेल्या यूपीआय पेमेंटवर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

# फक्त प्रश्न विचारू नका; उपायही शोधा

### मोदींचे विद्यार्थ्यांना आवाहन



**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**
प्रत्येक पिढीची स्वतःची आव्हाने आणि जबाबदाऱ्या असतात. विकसित भारत घडवणे ही तुमची जबाबदारी आहे. येणाऱ्या ३५ वर्षांत तुम्ही जे कार्य कराल, त्यावरच विकसित भारताचा पाया रचला जाईल. आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी अशा समस्या ओळखल्या ज्या इतरांच्या नजरेतून सुटल्या होत्या. म्हणूनच, शिकत राहा, केवळ प्रश्न विचारू नका, तर त्यावर उपायही शोधा, असा मोलाचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली आयआयटीच्या विद्यार्थ्यांना दिला.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) दिल्लीच्या ५७ व्या दीक्षांत समारंभात शनिवारी मोदी बोलत होते. या दीक्षांत समारंभात ५८७ पीएचडी संशोधकांसह ३,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी परम प्रज्ञा या एआय-आधारित उच्च-क्षमता असलेल्या सुपरकॉम्प्युटरचे दूरस्थ पद्धतीने उद्घाटन केले. विद्यार्थ्यांना संबोधित करताना मोदी म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या यशासाठी मेडल मिळाले आहे. मी तुम्हा सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. मात्र, यात आणखी काही मुली असत्या तर मला अधिक आनंद झाला असता.

**शिकण्याची तळमळ कायम ठेवा**

अनेकदा तर मुख्य प्रश्न काय होता, हे सांगणारेही कोणी नसते. मी आयआयटीच्या अनेक माजी विद्यार्थ्यांचा प्रवास पाहिला आहे. त्यांच्या यशाचे रहस्य हेच होते की त्यांनी योग्य प्रश्न ओळखले, ते स्वीकारले आणि मग त्यावर उपाय शोधले, असे पंतप्रधान म्हणाले. (वृत्तसंस्था)

# शिक्षणाच्या नावाखाली दहशतवादाला निधी

### तपास यंत्रणांच्या चौकशीतून धक्कादायक माहिती



**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**
गेल्या काही वर्षांत दान, शिक्षण, धर्म आणि आरोग्यसेवा यांच्याशी संबंधित संस्थांची संख्या झपाट्याने वाढत असून, या संस्थांना मिळणाऱ्या निधीचा वापर दहशतवादी कारवायांसाठी केला जात असल्याची धक्कादायक माहिती तपास यंत्रणाच्या चौकशीतून समोर आली आहे. संस्थांना मिळणारा पैसा दहशतवाद्यांशी संबंध असलेल्या व्यक्ती आणि संस्थांकडे कसा वळवला जातो, याचा माग काढणे कठीण झाल्याचे अहवालात म्हटले आहे.

तपास यंत्रणांना असे आढळून आले की, या सर्वच संघटना त्या ज्या कामाचा दावा करतात, त्यासाठी बनलेल्या नाहीत. यापैकी अनेक संघटना केवळ दिखाव्यासाठी आहेत. त्यांचा उपयोग गैरमार्गाने मिळवलेला पैसा गोळा करण्यासाठी केला जातो. या पैशाचा वापर नंतर देशाच्या विविध भागांमध्ये दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी केला जात असल्याचा दावा राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) गृहमंत्रालयाला सोपवलेल्या अहवालातून केला आहे. अहवालासंदर्भात माहिती देताना एका एनआयए अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, देशाविरुद्ध एक मोठी मोहीम चालवली जात आहे, त्यामुळेच अशा बनावट संघटनांची संख्या अचानक वाढत आहे. (वृत्तसंस्था)

### हवाला सर्वांत सुरक्षित मार्ग

भारतात पैसे आणण्याची आणखी एक पद्धत आजही मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. याला हवाला म्हणतात. असे लोक अजूनही भारतात पैसे आणण्यासाठी आणि नंतर ते या संघटनांपर्यंत पोहोचवण्यासाठी हवालाला सर्वांत सुरक्षित मार्ग मानतात. ही पद्धत केरळमध्ये बरीच यशस्वी झाली आहे. या राज्यातील मोठ्या संख्येने लोक आखाती देशांमध्ये काम करतात. त्यांच्यापैकी बहुतांश जण आपल्या कुटुंबांना पैसे पाठवण्यासाठी बँकिंग प्रणालीऐवजी हवालाचा वापर करतात.



# सहकारी महामंडळाचे मुख्यालय महाराष्ट्रात

**मुंबई, ८ ऑगस्ट -**
देशातील नागरी सहकारी बँकांना (अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका) अत्याधुनिक आणि बळकट करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'अम्ब्रेला ऑर्गनायझेशन'चे म्हणजेच राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय आता दिल्लीहून थेट महाराष्ट्रात हलवले जाणार आहे. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी मुंबईत ही अत्यंत महत्त्वपूर्ण घोषणा केली. यामुळे राज्याच्या सहकार क्षेत्राचा मोठा सन्मान झाला असून, सर्वसामान्य ग्राहकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

मुंबईतील बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'सहकार नव-क्रांती मेळावा' कार्यक्रमात अमित शाह बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, या 'अम्ब्रेला संस्थे'मुळे देशातील प्रत्येक तालुक्यापर्यंत सहकारी बँकांचे जाळे अधिक भक्कम होईल. अगदी एकाच शाखेवर चालणाऱ्या छोट्या बँकेनेही या संस्थेचे सदस्यत्व घ्यायला हवे. यामुळे बँकांचा कारभार आधुनिक, पारदर्शक आणि तंत्रज्ञानावर आधारित होईल, ज्यामुळे ग्राहकांचा बँकेवरचा विश्वास अधिक दृढ होईल. या विशेष कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक केंद्रीय आणि राज्य पातळीवरील मंत्री व सहकार क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते.





दै. सोलापूर तरुण भारतला वर्धापन दिनाला आमच्या हार्दिक शुभेच्छा

DTE Code : D-6471 | Regd.Maharashtra/942/2007 Dt.08/08/2007 | Inst.Code : 1208

RAMKRISHNA TECHNICAL EDUCATION SOCIETY'S
**SHIVAJI POLYTECHNIC COLLEGE, SANGOLA**



(Approved by AICTC, New Delhi, Recognized by DTE, Mumbai & Govt of Maharashtra, Affiliated to MSBTE, Mumbai)
Sur No.76/1, 77 Sangola-Jath Road, Sangola, Dist : Solapur (Maharashtra) 413 007
Ph: (02187) 202852 Fax No.(02187) 222853 Web : www.spcsangola.com Email. spc_sangola@yahoo.com

**Admissions For Institutional Quota and Vacant Seats After CAP - 2026-27**

संस्था स्तरावरील व रिक्त राहिलेल्या डिप्लोमा इंजिनिअरिंग अभ्यासक्रमांना खालील मान्यता प्राप्त कोर्सेसना प्रवेश सुरु (Vacant Seats)

| अभ्यासक्रमांचे नाव | प्रवेश क्षमता | चॉईस कोड | प्रथम वर्ष रिक्त जागा | | | थेट द्वितीय वर्ष रिक्त जागा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Vacant Seats | EWS | IL | Vacant Seats | EWS |
| १. सिव्हील इंजिनिअरींग | 60 | 647119110 | 02 | 05 | 00 | 04 | 07 |
| २. कॉम्प्युटर इंजिनिअरींग | 60 | 647124510 | 00 | 02 | 00 | 01 | 01 |
| ३. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | 60 | 647129310 | 01 | 06 | 00 | 01 | 05 |
| ४. इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरींग | 60 | 647137210 | 00 | 04 | 00 | 00 | 06 |
| ५. मेकॅनिकल इंजिनिअरींग | 60 | 647137210 | 00 | 05 | 00 | 00 | 05 |

**प्रवेशासाठी पात्रता**
प्रथम वर्ष : १. एस.एस.सी. (१० वी) परिक्षेत किमान पास क्लास गुण आवश्यक.
थेट द्वितीय वर्ष : १. १२ वी सायन्स (PCM/PCMB/ टेक्निकल/बाय फोकल/एमसीव्हीसी/व्होकेशनल) परिक्षेत किमान पास क्लास गुण आवश्यक.
२. आयटीआय (ITI) २ वर्षे कालावधी पास.

| * प्रथम वर्ष (Vacant Seats) प्रवेश प्रक्रिया | * थेट द्वितीय वर्ष (Vacant Seats) प्रवेश प्रक्रिया |
|---|---|
| Application For Vacant Seat | Application For Vacant Seat |
| 9th August to 12th August 2026 | 11th August to 12th August 2026 |
| General Merit List | General Merit List |
| 12th August 2026. 03.00pm | 12th August 2026. 03.00pm |
| Final Merit List | Final Merit List |
| 12th August 2026. 05.00pm | 12th August 2026. 05.00pm |
| Reporting & Confirmation of Admission to Institute | Reporting & Confirmation of Admission to Institute |
| 13th Aug to 14th Aug 2026 | 13th Aug to 14th Aug 2026 |

अधिक माहितीसाठी संपर्क
प्रा.पी.एस.पाटील 8999585552 | प्रा.व्ही.बी.पैलवान 9405414549 | प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख 9763328461

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## प्रासंगिक

# वाचन-संस्कृती : काल, आज आणि उद्या

शैलेश पांडे

मानवी समुदायाच्या इतिहासात विचारांची देवाणघेवाण, ज्ञानाचे संवर्धन आणि संस्कृतीचा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होणारा प्रवास हा मुख्यत्वे शब्दांच्या माध्यमातूनच झाला आहे. शब्द जन्माला आल्यानंतर त्यांना शिस्त आली आणि मग ती शिस्त विकसित होऊन भाषा तयार झाली. पुढे भाषांचे साहित्य आले. सुरुवातीचा हा सारा प्रवास मौखिकच होता. पुढे तो चित्रे- अक्षरे म्हणजे चिन्हांमध्ये उमटू लागला. गुफांमध्ये काढलेल्या चित्रांपासून सुरू झालेला हा प्रवास मातीची पाटी, ताम्रपट, भूर्जपत्रे आणि कागद असा टप्प्याटप्प्याने विकसित होत गेला. पुस्तके किंवा छापील शब्दांची संकलने फारच कमी होती. पंधराव्या शतकात जोहान्स गुटेनबर्गने मुद्रणकलेचा (प्रिंटिंग) शोध लावला आणि छापील पुस्तकांच्या माध्यमातून अपेक्षित असलेल्या वैचारिक अभिसरणाचे तोवर संथ चाललेले चाक वेगाने फिरू लागले. पुस्तके आणि वाचन या गोष्टी पूर्वी प्रामुख्याने धर्मक्षेत्राशी संबंधित व्यक्ती तसेच काही लब्धप्रतिष्ठित यांच्यापर्यंतच मर्यादित होत्या. मुद्रणकलेने त्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविल्या. मुद्रणक्रांतीने जगाला ज्ञानाच्या आकलनाचे आणि निर्मितीचे नवे अवकाश उपलब्ध करून दिले. माहिती आणि ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचविले गेले. आज एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात सारे जग गुटेनबर्गच्या त्या मुद्रित युगाकडून डिजिटल युगाकडे अभूतपूर्व गतीने सरकत आहे. पुस्तके मागे पडत आहेत आणि विविध प्रकारच्या स्क्रीन्स आपले विश्व व्यापत आहेत.

आजचा काळ स्क्रीन्सचा आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत मानवी डोळे सातत्याने कोणत्या ना कोणत्या डिजिटल स्क्रीनवर खिळलेले असतात. खिशातला स्मार्टफोन असो, टेबलावरचा लॅपटॉप असो, हातातले टॅब्लेट असो किंवा ई-रीडर असो, असतो तो स्क्रीन. त्यावरही लोक काही तरी वाचत-पाहत असतात. प्रत्यक्षात पुस्तके वाचण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे 'आजची पिढी वाचत नाही,' असा सरसकट निष्कर्ष काढला जातो. विशेषतः ज्येष्ठ पिढीकडून किंवा पारंपरिक साहित्यवर्तुळातून हा सूर वारंवार ऐकायला मिळतो. परंतु, तटस्थपणे विचार केला तर हा निष्कर्ष किती वस्तुस्थितिदर्शक आहे? मानवी समाज खरोखरच वाचनापासून दूर गेला आहे, की वाचनाचे स्वरूप, माध्यम, भाषा आणि तंत्रज्ञान बदलले आहे?, याचा विचार केला पाहिजे.

**बदलले ते माध्यम...** : वास्तविक पाहता, आजचा मानव इतिहासातील कोणत्याही काळापेक्षा जास्त शब्द वाचत आहे!... आता तो खरोखर वाचतो, पाहतो की नुसताच स्क्रोल करतो हा वादाचा मुद्दा आहेच. परंतु, सकाळी उठल्याबरोबर व्हॉट्सअ‍ॅपचे मेसेजेस, फेसबुक आणि एक्स (ट्विटर) वरील पोस्ट्स, वृत्तपत्रांच्या डिजिटल आवृत्त्या, वेब पोर्टल्सवरील बातम्या, वेगवेगळ्या विषयांवरील ई-मेल न्यूजलेटर्स, लिंक्डइनवरील पोस्ट्स आणि विविध ब्लॉग्स या सगळ्यांच्या माध्यमातून रोज हजारो शब्द मानवी मेंदूपर्यंत पोहोचत असतात हे खरे. त्यातले उपयोगाचे किती हाही मुद्दा आहेच. पण, एवढे शब्द लोकांपर्यंत पोहोचत असतील तर लोक वाचत नाहीत ही तक्रार चुकीची ठरते. लोक वाचतात. फक्त दर्जेदार वाचतात काय, हाच प्रश्न आहे. खरा फरक पडला आहे तो वाचनाच्या दर्जात, माध्यमात आणि स्वरूपात. आतापर्यंत वाचनासाठी नेमकी पुस्तके निवडावी लागायची. आता बहुतेकांच्या बाबतीत असे घडते की, अल्गोरिदम आपल्याला निवडत असते आणि आपण काय वाचायचे हेही बव्हंशी तिकडूनच ठरविले जाते. पूर्वी वाचन म्हणजे हातात धरलेले पुस्तक. ते विशिष्ट वजनाचे, कागदाचा गंध असणारे असायचे. त्याचा स्पर्श वाचकाला आवडायचा. आज तेच वाचन काचेच्या गुळगुळीत स्क्रीनवर, निळ्या प्रकाशाच्या झोतात आणि बोटांच्या स्क्रोलवर उपलब्ध झाले आहे. वाचनाच्या प्रक्रियेतील हा बदल केवळ भौतिक स्वरूपाचा आहे, असे नव्हे. मानसिक आणि संज्ञानात्मक पातळीवरही खूप मोठे बदल घडून आलेले आहेत. कागदावरील मजकूर स्थिर असतो; तर स्क्रीनवरील मजकूर हा गतिमान असतो. त्या गतीमुळे वाचनाची लय, वेग आणि सखोलता या तिन्ही गोष्टींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे.

**डीप रीडिंग आणि स्कॅनिंग** : डिजिटल स्क्रीनवरील वाचनाचा सर्वांत मोठा आणि गंभीर परिणाम मानवी मेंदूच्या वाचन-पद्धतीवर झाला आहे. मज्जाशास्त्रज्ञ आणि भाषातज्ज्ञांच्या संशोधनानुसार, माणसाचा मेंदू हा निसर्गाने वाचनासाठी तयार केलेला नाही. बोलणे ही मानवाची नैसर्गिक क्षमता आहे, पण वाचणे हे मानवाने आत्मसात केलेले सांस्कृतिक कौशल्य आहे. तज्ज्ञांच्या मते, मानवी मेंदूत बोलण्यासाठी स्वतंत्र आणि जन्मजात केंद्रे असतात. मात्र, वाचनासाठी असे कोणतेही 'इन-बिल्ट' केंद्र निसर्गाने बनवलेले नाही. वाचन प्रक्रिया शिकताना मेंदू स्वतःमध्ये बदल करतो. दृश्य ओळखीच्या माध्यमातून भाषेच्या भागांना जोडून मेंदू वाचनासाठी नवीन 'सर्किट' तयार करतो. मेंदू सुरुवातीला अक्षरांना विशिष्ट 'चित्रे' किंवा 'आकार' म्हणून पाहतो आणि नंतर त्यांचे रूपांतर ध्वनीमध्ये करतो. जगातील कोणतेही मूल कोणत्याही औपचारिक प्रशिक्षणाशिवाय केवळ आजूबाजूचे ऐकून बोलायला शिकते. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. वाचनाचे वेगळे आहे. वाचन ही मानवाने हजारो वर्षांपूर्वी स्वतःच्या गरजेतून विकसित केलेली कला किंवा कौशल्य. हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी माणसाला विशेष प्रयत्न करावे लागतात आणि त्याचे रीतसर प्रशिक्षण घ्यावे लागते. माणसे बोलायला लागून लाखो वर्षे उलटली आहेत. त्यामुळे बोलणे आपल्या जनुकांमध्ये कोरले गेले आहे. याउलट, मानवाने लिपी विकसित करून आणि वाचायला सुरुवात करून जेमतेम काही हजार वर्षे मागे सरली. उत्क्रांतीच्या दृष्टीने हा काळ अत्यंत कमी आहे. मात्र, वाचन हे कृत्रिम स्वरूपात प्राप्त करावयाचे कौशल्य असले तरी ते मानवाचे महान सांस्कृतिक यश मानले जाते. ज्ञानाचा विस्तार व विकास यांत वाचनाने फार मोठे योगदान दिले आहे. आपण कागदावर छापलेले एखादे पुस्तक वाचतो, तेव्हा आपला मेंदू एका रेषेत, सलग आणि सखोल विचार करतो. याला 'डीप रीडिंग' किंवा 'सखोल वाचन' म्हटले जाते. सखोल वाचनात वाचकाची कल्पनाशक्ती जागृत होते, तो पात्रांशी, विचारांशी तादात्म्य पावतो आणि मजकुराचा अर्थ लावताना स्वतःच्या अनुभवांची जोड देतो. त्या तुलनेत स्क्रीनवरील वाचन माहितीच्या समुद्रात वरच्या वर मारलेल्या सुरमाऱ्या उडीसारखे असते. पुस्तकाच्या कागदावरील वाचन हे तळाशी जाऊन मोती शोधणाऱ्या पाणबुड्यासारखे असते.

**स्कॅनिंगची वृत्ती** : डिजिटल स्क्रीनवर वाचताना मेंदूची वृत्ती प्रामुख्याने स्कॅनिंग करण्याची असते. स्क्रीनवर वाचताना डोळे मजकुरावरून वेगाने फिरतात. मेंदू मुख्य शब्द (की-वर्ड्स), ठळक मथळे आणि बुलेट पॉईंट्स शोधण्याचा प्रयत्न करतो. एफ-शेप पॅटर्नमध्ये (एफ या इंग्रजी अक्षराच्या शैलीत) स्क्रीनवरील मजकूर वाचला जातो. म्हणजे वरच्या दोन-तीन ओळी पूर्ण वाचायच्या आणि नंतर डाव्या बाजूने खाली खाली सरकत फक्त सुरुवातीचे शब्द पाहायचे. या पद्धतीमुळे माहिती वेगाने मिळत असली तरी मजकुराची सखोलता, त्यातील भावभावना, उपरोध आणि सूक्ष्म वैचारिक बारकावे सुटून जातात. परिणामी डिजिटल वाचक हा ज्ञान मिळवण्याऐवजी प्रामुख्याने माहिती गोळा करणारा ठरतो. कागदी पुस्तक वाचनामुळे मिळणारी सखोल समज आणि डिजिटल वाचनातून होणारे उथळ आकलन हा फरक समजून घ्यायला हवा.

डिजिटल युगाने आपल्याला माहितीचे प्रचंड भांडार उपलब्ध करून दिले आहे. जगातील कोणत्याही कोपऱ्यात बसून आपल्याला कोट्यवधी पुस्तके, शोधनिबंध आणि लेख काही सेकंदांत उपलब्ध होतात. ही तंत्रज्ञानाची सर्वांत मोठी देणगी आहे. परंतु, या वरदानासोबतच माहितीचा अतिभार ही नवी समस्या निर्माण झाली आहे. रोज सकाळी आपल्या स्क्रीनवर माहितीचा जो प्रचंड लोंढा येतो, त्यामुळे काय वाचावे आणि काय सोडावे, हा निर्णय घेणे वाचकांसाठी कठीण होते. यापेक्षा मोठी समस्या म्हणजे एकाग्रतेचा भंग होणे. उदाहरणार्थ- आपण जेव्हा स्क्रीनवर एखादा गंभीर लेख वाचत असतो, तेव्हाच स्क्रीनच्या वरच्या बाजूला व्हॉट्सअ‍ॅपचे नोटिफिकेशन येते, किंवा ई-मेलचा टोन वाजतो किंवा सोशल मीडियावरील लाईक्सचा मेसेज येतो. मानवी मेंदू हा नैसर्गिकरीत्या नवीन उत्तेजनांकडे आकर्षित होणारा आहे. त्यामुळे त्या एका इवल्याशा डिजिटल टकटकीने वाचनाची साखळी तुटते



वाचन आणि साहित्यावरील पुस्तकप्रेमींचे आस्थेचे प्रतीक म्हणून ९ ऑगस्टला पुस्तकप्रेमी दिन साजरा केला जातो. मानवाच्या दृष्टीने पुस्तकांचे तसेच साहित्याचे महत्त्व सांगतानाच डिजिटल स्क्रीनचा कमीत कमी वापर करण्याचे आवाहन करणारा हा दिवस. त्यानिमित्त...

आणि आपण भलत्याच जगात निघून जातो, हे अनेकांनी अनुभवले असेल. आपण काय वाचत किंवा शोधत होतो हेही अनेक लोक विसरून जातात आणि भलत्याच ठिकाणी स्क्रोलिंगमध्ये गुंतून पडतात. या अशा व्यत्ययांमुळे मानवी मेंदूची एकाग्रतेची क्षमता (अटेन्शन स्पॅन) कमालीची घटली आहे. काही मिनिटांपेक्षा जास्त वेळ एका विषयावर लक्ष केंद्रित करणे आजच्या वाचकाला फार अवघड वाटू लागले आहे.

**ऑडिओबुक्सचे विश्व** : डिजिटल युगात वाचनाची व्याख्या 'डोळ्यांनी शब्द पाहणे व समजून घेणे' एवढीच उरलेली नाही. या युगाने 'ऐकणाऱ्या वाचकांची' (ऑडिओ रीडर्स) नवी पिढी निर्माण केली आहे. अनेक ऑडिओबुक प्लॅटफॉर्म्समुळे आणि विविध विषयांवरील पॉडकास्टमुळे वाचन हे श्राव्य स्वरूपात करणे शक्य झाले आहे. प्रवासात असताना, व्यायाम करताना, घरची कामे करताना किंवा रात्री झोपण्यापूर्वी पुस्तके ऐकणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस प्रचंड वेगाने वाढत आहे. श्राव्य वाचन आणि डोळ्यांनी केलेले वाचन यात फरक आहेच. काही अभ्यासक ऑडिओबुक्स ऐकण्याच्या प्रक्रियेस वाचन मानण्यास नकार देतात. परंतु, भाषाशास्त्र आणि मानवी संवादाच्या दृष्टीने पाहिल्यास, कथा ऐकणे किंवा विचार ऐकून ग्रहण करणे ही मानवाची सर्वांत प्राचीन परंपरा आहे. मुद्रणकलेच्या आधी आपली संस्कृती 'श्रुती' आणि 'स्मृती'वरच आधारलेली होती. आजीने सांगितलेल्या गोष्टी ऐकत लहानाचे मोठे होणे, हे ऑडिओबुकचेच प्राचीन रूप होते. ज्या लोकांना वेळेअभावी किंवा दृष्टीच्या समस्यांमुळे पुस्तके वाचता येत नव्हती, ते ऑडिओबुक्समुळे पुन्हा वाचन व साहित्याशी जोडले गेले आहेत. नाट्यमय अभिवाचन, पार्श्वसंगीत आणि उत्कृष्ट आवाजाच्या साथीने जेव्हा एखादी कादंबरी ऑडिओबुकच्या रूपात सादर होते, तेव्हा ती वाचकाच्या मनात एक वेगळेच भावविश्व उभे करते, हे नाकारता येत नाही.

**ई-रीडर्सचा उदय** : स्मार्टफोन आणि टॅब्लेटच्या स्क्रीनवर वाचताना डोळ्यांवर येणारा ताण आणि येणारे व्यत्यय यावर उपाय म्हणून ई-रीडर्सचा उदय झाला. ई-रीडरची स्क्रीन ही साधारण कागदासारखीच दिसते. तिच्यावर सूर्याच्या प्रकाशातही सहज वाचता येते आणि तिच्यातून निळा प्रकाश (ब्ल्यू लाईट) बाहेर येत नाही. त्यामुळे डोळ्यांवरील ताण कमी होतो. ई-रीडर्सनी वाचनविश्वात मोठी क्रांती घडवून आणली आहे. छोट्याशा उपकरणात आपण हजारो पुस्तकांची डिजिटल लायब्ररी बाळगू शकतो. आता परदेशातील पुस्तके भारतात उपलब्ध होण्याची वाट पाहावी लागत नाही. एका क्लिकवर पुस्तक आपल्या डिव्हाईसवर डाऊनलोड होते. वाचताना कठीण शब्दाचा अर्थ तातडीने शब्दकोशात पाहणे, महत्त्वाचे उतारे हायलाईट करणे आणि त्यांच्या नोट्स बनवणे या गोष्टी ई-रीडरवर अत्यंत सुलभ झाल्या आहेत. त्यामुळे ई-रीडर्स हे पारंपरिक कागदी पुस्तके आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यातील एक अत्यंत प्रभावी दुवा ठरले आहेत. डिजिटल वाचनाच्या या जागतिक प्रवाहापासून भाषक साहित्य आणि वाचकवर्गही वेगळा राहिलेला नाही. एकेकाळी केवळ छापील दैनिकांवर, दिवाळी अंकांवर आणि ग्रंथालयांवर अवलंबून असणारा मराठी वाचक आज डिजिटल अवकाशात मोठ्या प्रमाणावर व्यक्त होत आहे. असंख्य पोर्टल्स आणि ब्लॉग्स मराठीतील वैचारिक व साहित्यिक वाचनाला नवी दिशा देत आहेत. फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर अनेक तरुण लेखक रोज लिहीत आहेत आणि लाखो वाचक वाचत आहेत. या वाचनाचा दर्जा काही वेळा समाधानकारक नसला तरी डिजिटल माध्यमांमुळे मराठी भाषेशी आणि साहित्याशी जोडल्या जाणाऱ्या तरुणांची संख्या वाढली आहे. डिजिटल वाचनाचा असा महापूर आलेला असताना 'कागदी पुस्तकांचे काय होणार?' हा प्रश्न सातत्याने विचारला जातो. अनेकांनी असा दावा केला होता की डिजिटल युगात छापील पुस्तके नष्ट होतील आणि ग्रंथालये बंद पडतील. परंतु, वास्तव याच्या अगदी उलट आहे. ई-बुक्स आणि ऑडिओबुक्सचे प्रमाण वाढले असले तरी छापील पुस्तकांची विक्री थांबलेली नाही; उलट जगभरात कागदी पुस्तकांचे महत्त्व पुन्हा एकदा लक्षात घेतले आहे. कागदी पुस्तकाला स्वतःचे वेगळे अस्तित्व आणि व्यक्तिमत्त्व असते. पुस्तकाचा विशिष्ट गंध, पानांचा स्पर्श, हातात धरलेले पुस्तक वाचताना मिळणारी विरंगुळ्याची भावना आणि शेल्फवर ठेवलेल्या पुस्तकांकडे पाहून मिळणारे आत्मिक समाधान या शेकडो वर्षे विकसित झालेल्या मानवी संवेदना आहेत. स्क्रीनवर वाचताना मिळणारा अनुभव हा मुख्यत्वे माहितीपर असतो. कागदी पुस्तक वाचण्याचा अनुभव हा भावनात्मक आणि अतींद्रिय स्वरूपाचा असतो. स्क्रीनवर आपण वाचन नावाचे 'काम' करतो; पुस्तकात आपण रमतो. म्हणूनच, डिजिटल थकव्यातून (स्क्रीन फटिग) मुक्त होण्यासाठी अनेक तरुण पुन्हा कागदी पुस्तकांकडे वळताना दिसत आहेत. एक मात्र खरे की, डिजिटल वाचन व छापील पुस्तक वाचन असा दावा उभा करण्याची गरज नाही. ही दोन्ही माध्यमे एकमेकांची शत्रू नसून ती एकमेकांना पूरक आहेत. कोणत्या वेळी, कोणत्या हेतूने आणि काय वाचायचे आहे, यावरून माध्यमाची निवड केली जाऊ शकते. ताजी बातमी, व्यावसायिक अपडेट्स किंवा त्वरित लागणारी माहिती हवी असेल, तर डिजिटल माध्यमाला पर्याय नाही. परंतु, संत ज्ञानेश्वर, तुकाराम किंवा शेक्सपिअर, दोस्तॉयव्हस्की वाचायचा असेल, वैचारिक-आध्यात्मिक वाचन वाढवायचे असेल किंवा तत्त्वज्ञान, इतिहास आणि ललित साहित्याचा सखोल आस्वाद घ्यायचा असेल, तर कागदी पुस्तकांना आजही पर्याय नाही. डिजिटल वाचनाच्या सुविधेने पुस्तकांचे वजन वाहण्यापासून आपल्याला मुक्त केले हे खरे. पण, पुस्तकांच्या पारंपरिक वाचनाने मानवी समुदायाला वैचारिक सखोलता प्रदान केली आहे, हे दुर्लक्षित करता येत नाही. वाचनसंस्कृतीचा मूळ गाभा कशात आहे?... तो कागदावर आहे की स्क्रीनवर? या प्रश्नाचे उत्तर असे की- तो 'शब्दांत' आणि 'विचारांत' आहे. तो तुमची विचारचक्रे फिरविण्याच्या शब्दांच्या सामर्थ्यात आहे. माध्यम बदलले तरी माणसाची विचारांची, अनुभवांची आणि कथांची भूक कधीच संपणारी नाही. प्राचीन काळात ऋषिमुनींच्या काळात वेद-पुराणे ही श्राव्य स्वरूपात संकलित होऊन पुढच्या पिढ्यांकडे हस्तांतरित व्हायची. पुढे ते सारे ताडपत्रांवर-भूर्जपत्रांवर किंवा तत्सम उपलब्ध सामुग्रीवर लिहिले गेले. गुटेनबर्गने शब्द कागदावर छापले आणि आज ते पिक्सेलच्या रूपात आपल्या स्क्रीनवर चमकत आहेत. हा तंत्राचा फरक आहे. डिजिटल युगात गरज आहे ती वाचनाच्या गुणवत्तेबाबत आणि एकाग्रतेबाबत जागरूक राहण्याची. तंत्रज्ञानाचा वापर माहिती मिळवण्यासाठी जरूर करावा, परंतु वैचारिक समृद्धीसाठी, चिंतनासाठी आणि आत्मशोधासाठी छापील पुस्तकांच्या वाचनाची सवय जपणे गरजेचे आहे. आपण काय आणि कशावर वाचायचे ते आपण ठरविले पाहिजे. इतर कुणीही ते ठरविता कामा नये. आपल्याला भूक नसताना आपल्या ताटात कुणी चमचमीत पक्वान्ने टाकू नयेत आणि खरोखर भूक लागलेली असताना आपल्या समोर जंक फूडचे ताट मांडू नये, एवढेच. ■

(मुख्य संपादक, तरुण भारत)

## रविवारची पत्रे

### मोफत व्यवहारांचा प्रश्न

भारतातील डिजिटल व्यवहार क्रांतीचे सर्वांत प्रभावी प्रतीक ठरलेले यूपीआय आज प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. अशा वेळी यूपीआय व्यवहारांवर भविष्यात शुल्क आकारण्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या कायद्यातील दुरुस्तीने केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि धोरणात्मक चर्चेलाही नवे वळण दिले आहे. त्यामुळे या बदलाकडे केवळ शुल्काच्या नजरेतून नव्हे, तर देशाच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या भवितव्याच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

गेल्या काही वर्षांत भारताने डिजिटल पेमेंट क्षेत्रात जगासमोर आदर्श निर्माण केला. काही सेकंदांत सुरक्षित, सुलभ आणि मोफत व्यवहार करण्याची सुविधा मिळाल्यामुळे ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत डिजिटल व्यवहारांचा वेगाने विस्तार झाला. केंद्र सरकारने २०२० मध्ये यूपीआय व्यवहारांवरील 'मर्चंट डिस्काऊंट रेट' (एमडीआर) रद्द करून डिजिटल व्यवहारांना मोठी चालना दिली. त्याचा परिणाम म्हणून आज देशातील बहुतांश डिजिटल व्यवहार यूपीआयद्वारे होत आहेत. मात्र, या यशामागे उभी असलेली बँकिंग व्यवस्था, पेमेंट सेवा पुरवठादार आणि फिनटेक कंपन्यांवर वाढत्या व्यवहारांचा आर्थिक भार सातत्याने वाढत असल्याचे चित्र आहे. व्यवहारांची संख्या वाढत असताना तांत्रिक पायाभूत सुविधा, सायबर सुरक्षा आणि देखभालीसाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज भासत आहे. त्यामुळे 'शून्य एमडीआर'चे धोरण दीर्घकाळ टिकवणे शक्य आहे का, हा प्रश्न आता केंद्रस्थानी आला आहे.

या संभाव्य बदलाचा सर्वाधिक परिणाम सर्वसामान्य ग्राहक आणि छोट्या व्यापाऱ्यांवर होऊ शकतो. सध्या ग्राहकांना थेट शुल्क आकारले जाणार नसल्याचे संकेत असले, तरी व्यापाऱ्यांवर एमडीआर लागू झाल्यास त्याचा अप्रत्यक्ष भार वस्तू किंवा सेवांच्या किमतीतून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः किरकोळ व्यापारी, लघुउद्योजक आणि छोट्या व्यावसायिकांसाठी हा अतिरिक्त खर्च चिंतेचा विषय ठरू शकतो. परिणामी काही व्यापारी पुन्हा रोखीच्या व्यवहारांना प्राधान्य देतील, अशीही भीती व्यक्त होत आहे. डिजिटल व्यवहारांची सवय लागलेल्या ग्राहकांसाठी हा बदल मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वीकारणे सोपे ठरणार नाही. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना ग्राहक, व्यापारी आणि सेवा पुरवठादार यांच्यात समतोल राखणे अत्यंत आवश्यक ठरेल.

सरकारच्या दृष्टीने पाहिले तर या दुरुस्तीमागे डिजिटल पेमेंट व्यवस्थेची आर्थिक शाश्वतता हा मुख्य आधार असल्याचे दिसते. वाढत्या व्यवहारांचे व्यवस्थापन, तांत्रिक सुधारणा, सायबर सुरक्षेची मजबुती आणि भविष्यातील गुंतवणूक यासाठी स्थिर उत्पन्नाचा स्रोत आवश्यक असल्याचा बँका आणि पेमेंट सेवा कंपन्यांचा आग्रह सरकारने विचारात घेतल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सरकारने स्वतः शुल्क लागू केलेले नसून, भविष्यात परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार स्वतःकडे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

या निर्णयावर बाह्यशक्तींचा प्रभाव असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधीच्या अहवालातील निरीक्षणे आणि जागतिक पेमेंट कंपन्यांच्या हितसंबंधांचा उल्लेख करून सरकारवर दबावाखाली निर्णय घेतल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या आरोपांना अद्याप ठोस अधिकृत पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या विषयाकडे राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा वस्तुनिष्ठ आणि पुराव्याधारित दृष्टिकोनातून पाहणे अधिक उचित ठरेल. यूपीआय ही केवळ पेमेंट प्रणाली नसून भारताच्या डिजिटल परिवर्तनाची ओळख आहे. त्यामुळे तिच्या भवितव्याशी संबंधित कोणताही निर्णय अत्यंत पारदर्शक, विचारपूर्वक आणि सर्व संबंधित घटकांचा विश्वास जिंकणारा असणे आवश्यक आहे.

**शंतनू चिंचाळकर**/पुणे. ९४२०७०७३६२

■■■

### ऑगस्ट क्रांती दिनाचे महत्त्व



'करेंगे या मरेंगे' या निर्धारपूर्ण घोषणेने संपूर्ण देशाला प्रेरणा देत ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवे बळ मिळाले. हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन किंवा भारत छोडो आंदोलन दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. हा दिवस केवळ इतिहासातील एक घटना नसून भारतीयांच्या अदम्य देशभक्तीचा, त्यागाचा आणि स्वातंत्र्याच्या तीव्र आकांक्षेचा साक्षीदार आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्रजांनी भारतीय नेत्यांचा विश्वासघात केला. भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. याच पृष्ठभूमीवर ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर (आजचे ऑगस्ट क्रांती मैदान) अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात महात्मा गांधींनी 'भारत छोडो' आंदोलनाची घोषणा केली. त्यांनी देशवासीयांना 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र दिला आणि इंग्रजांनी भारत त्वरित सोडावा, अशी ठाम मागणी केली.

९ ऑगस्टच्या पहाटेच अनेक नेत्यांना इंग्रजांनी अटक केली. मात्र नेत्यांच्या अटकेने आंदोलन थांबले नाही. उलट संपूर्ण देशभर विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला आणि सामान्य नागरिक स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरले. अनेक ठिकाणी मोर्चे, संप, निदर्शने, सरकारी कार्यालयांवर बहिष्कार आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र आंदोलन सुरू झाले. ब्रिटिश सरकारने हे आंदोलन दडपण्यासाठी लाठीमार, गोळीबार, अटकसत्र आणि कठोर दडपशाहीचा अवलंब केला. हजारो आंदोलनकर्त्यांना तुरुंगात डांबण्यात आले, अनेकांना प्राणांची आहुती द्यावी लागली. तरीही भारतीयांचा स्वातंत्र्याचा निर्धार ढळला नाही. अनेक तरुणांनी भूमिगत राहून आंदोलन सुरू ठेवले. अरुणा आसफ अली, उषा मेहता, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया यासारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या आंदोलनाला नवे बळ दिले. उषा मेहतांनी सुरू केलेल्या गुप्त काँग्रेस रेडिओने स्वातंत्र्याचा संदेश देशभर पोहोचवला.

या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेचा पाया हादरवला. इंग्रजांना हे स्पष्ट झाले की भारतीयांना कायम गुलाम ठेवणे आता अशक्य आहे. जरी १९४२ मध्ये स्वातंत्र्य मिळाले नाही, तरी याच आंदोलनामुळे स्वातंत्र्यप्राप्तीची प्रक्रिया वेगाने पुढे सरकली आणि अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. आज स्वातंत्र्यानंतर जवळपास आठ दशके उलटून गेली असली, तरी ऑगस्ट क्रांती दिनाचे महत्त्व अजूनही तितकेच आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हे; तर लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाचा सन्मान, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता आणि नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांचे प्रामाणिक पालन हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आजच्या पिढीने स्वातंत्र्य सैनिकांचा त्याग केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घ्यावी. ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील निर्णायक टप्पा असून, लाखो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

■■■

### संपलेले आंदोलन व उरलेले कवित्व

लोकशाही प्रक्रियेत सरकारचे धोरण पसंत पडले नाही म्हणून आंदोलन करण्याचा अधिकार जनतेस संविधानाने निश्चितच दिलेला आहे. आपल्या भारत देशात नजीकच्या काळात, जेएनयूमधले आंदोलन, दिल्ली सीमेवर झालेले किसान आंदोलन, महाराष्ट्रात आरक्षण आंदोलन इत्यादी आंदोलने पार पडलीत. नुकतेच संपलेले सीजेपीचे आंदोलन हे त्यापैकी अत्यंत निराळे म्हणावे लागेल. केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाद्वारे घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेचा पेपर फुटला आणि त्या नंतर देशभरातील २०-२२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. याचा निषेध करण्याकरिता सीजेपीद्वारे दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करण्यात आले. सुरुवातीस आंदोलनाला अत्यल्प प्रतिसाद होता. आंदोलनात लडाखचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी अचानक उडी घेऊन बेमुदत उपोषण सुरू केले. हळूहळू आंदोलन चांगलेच पेटले व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली. केंद्र सरकारने हस्तक्षेप करून प्रथम सोनम वांगचुक यांना उपोषण सोडण्यास भाग पाडले, परंतु आंदोलनाचा दुसरा भागीदार अधिकच नाराज झाला आणि विद्यार्थी आंदोलक प्रक्षुब्ध झाले. केंद्र सरकारने आंदोलक विद्यार्थ्यांच्या बहुतेक मागण्या मान्य करून धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मंजूर केला.

आंदोलनादरम्यान तरुण विद्यार्थी व विद्यार्थिनी लाखाच्या संख्येत जंतरमंतरवर जमा झाले होते व त्यांनी अत्यंत खालच्या पातळीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका टिप्पणी सुरू केली. जणू काही हे आंदोलन नेत्यांच्या हातातून निसटले आहे व आंदोलकांवर कुणाचेही काहीही बंधन उरले नाही असे चित्र दिसू लागले. पोलिसांना लक्ष्य करून सरकारी मालमत्तेचे अतोनात नुकसान करण्यात आले. या आंदोलनास कोण प्रोत्साहन देत होते व कुणाचे अदृश्य हात मदत करत होते हे दोन महिन्यात चौकशीअंती समोर येईलच. असभ्य वर्तन करणारे काही आंदोलक दिल्ली, नोएडा आणि गाझियाबाद परिसरातील रहिवासी आहेत असे सीसीटीव्ही आधारे पोलिसांनी लगेच शोधून काढले व त्यापैकी काहींवर एफआयआर दाखल करण्यात आले. बरेचशे आंदोलक फरार झाले व त्यापैकी काहींनी समाज माध्यमांवर माफीनामा सादर केला आहे. सर्व घटनाक्रम लक्षात घेऊन व काळजीपूर्वक विचार करून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आंदोलक विद्यार्थ्यांना माफ केले आहे. यापुढे तरी आंदोलन करताना सभ्यतेचा मर्यादा पाळल्या जातील अशी तूर्तास आशा बाळगायला हरकत नाही.

**अनंत केणेकर**/९५६११८०९८२

■■■

### बालपणीच्या श्रावणातल्या चिंब आठवणी

श्रावण सरी डोळ्यांसमोर नाचताना बालवयातील आठवणींचा पिसारा मनाला सुखावून जातो. शाळा सुटायची वाट पाहून जीव अक्षरशः कंटाळायचा. श्रावणी सोमवार त्यामुळे अर्धा दिवसच शाळा. शाळा सुटताच मित्रांबरोबर पळतच निघायचं घराकडे. 'आपली टोळी जिंदाबाद'च्या थाटामध्ये नंदुरबारच्या श्री नीलकंठेश्वर मंदिराकडे मोर्चा निघायचा. खांद्यावर हात, गरमागरम चर्चा, मधूनच चिडवाचिडवी, पाहता पाहता दीड-दोन किलोमीटर अंतर पार पडायचं. भरपूर पावसामुळे रस्त्यावर चिखलाचा राडा झालेला. रबरी चपलांमुळे बहुतेक सगळ्यांच्या पोटरीपासून ते थेट डोक्यापर्यंत चिखल उडालेला. पण पर्वा कोण करतंय! एकच ध्यास फिरणे. सगळीकडे हिरवेगार झालेले. मंदिराच्या गाभाऱ्यातील शिवलिंगासमोर 'शंभोऽऽ हरऽऽ'चा एकसाथ गजर करून सारे बाहेर पडले की 'चलोऽऽ मोठा नंदी' म्हणत मग मोठा नंदीकडे मोर्चा वळायचा. त्यानंतर सतीचा खांब - सती नेमकं काय? याचा पत्ता कुणालाच नाही; मात्र दर्शन तर दर सोमवारी घ्यायचं म्हणजे घ्यायचंच! नाला ओलांडून येताना प्रत्येकाच्या हातात चार-पाच लव्हाळी असायचीच. हातातल्या लव्हाळ्यांना खाली-वर करीत विजयी वीरांच्या थाटात डुबकीच्या महादेवाच्या दर्शनासाठी अवघड मार्गावरून जाताना कुठेतरी एक वेगळीच उर्मी असायची. रस्त्यावरच्या पाण्याच्या डबक्यांना लाथा हाणून पाणी एकमेकांकडे उडवताना वाटणारी गंमत काही निराळीच! घरी येताच मागच्या वाड्यात जाऊन स्वच्छ हात-पाय धुवून पाटावर बसून सर्वांबरोबर पोटभर जेवण. लगेच ओट्यावरच्या खांबाला टेकून साऱ्यांची वाट पाहणारं आतुरलेले मन! एक एक सवंगडी येताच रागाने 'किती उशीर केलास' असं रागावणं सगळ्यांना सुखावणारं असायचं. घरातून 'इतक्यात हुंदडू नका रेऽ' चा इशारा दिला जायचा आणि मग तासाभरानंतर लगोरीची धमाल. गल्लीभर पळापळी, ओरडणं, चिडणं पण तरीही खेळ चालूच राहणं हे नेहमीचंच होतं. मग सतरंजीवर व्यापार खेळताना वेळेचे भान राहणं शक्यच नसायचं. अचानक कोणाला तरी घरच्या अभ्यासाची आठवण यायची. मन लावून अभ्यास सुरू व्हायचा. सारा गृहपाठ व्यवस्थित झाल्यावर साऱ्यांचं आपआपल्या घरी जाणं व्हायचं. परत दुसऱ्या दिवसापासून पूर्णवेळ शाळा सुरू व्हायची. बालवयात पाप-पुण्याचा हिशोब मनात वेगळ्याच प्रकारे असतो. श्रद्धा इतकी ठाम असते की त्यापुढे सारे थिटे वाटते. प्रगतीने आपल्या पावलांनी शहरांची पूर्वीची ओळख पुसली जात असताना, अस्वस्थ होणाऱ्या मनाला आज परत उभारी आणण्यासाठी कारणीभूत ठरतात त्या बालवयातल्या साध्या साध्या निरागस आठवणी.

**उज्ज्वल कुळकर्णी**/पुणे. ९४२२२८८०६२

■■■

### आषाढ श्रावणाचं मैत्र

एका संध्या कातर वेळी श्रावण म्हणाला होता... आषाढा नुसता येऊ नकोस; फळवित फुलवित ये या अवनीला, मग मला घ्यायचाय हिरवा शेला विणायला. आषाढ म्हणाला... अरे श्रावणा, तू जरी रिमझिम रेशीम धारांनी येणार असलास तरी माझ्या आषाढ धारा या राकट दगडांनाही फोडतात पाझर आणि काळ्या आईच्या कुशीतून येतात वर बीजांकुर भरून येतो तिचा ऊर!श्रावण ऋणझुणला... अरे हो, पण मी नेसवणार अवनीला इंद्रधनू रंगाची पैठणी! त्यावर विविध फुलांची नक्षी आणि सोनेरी किरणांची जरी किनारी. मी घेऊन येणार श्रावण मेघ आणि घननिळा होऊन चितारणार अपूर्व पैठणी त्या धरणी मातेची! आषाढ म्हणाला... हो मग मी रुजवलेल्या बीजांकुरांना फुटेल हिरवी कंच पालवी आणि नटेल हिरवा शेला, वाढवण्या नजाकत त्या शालीन पैठणीची! अशी झाली मैत्र जुगलबंदी आषाढ-श्रावणाची... आता आहे चंगळ या बेशिस्त माणसाची... पण हे मानवा, आता तरी जबाबदारीने वाग आणि धर कास निसर्गाची...! मग हा हासरा श्रावण होईल नाचरा, मनात फुलवेल पिसारा आणि भिजल्या मातीचा मृदगंध आगळा आणि सप्तरंगी सृष्टीचा पसारा...'

**अमरजा परांजपे-ढुमे**/९४२१७९२२५९

■■■

### विद्यार्थ्यांना कुटुंब प्रबोधनाची गरज

काही दिवसांपूर्वी दिल्लीत विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले. अतिशय सामान्य नागरिक म्हणून या आंदोलनाकडे बघताना भविष्यात येणाऱ्या काही भयानक आपत्तींची चाहूल लागली म्हणून मत मांडावेसे वाटते. आपल्या पिढीने कोविडसारखी महामारी बघितली आहे आणि मी ज्या आपत्तीबद्दल बोलतो आहे ती त्यापेक्षाही मोठी आणि जगाला विळखा घालू बघणारी आहे. या आंदोलनातल्या 'जेन झी'च्या मागण्या काय होत्या, त्या वैध होत्या की नव्हत्या हा त्या आंदोलनाचा राजकीय भाग बाजूला ठेवू, फक्त नैतिक भागाचा विचार करू. ज्या प्रकारे ही निदर्शने केली गेली, ज्या पद्धतीची भाषा देशाच्या पंतप्रधानांबद्दल वापरली गेली, ज्या प्रकारे विकृत अंगविक्षेप सार्वजनिक व्यासपीठावर आणि सोशल मीडियावर आपण बघितले त्यावरून हे आंदोलन आपल्याच देशातल्या विद्यार्थ्यांनी आपल्याच देशाच्या सरकार विरुद्ध केले होते असे चित्र निर्माण होत होते का? या आंदोलनात विद्यार्थ्यांकरता सत्तारूढ व विरोधी पक्षांकडून 'बच्चे' असा शब्दप्रयोग करण्यात आला तर हे बच्चे बालिक होते की नाबालिक. ज्या अर्थी ते आपल्या मागण्या सरकार समोर मांडत होते त्याअर्थी त्यांना काय योग्य आणि काय अयोग्य हे कळत होते असे आपण समजू नये का? सर्व राजकीय पक्षांनी या गोष्टीचा विचार करावा की राजकारणात राजकीय महत्त्वाकांक्षा सगळ्यांच्याच असतात. आपणही उद्या सत्ता पक्षात असू शकतो. आपल्याही विरोधात अशी आंदोलने होऊ शकतात. म्हणून आज आपणच आंदोलन, आंदोलनाचे नियम आणि विधिनिषेध ठरवण्याची गरज आहे. आज विरोधकही राजकारण बाजूला ठेवले तर खाजगीत मान्य करतील की मोदींसारखा चारित्र्यसंपन्न, निष्कलंक जागतिक पातळीवर सन्मानित झालेला आणि बारा वर्षांत देशाचा कायापालट केलेला नेता आपल्याला पंतप्रधान म्हणून लाभला, अशा नेत्याविरुद्ध जर इतके अश्लील, विकृत आणि किळसवाणे प्रदर्शन जर ही युवाशक्ती करत असेल तर उद्या तुमची काय स्थिती होईल याची दखल आजच सर्व राजकीय पक्षांनी घेतली पाहिजे. निदर्शनात नैतिकतेचा निकष असायलाच हवा, नाहीतर भविष्यात निदर्शने आणि युद्ध यात फरक उरणार नाही. आज विरोधी पक्ष इतके नैराश्यात गेले आहेत की त्यांना आपण सत्तेत येऊच शकत नाही याची खात्री होऊन त्यांनी विधायक प्रयत्न सोडून याच मार्गाचा अवलंब करायचे ठरवले आहे? मग ही त्यांची राजकीय आत्महत्या असेल आणि त्यांना ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या कुटुंबीयांच्या मागे उभे राहण्याचा नैतिक अधिकार नाही. तुम्ही हे नाकारू शकत नाही की तुम्हीच कधीतरी पेरलेले आज उगवत आहे. कबूल आहे की बाहेरचे वातावरण चांगले नाही पण म्हणूनच त्याकरिता घर असते. कुटुंब प्रबोधनाची गरज इथेच लागते. ही मुले जेव्हा कॅमेऱ्यासमोर बोलत होती तेव्हा ती त्यांचे संस्कार आणि त्यांच्या घरातील वातावरण उघड करत होती. पुढच्यास ठेच मागचा शहाणा हे कधीतरी शिकले पाहिजे. ■

**श्रीराम लाखे**/९८५०३११२४५

# वाटाघाटी करू पण झुकणार नाही

## । पेझेश्कियन यांची अमेरिकेला धमकी । होर्मुझवर इराणचेच नियंत्रण कायम राहणार

**तेहरान, ८ ऑगस्ट**

आजच्या वृत्तामध्ये, इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी अमेरिकेसोबतच्या चर्चा आणि करारांविषयी काय म्हटले आहे. तसेच, इराण वाटाघाटी आणि चर्चा सुरू ठेवण्यास कटिबद्ध आहे, परंतु शत्रूपुढे कोणत्याही परिस्थिती शरणागती पत्करणार नाही. अमेरिकेसोबत चर्चा करणे आणि युद्ध संपवण्यासाठी करारावर स्वाक्षरी करण्याला देशाच्या सर्वोच्च नेत्याने परवानगी दिली आहे आणि आमची देखील देखील चर्चेने तोडगा काढण्याला प्राधान्य आहे. परंतु लष्करी कारवाईचा वापर झाल्यास ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल, अशी धमकी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी अमेरिकेला दिली.





पेझेश्कियान यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटले की, जोपर्यंत अमेरिका करारांतर्गत आपली वचनबद्धता पूर्ण करत राहील, तोपर्यंत इराणदेखील आपली जबाबदारी पार पाडेल. अमेरिकेसोबत करार करण्यात इराणचे सर्वोच्च नेतृत्व तयार आहे, मात्र होर्मुझवरील दावा कोणत्याही परिस्थितीत सोडला जाणार नाही. मागील ६० दिवसांच्या संघर्षविरामाचे अमेरिकेने उल्लंघन केले आणि त्यांनी इराणवर हल्ले करून संघर्षास सुरुवात केली. देशाच्या सुरक्षेसाठी आम्हाला प्रत्युत्तर द्यावे लागले. आखाती देशांनी या संघर्षातून दूर राहायला हवे, त्यांनी अमेरिकन लष्कराला मदत करणे खपवून घेणार नाही. करारासाठी वाटाघाटी करण्यास आम्ही तयार असून शत्रूच्या अटींवर तो होणार नाही. इराण शरण येईल अशी त्यांची भूमिका असेल तर, ही त्यांनी सर्वात मोठी चूक आहे. गेल्या सहा महिन्यातील संघर्षात आमच्या ताकदीची शत्रूला जाणीव झाली आहे, पुन्हा आगळिक करण्याचा प्रयत्न झाल्यास त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा त्यांनी दिला.

**युद्ध पुढे नेण्याचे पर्याय मर्यादित**

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धातून इराण मागे हटण्यासह तयार नाही. आता अमेरिकेसमोर हे युद्ध पुढे नेण्याचे पर्याय अत्यंत मर्यादित होत चालले आहेत. अशातच अमेरिकन लष्कराचे वरिष्ठ अधिकारी आणि 'जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ'चे अध्यक्ष जनरल डॅन केन यांनी ट्रम्प प्रशासनाला या युद्धातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्याचा सल्ला दिला आहे.

केन यांनी सीआयए संचालक जॉन रॅटक्लिफ, परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ आणि उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स यांच्याशी चर्चा करताना स्पष्ट केले की, केवळ इराणवर बॉम्बफेक करून युद्ध जिंकणे शक्य नाही. युद्धाला अधिक तीव्र करणारे लष्करी पाऊल अमेरिकेसाठीच घातक ठरू शकते. (वृत्तसंस्था)

### घटत्या शस्त्रसाठ्याने वाढवली चिंता

लष्करासमोरील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे अमेरिकेचा झपाट्याने संपणारा शस्त्रसाठा. दीर्घकाळ चालणाऱ्या या संघर्षामुळे इस्त्रायल आणि युक्रेनसारख्या मित्रदेशांना पुरवल्या जाणाऱ्या लष्करी मदतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यामुळे पेंटागॉन आणि सेंट्रल कमांड आपल्या रणनीतीचा पुनर्विचार करत आहेत. ■

# डॉल्फिन वादळाचा तडाखा; अडीच लाख लोकांचे स्थलांतर

## जपानमध्ये विध्वंसाची शक्यता; टोयोटाने काम थांबवले



चक्रीवादळामुळे जपानच्या क्यूशू भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्ते पाण्याखाली आल्याने वाहतूक विस्कळीत झाली

**टोकियो, ८ ऑगस्ट**

जपानच्या दिशेने सुमारे २०० किमी प्रतितास वेगाने डॉल्फिन वादळ पुढे सरकत असून, मोठ्या नैसर्गिक आपत्तीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पर्यायाने अडीच लाखपेक्षा अधिक लोकांना सुरक्षितस्थळी जाण्याचे निर्देश देण्यात आले. दुसरीकडे पाचशे हून अधिक विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. परिस्थिती पाहता टोयोटानेही आपल्या नऊ कारखान्यांमधील काम थांबवले आहे.

जपानच्या हवामान विज्ञान विभागाने डॉल्फिन वादळाचा इशारा दिला असून, २४ तासात देशाच्या विविध भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला. वाऱ्याचा वेग १४४ किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे. हे वादळ क्यूशू आणि ओकिनावा दरम्यान असलेल्या बेटांच्या दिशेने पुढे सरकत आहे. वादळामुळे जपानचे ओकिनावा बेट मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहे. तिथे सुट्ट्या घालवण्यासाठी गेलेले अनेक हाँगकाँगचे पर्यटक विमानांच्या उड्डाणे रद्द झाल्यामुळे अडकले आहेत. त्यांना आता आवश्यक वस्तूंची कमतरता, वीजपुरवठा खंडित होणे आणि पाणीपुरवठा बाधित होण्याची शक्यता यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे वाहत आहेत. (वृत्तसंस्था)

### चीनलाही बसणार फटका

डॉल्फिन वादळ वेगाने चीनच्या पूर्वेकडील किनाऱ्याकडे सरकत आहे. चीनच्या हवामान विभागाच्या मते, हे वादळ किनाऱ्यापासून सुमारे ८२० किलोमीटर दूर होते आणि रविवार दुपारपासून सोमवार सकाळपर्यंत झेजियांग आणि उत्तर फुजियान दरम्यान धडकण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने झेजियांग, फुजियान आणि तैवानमध्ये जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वादळाचा आवाका खूप मोठा आहे, त्यामुळे केवळ किनारी भागातीलच नव्हे तर अंतर्गत भागातील लोकांनाही सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. ■

### तृणमूलच्या माजी आमदाराला अटक

**कोलकाता, ८ ऑगस्ट**

खंडणी आणि निवडणुकीनंतरच्या हिंसाचाराचा आरोपात तृणमूल काँग्रेसचे माजी आमदार सनत डे यांना पोलिसांनी शनिवारी अटक केली. त्यांच्यावर खंडणी आणि भाजपा कार्यकर्त्यांना मारहाण केल्याचे आरोप आहेत. पोलिसांनी त्यांना सकाळी दत्तापुकुर येथे ताब्यात घेतले. त्यांना बॅरकपूर उपविभागीय न्यायालयात हजर केले जाण्याची शक्यता आहे. सनत डे यांच्या अटकेनंतर भाजपा कार्यकर्ते नैहाटी पोलिस ठाण्याबाहेर जमले आणि त्यांनी निदर्शने केली. ■

# माजी न्यायमूर्ती वर्मांवर कारवाईची मागणी स्वस्त प्रसिद्धीच्या उद्देशाने

### सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला फटकारले

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

शासकीय निवासस्थानाच्या परिसरात रोख रक्कम आढळल्यानंतर प्रसिद्धीच्या झोतात आलेले दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. वर्मा यांच्याविरोधात कारवाईची मागणी करणारी याचिका केवळ स्वस्त प्रसिद्धीसाठी दाखल करण्यात आली, अशा शब्दांत न्यायालयाने याचिकाकर्त्याला फटकारले.

या याचिकेत रोख रकमेच्या घोटाळ्यात अडकलेल्या वर्मा यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याची आणि न्यायालयाच्या देखरेखीखाली एसआयटी चौकशीची मागणी करण्यात आली होती. न्या. पी. एस. नरसिंह आणि न्याय आलोक आराधे यांच्या न्यायासनाने संबंधित याचिका सुनावणीस घेण्यास नकार दिला. युक्तिवाद करताना याचिकाकर्त्याने सांगितले की, वर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असला तरी, त्यांना मिळालेल्या रोकड रकमेच्या जबाबदारीतून त्यांची सुटका होत नाही. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हे लोकसेवक असतात आणि आता ते सेवानिवृत्त झाले असल्याने, त्यांना कायदेशीर कारवाईतून सूट दिली जाऊ नये. तथापि, न्यायासनाने याचिकाकर्त्याला फटकारत प्रसिद्धी मिळवण्याच्या उद्देशाने तुम्ही याचिका दाखल केली आहे. आम्ही हे प्रकरण ऐकण्यास इच्छुक नसल्याचे स्पष्ट करत याचिका फेटाळून लावली.

**काय आहे प्रकरण ?**

१४ मार्च २०२५ रोजी माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या शासकीय निवासस्थानी अचानक आग लागली. घटनेच्यावेळी वर्मा आणि त्यांच्या पत्नी मध्य प्रदेशात होते. आग विझवताना अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना जळालेल्या नोटांचे बंडल सापडले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता



### अक्षयचा नवा चित्रपट माफिया जगतावर

**मुंबई** : अक्षय कुमार आणि दिग्दर्शक अनीस बज्मी यांची अनटाइटल्ड ॲक्शन-कॉमेडी आता तिच्या निर्मितीच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. या चित्रपटाच्या कथेची पृष्ठभूमी आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी जगाशी संबंधित आहे, परंतु तिचे सादरीकरण पारंपरिक गँगस्टर ड्रामासारखे नसेल. चित्रपटाचा गाभा ॲक्शन आणि विनोदी परिस्थितींमध्ये संतुलन राखतो. चित्रपटाच्या मुंबईत झालेल्या चित्रीकरणाचे सर्वात मोठे आकर्षण विशाल तुरुंगाचा सेट होता. येथे अनेक विनोदी सीक्वेन्स चित्रित करण्यात आले. ज्यात विजय राजची भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्यांचे पात्र कोणत्याही पोलिसाचे नाही, तर सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित एका अनुभवी व्यक्तीचे आहे. त्यांच्या आजूबाजूला तयार केलेली विनोदी दृश्ये चित्रपटाच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक असतील. ■

### प्रियांकाच्या पदरी आणखी एक हॉलिवूडपट

**मुंबई** : अभिनेत्री प्रियांका चोप्रा आता आणखी एका मोठ्या आंतरराष्ट्रीय चित्रपटात दिसणार आहे. ती आगामी साय-फाय ॲक्शन थ्रिलर 'ब्लूफ्लाय'मध्ये ऑस्कर विजेते अभिनेते रसेल क्रो यांच्यासोबत स्क्रीन शेअर करणार आहे. निम्रॉड अँटल या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. डेव्हिड फ्रिजेरिओ, विल्यम यूबँक आणि कार्लाइल यूबँक यांनी चित्रपटाची पटकथा लिहिली आहे.



प्रियांका लवकरच एस. एस. राजामौली यांच्या बहुप्रतीक्षित 'वाराणसी' या चित्रपटातही दिसणार आहे. हा चित्रपट ७ एप्रिल २०२७ रोजी प्रदर्शित होईल. 'ब्लूफ्लाय' हा विज्ञानकथेच्या धाडसी संकल्पनेवर आधारित व्यक्तिरेखाकेंद्री ॲक्शन थ्रिलर असणार आहे. चित्रपटाचे मुख्य चित्रीकरण यावर्षीच्या उत्तरार्धात ऑस्ट्रेलियातील गोल्ड कोस्ट येथे सुरू होणार आहे. प्रियांकाच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्सच्या यादीत आता याची भर पडली आहे. ■

### लवकरच पूर्ण होणार शत्रुघ्न सिन्हांचा माहितीपट

**मुंबई** : ज्येष्ठ अभिनेते-राजकारणी शत्रुघ्न सिन्हा यांच्या जीवन आणि कारकीर्दीवरील एक माहितीपट पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. या शीर्षकहीन माहितीपटाचे दिग्दर्शन चित्रपट निर्माते शशी रंजन करत आहेत. सखोल ऐतिहासिक संशोधनानंतर सुमारे ९० टक्के चित्रीकरण पूर्ण झाले आहे.



हा सिन्हा यांच्या चित्रपट आणि राजकारणातील प्रवासाचा मागोवा घेणारा एक माहितीपट आहे. या माहितीपटात विविध चित्रपट उद्योग आणि सार्वजनिक जीवनातील अनेक प्रमुख व्यक्तींचा समावेश होण्याची शक्यता आहे. या यादीत रजनीकांत, चिरंजीवी, मोहन बाबू, सलमान खान, आमिर खान आणि अनिल कपूर यांचा समावेश आहे. हा माहितीपट शत्रुघ्न सिन्हा यांच्या हिंदी चित्रपटसृष्टीतील उदयाचा मागोवा घेईल. सिन्हा यांनी १९६९ मध्ये पडद्यावर पदार्पण केले. ■

# सरकार, विद्यार्थ्यांमधील चर्चा निष्फळ

## । झारखंड परीक्षा आंदोलन । उपोषण सुरूच राहणार

**रांची, ८ ऑगस्ट**

झारखंडमधील भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेबाबतचे आंदोलन १४ व्या दिवशीही सुरूच राहिले. शुक्रवारी राज्य सरकार व आंदोलनकर्ते विद्यार्थी यांच्यात झालेली चर्चा कोणताही तोडगा न निघाल्याने निष्फळ ठरली. १४ वी जेपीएससी परीक्षा रद्द करण्यासह आपल्या सर्व मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन व उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय विद्यार्थ्यांनी घेतला आहे. जर सरकारने रविवारपर्यंत मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर १० ऑगस्ट रोजी नियोजित विधानसभेवर मोर्चा काढला जाईल, असा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला.

'जेपीएससी/जेएसएससी रिफॉर्म्स मंच'च्या १० सदस्यांचे शिष्टमंडळ आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सुदिव्य कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारी समिती यांच्यात चर्चेची पहिली फेरी पार पडली. यापूर्वीच्या ११ सदस्यांच्या समितीमध्ये एका वकिलाचा समावेश असल्यामुळे सरकारने आक्षेप घेतला होता; त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी शिष्टमंडळाची सुधारित यादी सादर केली व त्यानंतर ही बैठक झाली.

**चर्चा सकारात्मक**

बैठक सकारात्मक वातावरणात झाली व आमच्या मागण्यांचा विचार केला जाईल, अशी ग्वाही सरकारने दिली. तरीही, १४ व्या जेपीएससी परीक्षेच्या रद्दीकरणासह आमच्या सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे, असे 'जेपीएससी/जेएसएससी रिफॉर्म्स मंच'च्या एका नेत्याने बैठकीनंतर सांगितले. विद्यार्थी १४ वी झारखंड लोकसेवा आयोग (जेपीएससी) परीक्षा रद्द करण्याची मागणी करीत आहेत. तसेच, कथित अनियमिततेची सीबीआय किंवा राज्याबाहेरील निवृत्त उच्च न्यायालयीन न्यायाधीशांच्या समितीमार्फत स्वतंत्र चौकशी व्हावी आणि जेपीएससी व झारखंड कर्मचारी निवड आयोग (जेएसएससी) यामध्ये व्यापक सुधारणा केल्या जाव्यात, अशा मागण्याही त्यांनी केल्या आहेत. (वृत्तसंस्था)



रांची येथे जेपीएससी-जेएसएससी-सीजीएल परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्यावरून झारखंड सरकारविरुद्ध सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान, अनेक विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ बेमुदत उपोषण करताना विद्यार्थी नेते देवेंद्र नाथ महतो

# हनी ट्रॅपमध्ये अडकला हवाई दलाचा अधिकारी

## पाक दलालांना माहिती दिल्याचा आरोप

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून हनी-ट्रॅपमध्ये अडकलेल्या एका विंग कमांडरला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती भारतीय हवाई दलाच्या (आयएएफ) अधिकाऱ्यांनी दिली. आरोपी अधिकारी सक्रिय निगराणीखाली होता आणि आता त्याला कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

भारतीय हवाई दलाने शासकीय गुप्तता कायद्यांतर्गत अशा गुन्ह्यांबाबत आपली शून्य सहनशीलता पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, तो सक्रिय निगराणीखाली होता आणि त्याला योग्य कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या ताब्यात देण्यात आले. सक्रिय उपाययोजनांमुळे त्याला पकडण्यात आले. अशा कारवायांबाबत हवाई दलाची शून्य सहनशीलता आहे.

दिल्ली पोलिसांच्या सूत्रांनुसार, संवेदनशील संरक्षण माहिती लीक केल्याच्या आरोपाखाली हवाई दलाच्या एका विंग कमांडरला अटक करण्यात आली आहे. तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. त्या अधिकाऱ्यावर शासकीय गुप्तता कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यावर गोपनीय संरक्षण माहिती आणि गुप्त कागदपत्रे शेअर केल्याचा आरोप आहे. पाकिस्तानी गुप्तचर एजंट्सनी रचलेल्या हनी ट्रॅपमध्ये हवाई दलाचा हा अधिकारी कथितरित्या बळी ठरला. त्याच्यावर एका सहकाऱ्याच्या मोबाईल फोनमध्ये माहिती चोरणारे सॉफ्टवेअर इन्स्टॉल केल्याचाही आरोप आहे. त्या मोबाईल फोनवर ताबा मिळवणे हा त्याचा कथित उद्देश होता.

**सोशल मीडियाच्या माध्यमातूनहोता संपर्कात**

पोलिसांनुसार, गतवर्षी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अलवरच्या एका रहिवाशाला अटक करण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

### अभिषेकची सर्वोच्च न्यायालयात धाव

**कोलकाता, ८ ऑगस्ट**

तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी कलकत्ता उच्च न्यायालयात डोळ्यांच्या उपचारासाठी विदेशात जाण्यास परवानगी मागीतली होती. परंतु, न्यायालयाने परवानगी देण्यास नकार दिला. या निर्णयाला त्यांनी सर्वोच्च् न्यायालयात आव्हान दिले आहे. कलकत्ता उच्च न्यायालयाने अभिषेक एसएसकेएम रुग्णालयातील वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करून घेण्यास तयार नसल्याचे सांगत त्यांची याचिका फेटाळली होती. विदेशात उपचाराची गरज केवळ वैद्यकीय मंडळाच्या तज्ज्ञांच्या मतानुसारच ठरवली जाऊ शकते, असेही न्यायालयाने म्हटले होते. यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला आठवडाभरात त्यांच्या याचिकेवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. (वृत्तसंस्था)

# भारत तयार करणार सहाव्या पिढीचे लढाऊ विमान

## भारतीय हवाई दलाला अधिक शक्तिशाली करणार

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

भारत फ्रान्सच्या नेतृत्वाखाली सहाव्या पिढीच्या लढाऊ विमान तयार करणार आहे, अशी माहिती भारतीय संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे. यासाठी विमानांच्या 'फ्युचर कॉम्बॅट एअर सिस्टीम' या कार्यक्रमात सामील होण्यासाठी एकत्रित प्रयत्न सुरू केले आहेत. यूके-इटली-जपानच्या 'ग्लोबल कॉम्बॅट एअर प्रोग्राम'चे देखील मूल्यांकन केले जात असल्याचे मंत्रालयाने सांगितले आहे.

भारताची संरक्षण सज्जता एका महत्त्वपूर्ण वळणावर पोहोचली आहे. फ्रान्स सरकारच्या नेतृत्वाखालील सहाव्या पिढीच्या लढाऊ विमानांच्या विकास कार्यक्रमात, म्हणजेच 'फ्युचर कॉम्बॅट एअर सिस्टीम'मध्ये सामील होण्यासाठी एकत्रित आणि समन्वित प्रयत्न सुरू केले आहेत, असे संरक्षण मंत्रालयाने संसदीय स्थायी समितीला कळवले आहे. यूके, इटली आणि जपानच्या 'ग्लोबल कॉम्बॅट एअर प्रोग्राम'चे देखील मूल्यांकन केले जात आहे. याचा उद्देश २०४० पर्यंत भारताची हवाई शक्ती मजबूत करणे हा आहे, कारण त्या काळात आधुनिक धोके वेगाने बदलतील. सहाव्या पिढीच्या प्रणाली, ज्यात स्टेल्थ तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निर्णयक्षमता, लॉयल विंगमन ड्रोन आणि नेटवर्कयुक्त युद्धक्षमता यांचा समावेश आहे, भविष्यातील युद्धाला आकार देतील.

'फ्युचर कॉम्बॅट एअर सिस्टीम'ची सुरुवात २०१७ मध्ये फ्रान्स आणि जर्मनी यांच्यात झाली. नंतर स्पेनही यात सामील झाला. केवळ नवीन विमान विकसित करणे हे उद्दिष्ट नव्हते, तर ज्यात मुख्य लढाऊ विमान, दूरस्थ वाहक ड्रोन आणि 'कॉम्बॅट क्लाउड' नावाचे डेटा नेटवर्क यांचा समावेश असलेली एक अशी संपूर्ण प्रणाली तयार करणे हे होते. हे नेटवर्क विमाने, ड्रोन, भूदल आणि नौदल यांना माहितीची देवाणघेवाण करण्यास अनुमती देणार होते. तथापि, नेतृत्व, कामाचे वाटप आणि बौद्धिक संपदा यावरून एअरबस आणि डसॉल्ट एव्हिएशन यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले. (वृत्तसंस्था)



### 'ॲडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट' हा स्वदेशी प्रयत्न

'अडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट' तयार करणे हा पूर्णपणे स्वदेशी प्रयत्न आहे. त्यात सेन्सर फ्युजन, स्टेल्थ आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध यांसारख्या क्षमता असतील. परंतु सहाव्या पिढीमध्ये अधिक प्रगत एआय-आधारित स्वायत्त निर्णय, मानवरहित ड्रोनसोबतची भागीदारी आणि क्लाउड नेटवर्किंग यांचा समावेश असेल. भारताला दोन्ही मार्गांचा अवलंब करायचा आहे. एकीकडे, ते एएमसीएला पुढे नेत आहे, तर दुसरीकडे, ते एफसीएएस किंवा जीकॅप सारख्या प्रकल्पांमधून तंत्रज्ञान मिळवत आहे. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### डेव्हिस चषक पात्रता सामने दक्षिण कोरियात

**नवी दिल्ली :** डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत पात्रतेच्या दुसऱ्या फेरीतील भारताचे सामने दक्षिण कोरियात होणार आहे. १८ व १९ सप्टेंबर रोजी सोल येथील ऑलिम्पिक टेनिस सेंटरमध्ये हार्ड कोर्टवर हे सामने खेळविले जाणार आहे. यामुळे तुल्यबळ असलेल्या या दोन संघांमध्ये एक चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. डेव्हिस चषकाच्या मानांकनात भारत सध्या १९ व्या, तर कोरिया १६ व्या स्थानावर आहे; तसेच भारताविरुद्ध दक्षिण कोरियाचा विजयाचा रेकॉर्ड ६-५ असा आहे. या महत्त्वपूर्ण लढतीसाठी भारत १० ऑगस्ट रोजी आपला संघ जाहीर करेल. या दोन संघांमधील शेवटची लढत एका दशकापूर्वी झाली होती; २०१६ मध्ये चंदीगड येथे ग्रास कोर्टवर खेळल्या गेलेल्या 'आशिया/ओशनिया गट १' च्या सामन्यात भारताने ४-१ असा विजय मिळविला होता. कोरियाचे खेळाडू पारंपरिकरीत्या हार्ड कोर्टवर खेळण्यास अधिक सहजता अनुभवतात आणि म्हणूनच जेव्हा हे संघ शेवटचे आमनेसामने आले होते, तेव्हा भारताने मुद्दामहून ग्रास कोर्टची निवड केली होती. फेब्रुवारीमध्ये बेंगळुरू येथे नेदरलँड्सवर ३-२ असा नाट्यमय विजय मिळवून भारताने दुसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. दक्षिणेश्वर सुरेश या विजयाचा नायक ठरला; त्याने आपल्या दोन्ही एकेरीच्या लढती जिंकल्या आणि युकी भाम्बरीच्या साथीने दुहेरीचा सामनाही जिंकला. निर्णायक पाचव्या सामन्यात गाय डेन ओडेनचा ६-४, ७-६(४) असा पराभव करून त्याने भारताचा विजय निश्चित केला.

### ॲण्ड्रयू फ्लिंटॉफचा मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा

**लंडन :** माजी अष्टपैलू खेळाडू ॲण्ड्रयू फ्लिंटॉफने 'इंग्लंड लायन्स'च्या मुख्य प्रशिक्षकपदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. फ्लिंटॉफने सप्टेंबर २०२४ मध्ये ही जबाबदारी स्वीकारली होती. इंग्लंडच्या सर्वोत्तम युवा क्रिकेटपटूंच्या जडणघडणीत मदत केल्याचा त्यांना अभिमान वाटतो. दुर्दैवाने, मी 'लायन्स'मधील माझ्या भूमिकेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे, असे ४८ वर्षीय फ्लिंटॉफने म्हटले आहे. देशातील सर्वोत्तम युवा क्रिकेटपटूंसोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा मला आनंद तर झालाच, पण त्यांची प्रगती पाहताना मला खूप अभिमानही वाटला, असेही त्याने नमूद केले. 'टॉप गिअर' या दूरदर्शन कार्यक्रमाच्या चित्रीकरणादरम्यान झालेल्या एका गंभीर अपघातानंतर क्रिकेटमध्ये परतलेल्या फ्लिंटॉफने आता 'बिग बॅश लीग'मधील 'सिडनी थंडर' संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. या वर्षाच्या उत्तरार्धात 'सिडनी थंडर'सोबत काम सुरू करण्यासाठी आणि प्रशिक्षक म्हणून माझा प्रवास कसा पुढे जातो हे पाहण्यासाठी मी खूप उत्सुक आहे, असे तो म्हणाला. १२ ऑगस्टपासून बेकेनहॅम येथे पाकिस्तानच्या पुरुष संघाविरुद्ध होणाऱ्या चार दिवसांच्या काऊंटी क्रिकेट सामन्यासाठी फ्लिंटॉफच्या जागी माईक यार्डीची नियुक्ती करण्यात आली आहे.

### मेस्सीला पितृशोक

**ब्यूनस एअरस :** अर्जेंटिना फुटबॉल संघाचा कर्णधार लिओनेल मेस्सीचे वडील आणि दीर्घकाळापासून त्याचे प्रतिनिधी म्हणून काम पाहणारे जॉर्ज मेस्सी यांचे दीर्घ आजारानंतर निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते.



गेल्या काही महिन्यांपासून जॉर्ज यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. ते एका आरोग्यविषयक समस्येचा सामना करत आहेत आणि वैद्यकीय देखरेखीखाली आहेत अशी जून महिन्यात मेस्सी कुटुंबाने पुष्टी केली होती. मेस्सीच्या बालपणीच्या क्लबने- 'नेवेल्स ओल्ड बॉईज'ने शनिवारी जॉर्ज यांच्या निधनाची पुष्टी केली. क्लबने अत्यंत दुःख आणि शोकाकुल अंतःकरणाने त्यांना निरोप दिला. क्लबने त्यांचे वर्णन एक निष्ठावान समर्थक, व्यावसायिक आणि अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीचे वडील अशा शब्दांत केले. ■

# देवदत्तची १४२ धावांची खेळी

### भारताचे श्रीलंका एकादशला चोख प्रत्युत्तर

**कोलंबो, ८ ऑगस्ट**

येथे श्रीलंका एकादशविरुद्ध सुरू असलेल्या तीन दिवसीय सराव सामन्याच्या दुसऱ्या दिवशी देवदत्त पडिक्कलने (नाबाद १४२) झळकावलेल्या शतक व रवींद्र जडेजाच्या (६३) अर्धशतकासह केएल राहुल (४०) व मानव सुथारने (४१) केलेल्या तडाखेबंद फलंदाजीच्या बळावर भारताने ९० षटकांत ६ बाद ३५७ धावा उभारल्या. सकाळच्या सत्रात श्रीलंका एकादशने कालच्या ८ बाद ३६३ धावांवर आपला पहिला डाव घोषित केल्यानंतर दिवस अखेरपर्यंत भारताने चोख प्रत्युत्तर दिले.

दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारत केवळ सहा धावांनी पिछाडीवर होता व त्यांच्याकडे एक फलंदाज शिल्लक होता (जरी तीन फलंदाज 'जखमी निवृत्त' झाले होते). शतक पूर्ण केल्यावर 'जखमी निवृत्त' झालेला पडिक्कल दिवसाच्या उत्तरार्धात पुन्हा फलंदाजीला आला आणि १६४ चेंडूंमध्ये १४२ धावांवर नाबाद राहिला. त्याच्यासोबत गुरनूर ब्रार होता. ब्रारनेही अंधुक प्रकाशात १८ चेंडूंमध्ये चार षटकारांसह ३६ धावा फटकावत







आपली आक्रमक फलंदाजीची क्षमता दाखवून दिली. प्रत्युत्तर देताना भारताला दुसऱ्याच चेंडूवर हादरा बसला, विश्वा फर्नांडोने यशस्वी जयस्वालला (०) थिलकरत्नेकडून झेलबाद केले. मात्र त्यानंतर केएल राहुल व देवदत्त पडिक्कलने श्रीलंकेच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत भारताच्या धावसंख्येला आकार दिला. राहुल व देवदत्तने दुसऱ्या गड्यासाठी ९६ धावांची भागीदारी केली. नुवांथाने त्रिपळा उडविण्यापूर्वी राहुलने ६७ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ४० धावांची खेळी केली. नंतर देवदत्त व रवींद्र जडेजाची जोडीसुद्धा खेळपट्टीवर चांगली जमली. जखमी निवृत्त होण्यापूर्वी जडेजाने ११७ चेंडूंत ७ चौकारांसह ६३ धावांची भर घातली. ऋषभ पंत ( २) व ध्रुव जुरेल (१) लवकरच बाद झालेत, मात्र मानव सुथारने मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. आसंका मनोजने पायचीत करण्यापूर्वी सुथारने ९० चेंडूंचा सामना करीत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ४१ धावा ठोकल्या. आसंकाने आपल्याच गोलंदाजीत मोहम्मद सिराजला (१) झेलबाद केले. कुलदीप यादव (१) व सारांश जैन (२२) हे जखमी निवृत्त झालेत. दिवस अखेर जखमी निवृत्त झालेला देवदत्त पडिक्कल पुन्हा मैदानावर आला व त्याने गुरनूर ब्रारसोबत नाबाद खेळी करीत भारताला ९० षटकांत ६ बाद ३५७ धावांचा टप्पा गाठून दिला. देवदत्त पडिक्कलने १६४ चेंडूंचा सामना करीत १८ चौकारांसह नाबाद १४२ धावांची खेळी केली.

श्रीलंका एकादशकडून रमेश मेंडिस व आसंका मनोजने प्रत्येकी २ बळी टिपलेत. विश्वा फर्नांडो व केशरा नुवांथाने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# अस्मिता चलिहा अंतिम फेरीत

### कोरिया मास्टर्स बॅडमिंटन

**आसन, ८ ऑगस्ट**

अस्मिता चालिहाने कोरिया मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत दिग्गज खेळाडूंना हरवण्याची आपली विजयी घोडदौड कायम ठेवत, शनिवारी येथे खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्यात आपल्याच देशाच्या किशोरवयीन खेळाडू रक्षिता श्री संतोष रामराजवर ४८ मिनिटांत २१-१३, १६-२१, २१-१३ असा विजय मिळवून पहिल्यांदाच बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर अंतिम फेरीत प्रवेश केला.

उजव्या गुडघ्याच्या मेडियल मेनिस्कस टियरमुळे तीन महिन्यांच्या विश्रांतीनंतर मे महिन्यात स्पर्धेत पुनरागमन करणाऱ्या या २६ वर्षीय भारतीय खेळाडूने बीडब्ल्यूएफ टूरवर दमदार पुनरागमन केले आहे, यात मकाऊ ओपनमधील उपांत्य फेरीपर्यंतच्या कामगिरीचा समावेश आहे.

उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या अव्वल मानांकित आणि जागतिक क्रमवारीत २२ व्या क्रमांकावर असलेल्या हिना अकेचीला धक्का देणाऱ्या अस्मिताने आक्रमक खेळ




करत पहिल्याच गेममध्ये २-२ वरून झटपट ६-२ अशी आघाडी घेतली. त्यानंतर तिने सलग पाच गुण मिळवून १३-६ अशी आघाडी घेतली आणि २१-१३ ने गेम जिंकला.

उपांत्यपूर्व फेरीत एक गेमने पिछाडीवर असताना पुनरागमन करून तिसऱ्या मानांकित आणि स्वदेशीय तन्वी शर्माला पराभूत करणाऱ्या रक्षिताने जोरदार प्रत्युत्तर दिले. पुलेला गोपीचंद अकादमीच्या १९ वर्षीय प्रशिक्षणार्थीने ४-१ अशी आघाडी घेतली आणि ती १२-६ पर्यंत वाढविली, पण अस्मिताने चिवट झुंज देत १३-१२ अशी बरोबरी साधली. मात्र, रक्षिताने संयम राखत २१-१६ अशा स्थितीत सामना निर्णायक गेममध्ये नेला.

मात्र, अस्मिताने तिसऱ्या गेममध्ये पुन्हा नियंत्रण मिळवत ८-१ अशी आघाडी घेतली आणि ती कायम राखत २१-१३ ने सामना जिंकून आपले पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनलमधील स्थान निश्चित केले. (वृत्तसंस्था)

# जेमिमाह 'द हंड्रेड' स्पर्धेतून बाहेर

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

भारतीय फलंदाज जेमिमाह रॉड्रिग्ज 'सदर्न ब्रेव्ह' संघाकडून खेळताना पायाच्या दुखापतीमुळे सध्या सुरू असलेल्या 'द हंड्रेड' क्रिकेट स्पर्धेतून बाहेर झाली आहे. या दुखापतीमुळे आगामी महिला टी-२० आशिया चषकातील तिचा सहभागही अनिश्चित मानल्या जात आहे.

स्पर्धेच्या उर्वरित सामन्यांसाठी रॉड्रिग्जच्या जागी ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू खेळाडू चार्ली नॉट हिची निवड करण्यात आल्याचे 'सदर्न ब्रेव्ह'ने शनिवारी जाहीर केले.

आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की जेमिमाह रॉड्रिग्जला दुखापत झाल्यामुळे, 'द हंड्रेड' स्पर्धेच्या उर्वरित कालावधीसाठी तिच्या जागी चार्ली नॉट हिचा संघात समावेश करण्यात आला आहे.

जेमी, तू लवकर बरी होशील अशी आशा आहे, असे 'सदर्न ब्रेव्ह'ने 'एक्स'वर पोस्ट केले आहे.



जेमिमाह रॉड्रिग्ज

२५ वर्षीय जेमिमाहने 'ब्रेव्ह' संघासाठी सहा डावांत ३५.७५ ची सरासरी आणि १३१.१९ च्या स्ट्राईक रेटसह एकूण १४३ धावा केल्या आहेत; यात ४२ धावांची नाबाद खेळी ही तिची सर्वोत्तम कामगिरी ठरली.

महिला टी-२० आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला २८ ऑगस्टपासून सुरुवात होत असून, भारतीय संघ ३० ऑगस्ट रोजी थायलंडविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे.

या स्पर्धेसाठी तंदुरुस्त होण्याकरिता जेमिमाहकडे दुखापतीतून सावरण्यासाठी तीन आठवड्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. (वृत्तसंस्था)

### नीरज चोप्राकडून आशिषचे अभिनंदन

**नवी दिल्ली :** ऑलिम्पिक पदक विजेते नीरज चोप्राने भारतीय भालाफेकपटू आशिष यादवचे 'जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले आहे. आशिषचा अभिमान वाटतो. एका भालाफेकपटूच्या दृष्टीकोनातून ही कामगिरी विशेष असल्याचे त्याने म्हटले आहे.

आशिषने पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत ७४.०९ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह दुसरे स्थान पटकावले. भविष्यात आशिष आणखी मोठे यश मिळवेल असा विश्वास राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या नीरजने व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय खेळाडूंना स्पर्धा करताना आणि जिंकताना पाहणे नेहमीच आनंददायी असते; पण भालाफेकपटू म्हणून माझ्यासाठी ही कामगिरी अधिक खास आहे. आशिष, तुझा खूप अभिमान वाटतो; ही तर केवळ सुरुवात आहे! असे चोप्राने एक्सवर लिहिले. भालाफेक स्पर्धेत टी. धरणीधरण याने ही स्पर्धा सहाव्या स्थानावर पूर्ण केली. ■

# आशिष यादवने उघडले भारताचे पदक खाते

### ● जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स ● पूजा सिंग अंतिम फेरीसाठी पात्र

**युजीन, ८ ऑगस्ट**

जागतिक २० वर्षांखालील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या भालाफेक प्रकारात आशिष यादवने रौप्यपदक जिंकून भारताचे पदक खाते उघडले, तर महिलांच्या उंच उडी प्रकारात राष्ट्रीय वरिष्ठ विक्रमधारक पूजा सिंगने अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली.

यादवने तिसऱ्या फेरीत ७४.०९ मीटर अंतरावर भाला फेकून रौप्यपदक पटकावले; याच स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहभागी असलेला दुसरा भारतीय खेळाडू टी. धरणीधरण ७२.३५ मीटरच्या कामगिरीसह सहाव्या स्थानावर राहिला.

यादवची ही कामगिरी त्याच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीपेक्षा (७४.४९ मीटर) ४० सेंटीमीटरने कमी होती; त्याने ही सर्वोत्तम कामगिरी मार्चमध्ये पतियाळा येथे झालेल्या 'इंडियन ओपन भालाफेक' स्पर्धेत नोंदविली होती.

दोनदा ऑलिम्पिक पदक




आशिष यादव

जिंकणाऱ्या नीरज चोप्रानंतर, या प्रकारात रौप्यपदक जिंकणारा १९ वर्षीय आशिष यादव हा दुसरा भारतीय खेळाडू ठरला.

चोप्राने २०१६ मध्ये पोलंड येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते आणि ८६.४८ मीटरचा जागतिक कनिष्ठ विक्रम प्रस्थापित केला होता, हा विक्रम अजूनही कायम आहे.

सुवर्णपदक दक्षिण आफ्रिकेच्या जान-हेंड्रिक हेमनसने जिंकले; त्याने आपल्या सहाव्या आणि अंतिम प्रयत्नात ८०.५० मीटर अंतरावर भाला फेकला. डोमिनिकाच्या ॲडिसन जेम्सने ७३.८९ मीटरच्या कामगिरीसह कांस्यपदक जिंकले.

पुरुषांच्या ४०० मीटर शर्यतीच्या पहिल्या फेरीत (हीट) ४५.८१ सेकंदांची वेळ नोंदवून २० वर्षांखालील गटातील राष्ट्रीय विक्रम मोडणाऱ्या मोहम्मद अशफाकने अंतिम फेरीत ४६.२० सेकंदांची वेळ नोंदवित आठवे स्थान मिळवले.

अमेरिकेच्या जेडेन डेलिओनने ४४.४७ सेकंदांची वेळ नोंदवून स्पर्धेच्या विक्रमासह सुवर्ण पदक जिंकले, तर त्याचाच देशबांधव क्विन्सी विल्सन ४४.६२ सेकंदांच्या वेळेसह रौप्य पदकाचा मानकरी ठरला. दक्षिण आफ्रिकेच्या लिंडर्ट कोकेमोरने ४४.९६ सेकंदांच्या वेळेसह कांस्यपदक पटकावले.

महिलांच्या उंच उडी (हाय जंप) प्रकारात १.७९ मीटरची उंची यशस्वीपणे पार करून पूजाने अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली. पात्रता फेरीतील दोन गटांमधील ज्या १४ खेळाडूंनी १.७९ मीटरची उंची पार केली, त्या सर्वांना अंतिम फेरीत स्थान मिळाले. १९ वर्षीय पूजाच्या नावावर १.९३ मीटरचा राष्ट्रीय वरिष्ठ विक्रम जमा आहे.

पुरुषांच्या लांब उडी प्रकारात, शाहनवाज खान व जिथिन अर्जुन या दोघांनीही पात्रता फेरीनंतर अंतिम फेरीत धडक मारली. शाहनवाजने पात्रता फेरीच्या 'गट अ' मध्ये चौथे स्थान मिळविले; तसेच आपल्या तिसऱ्या व अंतिम प्रयत्नात ७.७३ मीटरची उडी मारून त्याने एकूण पाचवे स्थान पटकावले. जिथिननेही अंतिम फेरी गाठली; त्याने आपल्या तिसऱ्या आणि अंतिम प्रयत्नात ७.५७ मीटरची उडी मारून एकूण १२ वे स्थान मिळविले आणि अंतिम फेरीसाठी उपलब्ध असलेले शेवटचे स्थान निश्चित केले.

पूनमला महिलांच्या भालाफेक प्रकाराच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरता आले नाही; तिने पात्रता गटात आठवे आणि एकूण १३ वे स्थान मिळवले, तसेच तिची त्या दिवसातील सर्वोत्तम कामगिरी ४८.८१ मीटर इतकी होती. (वृत्तसंस्था)

# देवदत्तचे कसोटीतील स्थान निश्चित होण्याची शक्यता

**बंगळुरू, ८ ऑगस्ट**

शनिवारी कोलंबो येथे 'श्रीलंका एकादश'विरुद्धच्या सराव सामन्यात झळकावलेले शतक आणि दुखापतीमुळे साई सुदर्शनची अनुपस्थिती, यामुळे गॅले येथे होणाऱ्या आगामी पहिल्या कसोटी सामन्यात भारताच्या अंतिम अकरा खेळाडूंच्या संघात देवदत्त पडिक्कलचे स्थान निश्चित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मात्र, जवळपास दोन वर्षांनंतर भारतीय कसोटी संघात पुनरागमन करण्याच्या या संधीचा पाया कोलंबोला जाण्यापूर्वी त्याचे बालपणीचे प्रशिक्षक मोहम्मद नसीरुद्दीन यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या दीर्घकालीन सरावादरम्यानच रचला गेला होता.

श्रीलंकेच्या फिरकी गोलंदाजांच्या आक्रमणाचा सामना करण्यासाठी या जोडीने एक योजना आखली आणि भरपूर वळण मिळणाऱ्या खेळपट्ट्यांवर 'कुकबुरा' चेंडूंनी सराव केला.

केएससीए महाराजा ट्रॉफी टी-२० स्पर्धेनंतर देवदत्त माझ्याकडे आला. 'भारत अ' संघाच्या जबाबदाऱ्यांमुळे त्याला त्या स्पर्धेत केवळ एकच सामना खेळता आला होता, पण श्रीलंकेला जाण्यापूर्वी त्याला लाल चेंडूने सराव सुरू करायचा होता, असे नसीरुद्दीन यांनी सांगितले. श्रीलंका 'अ' संघाविरुद्धच्या सामन्यांत या डावखुऱ्या फलंदाजाने ६७ व ९४ धावांची प्रभावी खेळी केली होती, तरीही कसोटी मालिकेपूर्वी त्याला आपल्या खेळात अधिक सुधारणा करायची होती. त्यावेळी अंतिम अकरा खेळाडूंमध्ये स्थान मिळेल की नाही, याचा त्याने विचार केला नाही. त्याला शक्य तितक्या उत्तम प्रकारे तयारी करायची होती आणि संधी मिळाल्यास सज्ज राहायचे होते. म्हणून आम्ही सामान्य लाल चेंडूंनी सराव सुरू केला. पण नंतर आम्हाला सरावासाठी 'कुकबुरा' चेंडू वापरण्याची कल्पना सुचली, कारण श्रीलंकेतील कसोटी सामन्यांमध्ये याच चेंडूंचा वापर केला जातो. त्यामुळे त्याने ते चेंडू विकत घेतले आणि आम्ही त्यांच्या साहाय्याने सराव करण्यास सुरुवात केली, असे त्यांनी सांगितले.

पण ती समस्येच्या केवळ एका भागाशी संबंधित बाब होती. श्रीलंकेच्या भूमीवर तिथल्या फिरकी गोलंदाजांचा सामना करणे हे एक कठीण आव्हान असते; म्हणूनच देवदत्त आणि नसीरुद्दीन यांनी बंगळुरूमध्ये श्रीलंकेसारख्या खेळपट्ट्या तयार करण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)

### शिलाँग लाजोंग एफसीचा मुंबई एफसीवर विजय

**शिलाँग, ८ ऑगस्ट**

प्रतिष्ठेच्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेत 'ग्रुप ई'च्या सामन्यात शिलाँग लाजोंग एफसीने मुंबई एफसीवर ५-० असा दणदणीत विजय मिळवित गटात अव्वल स्थान गाठले. एव्हरब्राइटसन साना याने दोन गोल केल्यामुळे शिलाँग लाजोंग एफसीने मुंबाय एफसीचा सहज पराभव केला. सानाशिवाय विजयी संघासाठी अभय गुरुंग, ट्रेमिकी लामुरोंग आणि फिगो सिंदाईने गोल नोंदविले. या विजयामुळे शिलाँग लाजोंगची स्पर्धेतील विजयी घोडदौड कायम राहिली. (वृत्तसंस्था)

# पहिल्या कसोटीतून साई सुदर्शन बाहेर

**कोलंबो :** भारताच्या फलंदाजीच्या नियोजनाला मोठा धक्का बसला असून, डाव्या हाताचा फलंदाज बी. साई सुदर्शन उजव्या पायाच्या अंगठ्याला झालेल्या दुखापतीमुळे श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीतून बाहेर झाला आहे. पहिला कसोटी सामना १५ ऑगस्टपासून गॅले येथे सुरू होत आहे. त्याचबरोबर, बंगळुरू येथील बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स' मध्ये पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करत असलेल्या सुदर्शनच्या, मालिकेतील दुसऱ्या आणि अंतिम सामन्यातील (जो २३ ते २७ ऑगस्ट दरम्यान कोलंबोमध्ये खेळवला जाणार आहे) सहभागाबाबतही अनिश्चितता आहे. साई पहिल्या कसोटीतून निश्चितपणे बाहेर पडला आहे, कारण उजव्या पायाच्या अंगठ्यातील वेदनेतून पूर्णपणे सावरण्यासाठी त्याला आणखी काही कालावधीची गरज आहे. वैद्यकीय पथक त्याच्या प्रगतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. ■

# रायबाकिना चौथ्या फेरीत, मीरा आंद्रेव्हा बाहेर

### टोरंटो ओपन टेनिस

**टोरंटो, ८ ऑगस्ट**

ऑस्ट्रेलियन ओपनची विद्यमान विजेती एलेना रायबाकिनाने डब्ल्यूटीए टोरंटो मास्टर्स टेनिस स्पर्धेच्या चौथ्या फेरीत धडक मारली, तर फ्रेंच ओपन विजेती मीरा आंद्रेव्हा हिला कॅनडाच्या लेला फर्नांडिसकडून पराभवाचा सामना करावा लागला.

कझाकस्तानची आणि जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेली रायबाकिना हिने अमेरिकेच्या २८ व्या मानांकित ॲन लीचा ९० मिनिटांत ६-२, ७-५ असा पराभव केला. तिने मिळालेल्या सहापैकी पाच 'ब्रेक पॉइंट्स' जिंकले आणि स्वतःवर आलेली चारपैकी दोन 'ब्रेक पॉइंट्स'ची संकटे परतवून लावली.

२०२२ चे विम्बल्डन विजेतेपद पटकावणाऱ्या रायबाकिनाने आता उप-उपांत्यपूर्व फेरीत रशियाच्या ल्युडमिला सॅमसोनोव्हाविरुद्धचा



सामना निश्चित केला. सॅमसोनोव्हाने ऑस्ट्रेलियाच्या माया जॉइंटचा ७-५, ६-७ (३/७), ६-२ असा पराभव करून पुढची फेरी गाठली. सॅमसोनोव्हाचे रायबाकिनाविरुद्धच्या कारकिर्दीतील सामन्यांचे रेकॉर्ड ४-२ असे सरस आहे, परंतु रायबाकिनाने त्यांच्यातील मागील दोन डब्ल्यूटीए सामने जिंकले आहेत. ३० व्या मानांकित फर्नांडिसने १९ वर्षीय आणि पाचव्या मानांकित रशियन खेळाडू आंद्रेव्हाचा ८० मिनिटांत ६-१, ६-४ असा पराभव केला. या विजयामुळे अव्वल-१० क्रमवारीतील खेळाडूंविरुद्धचा तिचा सलग सात पराभवांचा क्रम खंडित झाला. (वृत्तसंस्था)

# क्रिकेटपटूंच्या दुखापतींची आस्थेने चौकशी होणार

**नवी दिल्ली, ८ ऑगस्ट**

भारतीय संघाला अलीकडच्या काळात ग्रासलेल्या दुखापतींच्या मालिकेमुळे चिंता व्यक्त होत असताना, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव देवजित सैकिया रविवारी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' (सीओई) मधील पुनर्वसन व्यवस्थापन कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी 'क्रिकेट प्रमुख' व्ही. व्ही. एस. लक्ष्मणची भेट घेणार आहेत.

विविध दुखापतींमुळे जसप्रीत बुमराह (गुडघ्याला सूज), बी. साई सुदर्शन (डाव्या पायाच्या अंगठ्याला दुखापत), हर्षित राणा (हॅमस्ट्रिंग), नितीश कुमार रेड्डी (हॅमस्ट्रिंग) आणि वॉशिंग्टन सुंदर (क्वाड्रिसेप्स) यांच्या सेवा भारताला उपलब्ध होणार नाहीत. बंगालच्या रणजी करंडक उपांत्य फेरीतील पराभवानंतर आकाश दीप (कंबरेच्या खालच्या भागात 'स्ट्रेस फ्रॅक्चर') सर्वात जास्त काळापासून संघाबाहेर आहे.

त्यातच, 'पांढऱ्या चेंडूच्या'



हार्दिक पांड्या



जसप्रीत बुमराह



बी. साई सुदर्शन



हर्षित राणा



नितीश कुमार रेड्डी



वॉशिंग्टन सुंदर



वरुण चक्रवर्ती



प्रिन्स यादव

क्रिकेटमधील तज्ज्ञ खेळाडू हार्दिक पांड्या (क्वाड्रिसेप्स), वरुण चक्रवर्ती (हॅमस्ट्रिंग) आणि प्रिन्स यादव (हॅमस्ट्रिंग) हे देखील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये आहेत. तिथे 'स्पोर्ट्स सायन्स' टीमवर कामाचा प्रचंड ताण आहे, कारण २०२५ च्या सुरुवातीला नितीन पटेल यांनी राजीनामा दिल्यापासून या विभागाला प्रमुख मिळालेला नाही. सध्या या सर्व खेळाडूंना पुन्हा मैदानात उतरविणे हे एक आव्हान आहे.

सुदर्शन आणि बुमराह यांचा संघात समावेश 'फिटनेस'च्या अटीवर करण्यात आला होता, परंतु व्यापक हिताचा विचार करून 'सीओई'च्या तज्ज्ञांच्या चमूने सावधगिरी बाळगण्याचा निर्णय घेतला.

होय, सचिव सैकिया परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी व्ही.व्ही.एस. लक्ष्मणसोबत बेंगळुरूमध्ये असतील. दोघांमध्ये बैठक नियोजित आहे. राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर किंवा निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यात आभासी माध्यमातून सहभागी होतील की नाही, हे अद्याप स्पष्ट नाही. अनेक तर्क-वितर्क लावले जात असताना, सैकिया आणि लक्ष्मण समोर येऊन प्रसारमाध्यमांच्या काही प्रश्नांची उत्तरे देतात का, हे पाहणे रंजक ठरेल, अशी माहिती बीसीसीआयमधील एका सूत्राने दिली.

दुखापत व्यवस्थापनाच्या वेळापत्रकाबाबत आणि काही खेळाडूंना आवश्यक निकष पूर्ण करण्यापूर्वीच मुक्त करण्याबाबत 'सीओई' आणि सध्याची निवड समिती यांच्यात नेहमीच एकमत नसते, अशाही चर्चा आहेत.

हर्षित राणाचे वजन प्रमाणाबाहेर वाढलेले असताना तो इंग्लंडला पोहोचला, ही बाब निवड समितीला अजिबात आवडलेली नाही. त्याचप्रमाणे, निवड समितीला सुरुवातीला असे वाटले होते की बुमराह आणि सुदर्शन या दोन कसोटी सामन्यांपैकी किमान एका सामन्यासाठी तरी उपलब्ध असतील.

मात्र, नंतर असे समजले की दुखापतीनंतर बुमराहच्या गुडघ्यात पाणी साचल्याचे दिसून आले आहे आणि ती दुखापत बरी होण्यासाठी अधिक वेळ लागणार आहे. सुदर्शन काही काळापासून दररोज ७५ मिनिटे फलंदाजी करत होता, तरीही त्याच्या पायाच्या अंगठ्यावर अजूनही वेदना होत आहेत. नितीश रेड्डीने आपला वेग ताशी ७ ते ८ किलोमीटरने वाढविण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे त्याच्या हॅमस्ट्रिंग आणि क्वाड्रिसेप्स स्नायूंवर ताण आला. (वृत्तसंस्था)



## गरजू विद्यार्थिनींना आपुलकीकडून सायकलींची भेट

**सांगोला, दि. ८ ऑगस्ट-**

आपुलकी प्रतिष्ठान, सांगोलातर्फे जि.प.प्रा.शाळा दिघेवाडी येथील गरजू विद्यार्थिनींना सायकली भेट दिल्या. सांगोल्यातील गायत्री मार्टचे महादेव वाघमारे यांच्या हस्ते वितरण केले. आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सुरेश चौगुले, अरविंद डोंबे, कैलास कांबळे, दत्तात्रय नवले, चंद्रशेखर कवडे, हणमंत बोत्रे, महालिंग झाडबुके, विकास वाघमारे यांच्यासह मुख्याध्यापिका वैशाली कलूबर्मे, उपशिक्षिका स्वाती घोंगडे, संगीता ठोकळे, शिक्षक नवनाथ साळुंखे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे राजेंद्र यादव यांनी सांगितले.

## बरडे मार्गाचे सुशोभीकरण करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

महानगरपालिकेने हॉटेल ॲम्बेसिडर ते निराळे वस्ती या मार्गाला स्व. अलकाताई पुरुषोत्तम बरडे मार्ग असे नामकरण केले. मात्र, या मार्गाचे सर्वांगीण सुशोभीकरण करण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. या संदर्भात शिवसेनेचे सोलापूर शहर उत्तर समन्वयक सुरेश जगताप यांच्या नेतृत्वाखाली झोन अधिकाऱ्यांना निवेदन दिले. मार्गावर आकर्षक नामफलक उभारण्याबरोबरच नियमित स्वच्छता, वृक्षारोपण, विद्युत रोषणाई, रस्त्याची आवश्यक देखभाल करण्याची मागणी केली. युवासेना जिल्हाप्रमुख राम वाकसे, शहरप्रमुख तुषार आवताडे, शाखाप्रमुख मारुती खानापुरे, दिगंबर मल्लाव, अजय मालशे, माळगे उपस्थित होते.

# आईशक्ती फाउंडेशनतर्फे ४०० गरजू मुलींना शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

आईशक्ती फाउंडेशनतर्फे तब्बल ४०० गरजू विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप शनिवारी सोनामाता प्रशालेत करण्यात आले.

व्याहाती होमाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. याप्रसंगी व्यासपीठावर श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, पोलीस उपायुक्त (परिमंडळ) प्रीतम यावलकर, डॉ. अंबिका यावलकर, अनिकेत कलशेट्टी, सोलापूर गारमेंट मॅन्यूफॅक्चरिंग असोसिएशनचे संचालक अमित जैन, आईशक्ती फाउंडेशनचे संस्थापक मोहन डांगरे, आईशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा सृष्टी डांगरे, शाळा संस्थेच्या सचिवा कीर्तीलक्ष्मी अत्रे, मुख्याध्यापक जिलानी पटेल, पर्यवेक्षक भीमराव माने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थिनींना दप्तर, वह्या असे शालेय देण्यात आले. सन्मित्र डेव्हलपर्सनेही गरजू मुलींना वह्या देऊन या उपक्रमात सहभाग नोंदवला. पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर म्हणाले, जीवनात शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे आयुष्यात मनुष्याची प्रगती होते. आईशक्ती फाउंडेशनने केलेल्या सामाजिक उपक्रमामुळे हजारो मुली, महिलांना मोलाची मदत मिळाली आहे. संस्थेचे संस्थापक मोहन डांगरे आणि अध्यक्ष सृष्टी डांगरे हे निस्वार्थ भावनेने हे सामाजिक कार्य करत आहेत.

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर म्हणाले, आईशक्ती फाउंडेशनतर्फे विडी घरकुल परिसरासह सोलापूर शहर जिल्ह्यात राबविण्यात येणारे उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहेत. लोकाभिमुख सामाजिक काम केल्यामुळे आईशक्ती फाउंडेशनच्या उपक्रमांचा समाजजीवनावर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे, असेही डॉ. जयकर याप्रसंगी म्हणाले. यावेळी डॉ. अंबिका यावलकर, अमित जैन, अनिकेत कलशेट्टी, आईशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा सृष्टी डांगरे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी आईशक्ती फाउंडेशनच्या उज्वला शिरूर, तेजश्री लकशेट्टी, लता गुंडला, संध्या बिद्री, वासंती वाडी, लक्ष्मी कुर्लेकर, प्रीती कुर्लेकर, तेजस्विनी मरीगुड्डी आदी उपस्थित होत्या.

शिक्षिका सुजाता मायाचारी यांनी परिचय करून दिला. आईशक्ती फाऊंडेशनच्या अध्यक्षा सृष्टी डांगरे यांनी प्रास्ताविक केले. शिक्षिका राजश्री भोसगे यांनी सूत्रसंचालन तर शिक्षिका मीरा सुतार यांनी आभार प्रदर्शन केले.



### माता पालकांना मिळाले समाधान

गरजू विद्यार्थिनींना शालेय साहित्य देण्याच्या या कार्यक्रमात शेकडो मातापालक ही उपस्थित होत्या. मुलींच्या शिक्षणाची गरज ओळखून आईशक्ती फाउंडेशनने शिक्षणासाठी त्यांना केलेल्या मदतीमुळे मातापालकांनी समाधान व्यक्त केले.

## रूपाली जगताप यांचे निधन



**टेंभुर्णी, दि. ८ ऑगस्ट -**

रुपाली अनिल जगताप (वय ४० रा. चव्हाणवाडी) (टें) यांचे आज शनिवार दि.८ ऑगस्ट रोजी सांगली येथे उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. त्या मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष, दै. तरुण भारतचे वार्ताहर अनिल जगताप यांच्या पत्नी होत.

## ताराचंद राठी यांचे निधन



**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

ताराचंद राठी (वय ८२) यांचे प्रदीर्घ आजाराने शनिवार दि. ८ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवार दि.९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता वर्धमान नगर, रुपा भवानी रोड सोलापूर येथून त्यांच्या राहत्या घरातून निघणार आहे. ते रमेश राठी व नंदकिशोर राठी यांचे मोठे बंधू व गिरीष राठी यांचे वडील होते. सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांचे सख्खे चुलते होते. त्यांच्या पश्चात मुलगा, विवाहित मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## अच्युत फुरडे यांचे निधन



**बार्शी, दि. ८ ऑगस्ट -**

रविराज फुरडे व प्रकाश फुरडे यांचे वडील अच्युत विष्णु फुरडे, (वय ८३) यांचे दीर्घ आजाराने आज शनिवार दि. ८ ऑगस्ट रोजी निधन झाले आहे. बार्शी येथील मंगळवार पेठेतील मोक्षधाम येथे त्यांच्यावर रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले.


### CHANG IN NAME

I Savita Madhukar Wife of No. 15162141.y Hav (SS) Jadhav Madhukar Dagadu R/o Vill- Vasant Nagar Post - Naldurg Teh. Tuljapur, Dist- Dharashiv (Maharashtra) have Change my name from Savita Madhukar to Savita Madhukar Jadhav. Affidavit- 1540 Dated : 7/8/2026

### CHANG IN NAME

I Sata bai Mother of No. 15162141. y Hav (SS) Jadhav Madhukar Dagadu R/o Vill- Vasant Nagar Post-Naldurg Teh. Tuljapur, Dist- Dharashiv (Maharashtra) Have Changed my name from Sata Bai to Shantabai Dagadu Jadhav, Affidavati 1539 Dated : 7/8/2026

### CHANG IN NAME

I have change my name from SUNIL SURESHRAO CHAUDHARI TO SUNIL SURESH CHAUDHARI. Hence for this decleretion in future I will use this name SUNIL SURESH CHAUDHARI. the same Name will be used by wife and Children. OLD NAME:- SUNIL SURESHRAO CHAUDHARI NEW NAME:- SUNIL SURESH CHAUDHARI ADDRESS. MU. NALDURG VYAS NAGAR TA. TULJAPUR, OSMANABAD, MAHARASHTRA.-413602

Classifieds

**विकणे आहे**

**सराफ बाजारातील सुसज्ज फर्निचरसह गाळा योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे.**

**संपर्क : ९९७५६३७९५९ ९९७५७२११२०**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

नोंदणी क्र. SUR/NSR/RSR/R/455/99

**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर.** २५

'आर्यनंदी भवन', मंदार कॉम्प्लेक्स, १५४, गोल्डफिंच पेठ, सोलापूर. फोन नं.(०२१७) २७२३७३६, मो. ७७७४०८७०००
E mail : aryanandipathsansth1234@gmail.com
website : www.aryanandipariwar.com

### २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

(फक्त सभासदांकरीता)

**मा. सभासद,**

आपणांस कळविण्यात येते की, सन २०२५-२६, सव्वीसावी **वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार दिनांक २२/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.00 वाजता** आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दि. १३/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्तांत वाचून कायम करणे.
२) ३१/३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक इत्यादीचे वाचन करणे व वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन त्यास मंजूरी देणे.
३) संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार सन २०२५-२६ च्या नफ्याची विभागणी करणे.
४) सन २०२६-२७ या सालाचे अंदाजपत्रक मंजूर करणे
५) सन २०२६-२७ सालासाठी वैधानिक लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
६) वैयक्तिक कर्ज मर्यादा रक्कम रुपये दोन लाख पर्यंत वाढविणेबाबत विचार विनिमय करणे.
७) संस्थेचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्हा करण्याबाबत विचार विनिमय करणे.
८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

**दिनांक : ०७/०८/२०२६** **डॉ. राजेश फडकुले**
**स्थळ : हॉटेल रितेश** **अध्यक्ष**
सावरकर मैदान, गोल्डफिंच पेठ, सोलापूर

**विशेष सुचना :**

१) ज्या सभासदांना कामकाजाबाबत प्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी दि. १७/०८/२०२६ पूर्वी संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी आणून द्यावेत. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे बंधनकारक असणार नाही.
२) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
३) संस्थेचा वार्षिक अहवाल, हिशोब पत्रक संस्थेमध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध आहेत.
४) ज्या सभासदांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी आपले अर्ज मुख्य कार्यालयाकडे द्यावेत व आपले पत्ते बदलण्यासाठी संस्थेस सहकार्य करावे. तसेच ज्यांनी KYC भरुन दिले नाहीत, त्यांनी तातडीने त्याची पूर्तता करुन द्यावी.
५) ज्या सभासदांचे शेअर्स रक्कम रुपये ५ हजार व त्या प्रमाणात नाहीत, त्यांनी सदरची पुर्तता दि. १७/०८/२०२६ पूर्वी करावी.
६) १० वी, १२ वी परिक्षेत ८०% व त्यावरील गुण आणि डिप्लोमा पदवीधर, पदव्युत्तर परिक्षेत ६०% व त्यावरील गुण मिळविलेल्या सभासद पाल्यांचा यावेळी सत्कार करण्यात येईल. तरी कृपया दि. १७/०८/२०२६ पर्यंत आपल्या पाल्याची नावे व गुणपत्रिका संस्थेत सादर करावीत. (ज्या पाल्यांचे आई अथवा वडील संस्थेचे सभासद असतील अशा पाल्यांचाच सत्कारात समावेश केला जाईल याची नोंद घ्यावी.)

### पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक पदभरती जाहिरात-२०२६

**संस्थेचे नाव - बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी संचलित सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**

**पवित्र पोर्टल संस्था कोड - २७३००२SC०२७**

**शिक्षक पदभरती**

**बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी** (Code - २७३००२SC०२७) या शैक्षणिक व्यवस्थापनाकडील माध्यमिक शाळेत एकूण ०३ **शिक्षणसेवक** या रिक्त पदांसाठी मुलाखतीसह या निवड प्रकारातून निवड करून नेमणूक करण्यासाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत पात्र उमेदवारांकडून दिनांक ११/०८/२०२६ पर्यंत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहेत.

| अ.क्र. | माध्यम | पद | मानधन/वेतनश्रेणी/ अनुदानप्रकार | विषय व पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | शिक्षणसेवक (इ.६वी ते ८वी) | एकत्रित मानधन १६000/- अनुदानित | गणित/विज्ञान - ०१ | अनु. जाती ०२ पैकी (महिला- ०१) एसईबीसी - ०१ |
| २ | | शिक्षणसेवक (इ.६वी ते ८वी) | एकत्रित मानधन १६000/- अनुदानित | समाजशास्त्र - ०१ | |
| ३ | | शिक्षणसेवक (इ.९वी ते १०वी) | एकत्रित मानधन १८000/- अनुदानित | विज्ञान - ०१ | |

व्यवस्थापनाची सविस्तर जाहिरात व सविस्तर सूचना पाहण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळास भेट द्यावी. विहित केलेल्या पात्रता विषयक अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी व्यवस्थापनाचे प्राधान्यक्रम दिलेल्या विहित मुदतीत नोंद (Lock) करावेत.

तसेच पवित्र पोर्टलवरील सूचनांप्रमाणे वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करावी.

टीप - वरील रिक्त पदासाठी पवित्रप्रणाली मार्फत शासनांकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करु नयेत.

**सही/- अध्यक्ष श्री. आनंद सुलाखे** — **सही/- सचिव श्री. अनंत कवठाळे** — **सही/- मुख्याध्यापक श्री. रामकृष्ण इंगळे**

**बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी**

### जाहीर नोटीस

आमचे अशिल सौ. मुमताज रफिक फकीर रा. ब-६९/१, गोदूताई परूळेकर विडी घरकुल, कुंभारी, ता. द. सोलापूर यांनी दिलेल्या अधिकारावरून या जाहीर नोटीशीने तमाम लोकांना विशेषतः ता. द. सोलापूर व ता. उ. सोलापूर येथील लोकांना कळविणेत येते की,

डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील ''को. गोदूताई परूळेकर विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (ब), ता. द. सोलापूर'' मधील गट क्र. ३९४/२ पैकी क्लस्टर/घरकुल क्र. ब-६९/१ असे असून ही घरकुल या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदरहू संस्थेमध्ये श्रीमती. दिलशाद रहिमान माशाळकर यांना विडी कामगार म्हणून सभासद करून घेऊन रितसर सदर घरकुल अलॉट झालेले आहे, मात्र दरम्यान त्यांना म्हणजे श्रीमती. दिलशाद रहिमान माशाळकर यांना त्यांचे कौटुंबिक हॉस्पिटल खर्चाकरिता व इतर कारणासाठी रक्कमेची अति अत्यंत आवश्यकता होती, म्हणून वरील घरकुल त्यांनी विकण्यास काढलेला होता, त्यामुळे सदर घरकुल आमचे अशिलांनी श्रीमती. दिलशाद रहिमान माशाळकर यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेऊन त्याप्रमाणे आमचे अशिलांनी त्यांच्याकडून दि. २६/०६/२०१९ रोजी नोटरी दस्त क्र. ३६३० ने नोटरी कब्जापावती व करारपत्र व दि. २६/०६/२०१९ रोजीच नोटरी दस्त क्र. ३६३१ ने नोटरी कुलमुखत्यारपत्र लिहून व नोंदवून घेतलेली आहे, तेव्हापासून आजतागायत सदरची मिळकत आमचे अशिलांच्या मालकी व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत असून यावर इतर कोणाचेही मालकी हक्क व अधिकार नाही. सबब, सध्या आमचे अशिलांना सदर मिळकत रितसर संस्थेकडून स्वतःच्या नावाने ट्रान्सफर करून घ्यावयाचे आहे.

त्यामुळे त्यानंतर वरील सभासदांना म्हणजे श्रीमती. दिलशाद रहिमान माशाळकर यांना व त्यांच्या कुटुंबियांना गेल्या अनेक वर्षांपासून खूप शोधले असता ते अद्यापपर्यन्त मिळालेले नाही, तरी ते सोलापुरात नसून कुठे आहे याची कल्पना सुद्धा आमचे अशिलांना नाही, त्यामुळे आमचे अशिलांनी सदर संस्थेस असे हमीपत्र लिहून दिले आहे की, ''सदर मिळकत वर उल्लेख केल्याप्रमाणे नोटरी कब्जापावती करारपत्र दस्ताद्वारे सदर संस्थेमध्ये त्यांच्या नावाने रितसर ट्रान्सफर करून मिळावी, त्यानंतर श्रीमती. दिलशाद रहिमान माशाळकर यांनी अथवा त्यांचे वालीवारसदार म्हणून कोणीही मिळकतीवर कायदेशीर मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध सांगण्यास वरील गृहनिर्माण संस्थेमध्ये आल्यास त्याची संपूर्णतः निवारणा आमचे अशिल हे स्वतःचे पदरखर्चाने दूर करून देणार आहेत'', अशा प्रकारचे हमीपत्राद्वारे व वरील परिस्थितीचा विचार करून वर नमूद संस्था / सोसायटी सदर मिळकत आमचे अशिलांच्या नावाने रितसर संस्थेमध्ये ट्रान्सफर करण्यास तयार झाले आहे.

तेव्हा सदर आमचे अशिलांच्या नावाची नोंद वरील घरकुलच्या संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डला होण्यास कोणाचीही हरकत अथवा तक्रारी असल्यास त्याबद्दल त्यांनी खालील नमूद पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ८ (आठ) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत-तक्रार कळवावी. या मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास वर नमूद घरकुल आमचे अशिलांच्या नावाने वरील संस्थेमध्ये रितसर ट्रान्सफर करण्यात येईल. त्यानंतर त्याबाबत कोणाचीही, कसलेही प्रकारचे तक्रार-हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिली. तारीख दि. ०७/०८/२०२६

**सही/-** **अशिल**

**सही/-** **ॲड. जगदीश व्ही. कोंडी**
**बी.एस.एल.,एलएल,बी.एम.एस.डब्ल्यू.**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर-४१३००२**
**मो. नं. ९८६०२०५०७८**
**अशिल तर्फे**

### जाहीर नोटीस

आमचे अशिल सौ. सुभद्रा गोविंद कुरापाटी रा. अ-५६४/२, गोदूताई परूळेकर विडी घरकुल, कुंभारी, ता. द. सोलापूर यांनी दिलेल्या अधिकारावरून या जाहीर नोटीशीने तमाम लोकांना विशेषतः ता. द. सोलापूर व ता. उ. सोलापूर येथील लोकांना कळविणेत येते की,

डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील ''को. गोदूताई परूळेकर विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (अ), ता. द. सोलापूर'' मधील गट क्र. ३८७/१/ब पैकी क्लस्टर/घरकुल क्र. अ-५६४/२ ही घरकुल आमचे अशिलांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे.

सदरहू संस्थेमध्ये नागमणी नागभूषण कुरापाटी यांना विडी कामगार म्हणून सभासद करून घेऊन रितसर सदर घरकुल त्यांना अलॉट झालेला आहे, मात्र दरम्यान त्यांना म्हणजे नागमणी नागभूषण कुरापाटी यांना त्यांचे कौटुंबिक हॉस्पिटल खर्चाकरिता व इतर कारणासाठी रक्कमेची अति अत्यंत आवश्यकता होती, म्हणून वरील घरकुल त्यांनी विकण्यास काढलेला होता, त्यामुळे सदर घरकुल आमचे अशिलांनी नागमणी नागभूषण कुरापाटी यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेऊन रक्कम देऊन त्याप्रमाणे आमचे अशिलांनी त्यांच्याकडून दि. ३०/४/२०२४ रोजी नोटरी दस्त क्र. ४५४८ ने नोटरी कब्जापावती व करारपत्र लिहून व नोंदवून घेतलेली आहे, तेव्हापासून आजतागायत सदर घरकुलात आमचे अशिल त्यांचे कुटुंबासमवेत मालकी हक्काने राहत असून संस्थेची वर्गणी, लाईट व नळ बील, टॅक्सेस हे आमचे अशिल भरत आहेत. यावर त्यांच्याशिवाय इतर कोणाचीही मालकी हक्क व अधिकार नाही. सबब, सध्या आमचे अशिलांना सदर मिळकत रितसर संस्थेकडून स्वतःच्या नावाने ट्रान्सफर करून घ्यावयाचे आहे.

त्यामुळे त्यानंतर वरील सभासदांना म्हणजे नागमणी नागभूषण कुरापाटी यांना व त्यांचे कुटुंबियांना गेल्या अनेक वर्षांपासून खूप शोधले असता ते अद्यापपर्यन्त मिळालेले नाही, तरी ते सोलापुरात नसून कुठे आहे याची कल्पना सुद्धा आमचे अशिलांना नाही, त्यामुळे आमचे अशिलांनी सदर संस्थेस असे हमीपत्र लिहून दिले आहे की, ''सदर मिळकत वर उल्लेख केल्याप्रमाणे नोटरी कब्जापावती करारपत्र दस्ताद्वारे सदर संस्थेमध्ये त्यांच्या नावाने रितसर ट्रान्सफर करून मिळावी, त्यानंतर नागमणी नागभूषण कुरापाटी यांनी अथवा त्यांचे वालीवारसदार म्हणून कोणीही मिळकतीवर कायदेशीर मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध सांगण्यास वरील गृहनिर्माण संस्थेमध्ये आल्यास त्याची संपूर्णतः निवारणा आमचे अशिल हे स्वतःचे पदरखर्चाने दूर करून देणार आहेत'', अशा प्रकारचे हमीपत्राद्वारे व वरील परिस्थितीचा विचार करून वर नमूद संस्था/सोसायटी सदर मिळकत आमचे अशिलांच्या नावाने रितसर संस्थेमध्ये ट्रान्सफर करण्यास तयार झाले आहे.

तेव्हा सदर आमचे अशिलांच्या नावाची नोंद वरील घरकुलच्या संस्थेच्या संपूर्ण रेकॉर्डला होण्यास कोणाचीही हरकत अथवा तक्रारी असल्यास त्याबद्दल त्यांनी खालील नमूद पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ८ (आठ) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत-तक्रार कळवावी. या मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास वर नमूद घरकुल आमचे अशिलांच्या नावाने वरील संस्थेमध्ये रितसर ट्रान्सफर करण्यात येईल, त्यानंतर त्याबाबत कोणाचीही, कसलेही प्रकारचे तक्रार-हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिली. तारीख दि. ०७/०८/२०२६

**सही/-** **अशिल** **सौ. सुभद्रा गोविंद कुरापाटी**

**सही/-** **ॲड. जगदीश व्ही. कोंडी**
**बी.एस.एल.,एलएल,बी.एम.एस.डब्ल्यू.**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**रा. ९१९, भवानी पेठ, सोलापूर-४१३००२**
**मो. नं. ९८६०२०५०७८**
**अशिल तर्फे**

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**(घनकचरा व्यवस्थापन विभाग)**
**सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर - ४१३००२**

जा.क्र./घ.क.व्य./ ५०३ — दि.:- ०८/०८/२०२६

**जाहीर सूचना**

**सोलापूर शहरात घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंमलबजावणीबाबत**

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ हे पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत अधिसूचित करण्यात आले असून ते दि. १ एप्रिल २०१६ पासून लागू झाले आहेत. या नियमांचा मुख्य उद्देश शहरी व ग्रामीण भागातील कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन, स्रोताच्या ठिकाणी कचरा वर्गीकरण, पुनर्वापर आणि क्षेपणभूमीवर जाणारा कचरा कमी करणे हा आहे. त्यानुसार सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहसंस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bluk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की, सदर नियमांनुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४ / २०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक, लोकप्रतिनिधी व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

सदर नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्रोतावर वर्गीकरण करणे बंधनकारक राहील:-

१. ओला कचरा - उरलेले अन्न, भाजीपाला व फळांचे अवशेष, चहा पावडर, नारळाच्या करवंट्या, फुले, पाने, मांस किंवा मांसाहारी पदार्थ, कालबाह्य झालेले अन्नपदार्थ, ब्रेड, बिस्कीट, ई.

२. सुका कचरा - प्लास्टिकचे वस्तू / पिशव्या, कागद, काच, पुठ्ठा, धातू, ई.

३. सॅनिटरी कचरा - डायपर, सॅनिटरी नॅपकिन्स, टॅम्पॉन्स, फेस मास्क, ई.

४. विशेष काळजीयोग्य (घातक) कचरा - बॅटरी, बल्ब, औषधे, ई-कचरा, ब्लेड, तुटलेले काच, पेंटचे डबे, कीटकनाशक किंवा फिनाईलचे बाटल्या, ई.

**नागरिकांची जबाबदारी :-**

- घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करून घंटागाडी कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द करणे.
- सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा टाकू नये.
- प्लास्टिक, बांधकाम कचरा, ई-कचरा, इत्यादी स्वतंत्रपणे देणे.
- ओला व सुका कचरा मिसळून देऊ नये.
- सॅनिटरी कचरा सुरक्षितरीत्या गुंडाळून देणे.
- कचरा जाळणे, नाले / रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळावे.

**लोकप्रतिनिधींची जबाबदारी :-**

- आपल्या प्रभागात / वॉर्डात जनजागृती करणे.
- नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहन देणे.
- स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे.
- महानगरपालिकेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

**मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bluk Waste Generators) यांची जबाबदारी :-**

- २०,000 चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे इमारत असल्यास, किंवा
- दररोज ४०,000 लिटर पाण्याचा वापर असल्यास, किंवा
- दररोज १०० किलोग्राम घनकचरा निर्मिती असल्यास,

अशा आस्थापनांना Bluk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**अशा घटकांनीः-**

- निर्माण झालेल्या ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट / बायोगॅस प्रक्रिया करणे.
- कचऱ्याचे स्रोतावर विलगीकरण व वर्गीकरण करणे.
- प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये.
- महानगरपालिकेच्या सूचनांचे पालन करणे.
- अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.
- संस्थेने CPCB च्या अधिकृत पोर्टलवर (https://swm.cpcb.gov.in/register) नोंदणी करून माहिती अद्यावत करणे.

सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांविरुद्ध 'Polluter Pays' Principle अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

तरी सोलापूर शहरातील सर्व सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक सोलापूर शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ चे काटेकोर पालन करण्यात यावे ही विनंती.

**सही/-**
**(डॉ. सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

# १४ आयुष्मान आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन

## एनक्यूएएस प्रमाणपत्रामुळे ग्रामीण आरोग्यसेवेला नवी झळाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

ग्रामीण भागातील नागरिकांना गावच्या पातळीवरच दर्जेदार आणि सुरक्षित आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्ह्यातील आणखी चार आयुष्मान आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एन.क्यू.ए.एस) मिळाले असून, आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण १४ आयुष्मान आरोग्य मंदिरे राष्ट्रीय मानांकनासाठी पात्र ठरली आहेत.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य संस्थांच्या सेवा, सुविधा, स्वच्छता, रुग्णसुरक्षा, औषध व्यवस्थापन, नोंदवही, प्रशासन आणि रुग्णकेंद्रित सेवांची विविध निकषांवर तपासणी करून मानांकन दिले जाते. त्यामुळे या मानांकनाकडे आरोग्य सेवेच्या गुणवत्तेचा महत्त्वाचा राष्ट्रीय मापदंड म्हणून पाहिले जाते.

नुकत्याच जाहीर झालेल्या मूल्यांकनात विजोरी आयुष्मान आरोग्य मंदिराने ८६.९२ टक्के, रातंजनने ८४.९३ टक्के, श्रीपत पिंपरीने ८४.३६ टक्के तर लिंबिचिचोळीने ८० टक्के गुण मिळवत राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्राप्त केले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवेसाठी मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज कमी होऊन गावाजवळच विश्वासार्ह, सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होण्यास या उपक्रमाचा फायदा होणार आहे.

याकामी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत, समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व संवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अमृता वाघे तसेच पालक अधिकारी व उपसंचालक डॉ. भगवान पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने प्रयत्न केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, जिल्हा समन्वयक निखिल फताटे यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविकांच्या सामूहिक प्रयत्नातून हे यश मिळाले.

### गावातच मिळणार अधिक दर्जेदार सेवा

या मानांकनामुळे संबंधित आरोग्य केंद्रांमधील सेवा वितरण अधिक शिस्तबद्ध होण्याबरोबरच रुग्णसुरक्षा, स्वच्छता, औषध व वैद्यकीय उपकरणांचे व्यवस्थापन, नोंदवही आणि रुग्णांच्या समाधानावर अधिक भर दिला जाणार आहे. मानांकन प्राप्त संस्थांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रोत्साहन निधी मिळण्याची पात्रता असल्याने पायाभूत सुविधा, वैद्यकीय उपकरणे आणि रुग्णसुविधा अधिक सक्षम करण्यासही मदत होणार आहे.



# ‘मंत्र छोटा, तंत्र मोठं’ या पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन; ॲड. राम देशपांडे यांच्या कार्याचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

ज्येष्ठ विधिज्ज्ञ तथा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक ॲड.राम नागेश देशपांडे यांच्या ‘मंत्र छोटा, तंत्र मोठं’ या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी शिवस्मारक सभागृह येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. व्यासपीठावर ज्येष्ठ विधीज्ज्ञ धनंजय माने, शिरीष कुलकर्णी, ॲड.राम देशपांडे, आनंद देशपांडे यांची उपस्थिती होती. दरम्यान, उपस्थितांनी या पुस्तकाचे मुक्तकंठाने कौतुक केले.



यावेळी ॲड.राम नागेश देशपांडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या आजवरच्या कार्याचा गौरव करणाऱ्या अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. ॲड.राम देशपांडे यांच्या दीर्घकाळातील सामाजिक, विधी व वैचारिक योगदानाचा आढावा घेत त्यांच्या कार्याबद्दल उपस्थितांनी गौरवोद्गार काढले. ‘मंत्र छोटा, तंत्र मोठं’ या पुस्तकातून ॲड.देशपांडे यांनी आपल्या अनुभवातून विविध विषयांवर केलेले चिंतन, मार्गदर्शन मांडले आहे. ॲड.राम देशपांडे यांच्या पुढील साहित्यिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी दैनिक ‘तरुण भारत’चे समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुद्रक तथा प्रकाशक दिलीप दुलंगे, प्रकाश जाधव, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, ॲड. शशी कुलकर्णी, ॲड.श्रीनिवास क्यातम, ॲड.आनंद कुर्डुकर, रंगनाथ बंग, इंद्रजीत पाटील, उमेश भोजने, प्रा.अजय दासरी, जगदीश तुळजापूरकर, रावसाहेब पाटील, गायक दीपक कलढोणे, स्वामीदास सिध्दूल यांच्यासह साहित्य, विधी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किरकोळ वादातून तिघांनी केला एकाचा खून

**अक्कलकोट उत्तर पोलिसांकडून १८ तासात उलगडा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ ऑगस्ट -**

किरकोळ वादाचे पर्यवसान थेट खुनात झाल्याची धक्कादायक घटना अक्कलकोट तालुक्यात उघडकीस आली आहे. विहिरीत आढळलेल्या अज्ञात मृतदेहाचा छडा लावत अक्कलकोट उत्तर पोलिसांनी अवघ्या १८ तासांत तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे.



दि.७ ऑगस्ट रोजी गौरीशंकर भरमशेट्टी यांच्या किणी रोड लगतच्या शेतातील विहिरीत एका अनोळखी तरुणाचा मृतदेह तरंगताना आढळला. मृताच्या हातावरील गोंदणाच्या आधारे त्याची ओळख सागर श्रीशैल व्हनचेंजे (वय-२७, रा.दहिटणेवाडी, ता.अक्कलकोट) अशी पटली. मृताच्या डोक्यावर गंभीर मारहाणीच्या खुणा आढळल्याने पोलिसांना खुनाचा संशय आला.

उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता संपूर्ण कट उघडकीस आला.

दि.१ ऑगस्ट रोजी रात्री करंजा चौक येथे सागर व्हनचेंजे याचा आरोपी श्रुती यारोळे, नागनाथ बनसोडे, बाळू शिंदे यांच्याशी किरकोळ वाद झाला होता. या वादाचा राग मनात धरून तिघांनी सागरला किणी रोड परिसरातील शेतात नेले. तेथे त्याला भरपूर दारू पाजली. सागर मद्यधुंद झाल्यानंतर नागनाथ बनसोडेने त्याचे हात पकडले. बाळू शिंदेने पाय धरले, तर श्रुती यारोळे हिने मोठा दगड डोक्यात घालून त्याचा खून केला.

पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिघांनी मिळून मृतदेह विहिरीत फेकला. ६ ऑगस्ट रोजी सकाळी मृतदेह विहिरीत आढळल्यानंतर पोलिसांनी अवघ्या १८ तासांत गुन्ह्याचा छडा लावला. याप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अविनाश पवार, सपोनि अमोल पन्हाळकर, हेकॉ मल्लिनाथ कलशेट्टी, असिफ शेख, गणेश अंगुले, ज्योती मोरे, श्रीकांत जवळगे, केदारनाथ सुतार, महादेव शिंदे, विजयलक्ष्मी शिवुर यांच्या पथकाने ही कामगिरी बजाविली.



# रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित आरोग्य शिबीराचा १२७५ जणांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ ऑगस्ट -**

कै.श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या मोफत आरोग्य शिबिरामध्ये ७६५ महिला व ५१० पुरूष अशा एकूण १२७५ रुग्णांनी लाभ घेतला. अकलूजचे नगरसेवक युवानेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून सदरच्या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, डॉ.एम.के. इनामदार, डॉ.सतीश दोशी, डॉ.अपर्णा सरवदे, डॉ.हिना शेख, डॉ.श्रीकृष्ण रत्नपारखी, डॉ.मानसी गांधी, डॉ. सुरेश सूर्यवंशी, डॉ.अमोल शिंदे, डॉ.सचिन सावंत, डॉ.सविता गुजर, डॉ.रेवती राणे, डॉ.अपूर्व गिरमे, डॉ.जोत्स्ना गायकवाड, डॉ.भूषण चंकेश्वरा, डॉ.विश्वास कदम, डॉ.रावसाहेब गुळवे, डॉ. साईराज भोंगळे, डॉ.निनाद फडे, डॉ.समीर दोशी, डॉ.तुषार शेंडगे, डॉ.संजय वाळेकर, डॉ.नितीन कुबेर, डॉ.अनिकेत काटकर, डॉ. आकाश देशमुख, डॉ.शकील पठाण, डॉ. माधुरी खताळ, डॉ. पाकीजा पठाण, डॉ.प्रिया कदम, डॉ.जागृती मगर, डॉ.मनिषा शिंदे, डॉ.अरुंधती खराडे-पाटील, डॉ.अभिजीत राजेभोसले, सहकार महर्षि कारखान्याचे कार्यकारी संचालक सुहास यादव, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

सयाजीराजे मित्र मंडळ, शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट, शिक्षण प्रसारक मंडळ, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर, नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, उपजिल्हा रुग्णालय-अकलूज, प्राथमिक आरोग्य केंद्र-शंकरनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिबिरात कर्करोग, नेत्ररोग, अस्थिरोग, हृदयरोग व रक्त तपासण्या करण्यात आल्या.

या आरोग्य शिबिरास मदनसिंह मोहिते-पाटील, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील, दिपकराव खराडे-पाटील, प्रदीपराव खराडे-पाटील यांनी भेट दिली. या तपासण्यानंतर रुग्णांना १५ दिवसांची मोफत औषधे शंकरराव मोहिते पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्टच्या वतीने देण्यात आली. भविष्यात ट्रस्टच्या वतीने गरजू रुग्णांना डोळ्यांची मोफत शस्त्रक्रिया (मोतीबिंदू) करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. डॉ.अभिजीत राजेभोसले यांनी आभार मानले.

# सहकारी बँका टिकल्या पाहिजेत : आ. कोठे

**महावीर बँकेला ८.९१ कोटींचा नफा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापूर शहरातील सहकारी बँका टिकल्या पाहिजेत यासाठी सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणे अपेक्षित आहे, असे प्रतिपादन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. श्री महावीर अर्बन को ऑफरेटिव्ह बँकेच्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.



महावीर बँकेला यंदाच्या वर्षी ८.९१ कोटी नफा झाला व सभासदांना १० टक्के लाभांश दिले जाणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. बँकेचे बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे संचालक ज्ञानेश्वर म्याकल यांचा स्विकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी दशरथ वडतीले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष इंद्रमलजी जैन यांनी प्रास्ताविक केले. बँकेने ग्राहकांसाठी चालू केलेलं मोबाईल बॅंकिंग, आयएमपीएस, युपीआय या डिजिटल सुविधांव्दारे आजपर्यंत १२०० कोटी रूपयांची उलाढाल यशस्वीरित्या झाली. बँकेने २०१२ साली ३८ कोटी ठेवी वरून आजअखेर बँकेच्या ठेवी ५३० कोटी ठेवीचा पल्ला पार केला आहे, असे बँकेचे अध्यक्ष दीपक मुनोत यांनी सांगितले.

या सभेस व्हाईस चेअरमन संजय सेठीया, रविंद्र गुजराथी, नारायण गंजी, गोंविद भैय्या, गिरीष देवरमनी, गौतमचंद संचेती, श्रीनिवास चिलका, संतोष भंडारी, भैरूलाल कोठारी, चेतन बाफना, राजशेखर हिरेमठ, अरूण साळुंके, माधुरी पारेख, पूनम लोणावत, नितीन नावंदर, नंदकिशोर उदगिरी, पोपटशेठ पुनमिया, अतुल सोनिग्राम, ॲड.प्रदिपसिंग राजपूत, केतनभाई शहा, कल्पेश मालू, ओमप्रकाश लड्डा, गिरीष गांधी, कुमारपाल निमाणी, रामवल्लभ जाजू, पुरूषोत्तम बलदवा, धन्यकूमार खाबिया, अशोक संकलेचा, पेंटप्पा गड्डम, काशिनाथ गड्डम, दशरथ गोप, अशोक छाजेड, जिनेंद्र सुराणा, जयचंद वेद, बस्तीमल संकलेचा, वीरचंद संकलेचा, ईश्वर मालू, दीनानाथ धुळम, मल्लेशम कोडम, रमेश जैन, सुनिल जैन, रंगनाथ येरमवार, केशवभाई शहा, किरण करकमकर, विनायक राचर्ला, शाम येमूल, प्रमिला पल्ली, सरिता वडनाल, चंद्रकांत रमणशेट्टी, आगरथडे आदी उपस्थित होते.



# श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ सामाजिक, धार्मिक सेवेचा संकल्प निष्ठेने जपत आहे : अंधारे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली हा न्यास सामाजिक व धार्मिक सेवेचा संकल्प अत्यंत निष्ठेने जपत आहे. येथे येणाऱ्या स्वामीभक्तांसाठी राबवले जाणारे उपक्रम आणि अन्नदानाचे कार्य खरोखरच कौतुकास्पद व प्रेरणादायी असल्याचे मनोगत शिवसेना (उबाठा) च्या उपनेत्या व प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केल्या.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आल्या असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होत्या. त्यांच्या समवेत जिल्हा प्रमुख शरणराज केंगनाळकर, उमेश सारंग, संजय पोळ, हुकूमचंद राठोड, दत्ता माने, रमेश चौगुले, रवी डोके, सोपान निकते, अयाज जमादार, मनोज पवार, गुरुलिंगप्पा पाटील, रवी कोळी, पिंटू पांढरे, राम जाधव, भिम जाधव, राजशेखर गुरव, संतोष पाटील संतोष टोणपे, महेश फुलारी आदी उपस्थित होते.

यावेळी एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.

# हेमंत कुंदारम यांचे सीएमए परिक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.८ ऑगस्ट-**



येथील हेमंत लता नागराज कुंदारम यांनी सीएमए या व्यावसायिक परिक्षेत घवघवीत यश संपादन केले. द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंट्स ऑफ इंडियातर्फे ही परीक्षा घेण्यात आली.

या परीक्षेस देशभरातून २० हजार २०४ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ७ हजार ६४१ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. श्रीकांत इप्पलपल्ली यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. दैनिक तरुण भारतचे माजी कर्मचारी नागराज कुंदारम यांचे ते चिरंजीव असून त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित

**श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर**

(कन्नड अल्पभाषिक)

रुपाभवानी मंदिर रोड, भवानी पेठ, सोलापूर

**Programmes Accredited by NBA, New Delhi.**

**डिप्लोमा इंजिनिअरींग प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश २०२६-२७**

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था स्तरावरील रिक्त जागांसाठी व केंद्रिभूत फेरीच्या शिल्लक प्रवेशाकरीता विद्यार्थिनींनी कॉलेजमध्ये प्रत्यक्ष येवून प्रवेश अर्ज जमा करावे.

| Courses | |
|---|---|
| Artificial Intelligence & Machine Learning (Women) | |
| Civil Engineering (Women) | Information Technology (Women) |
| Computer Engineering (Women) | Electrical Engineering (Women) |
| Electronics & Tele. Engg (Women) | |

सर्व इच्छूक विद्यार्थिनींनी आवश्यक कागदपत्रे व प्रवेश शुल्कासह खालील तारखेपर्यंत कॉलेजमध्ये प्रवेश अर्ज जमा करावे. पात्रतेचे निकष व इतर माहितीसाठी कॉलेजच्या www.siddheshwarwomenspoly.org या संकेतस्थळाला भेट द्या.

प्रथम व थेट द्वितीय वर्षाकरीता प्रवेश अर्ज करण्याची अंतिम तारीख १०/०८/२०२६

कार्यालय स. १० ते सा.०६ वाजेपर्यंत आणि रविवारी व इतर सुट्टीच्या दिवशीही खुले राहील.

- प्रवेशासाठी संपर्क -

डॉ. श्रीशैल मळेवाडी ९९२२३६२०३५ प्रा. प्राजक्ता सप्तश्वा ९८२२२६१४८६











हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | रविवार, ९ ऑगस्ट २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


# ‘दडपशाही आणि दादागिरी करुन कुणबी प्रमाणपत्र नोंदी रद्द करण्याचे षडयंत्र’

**मनोज जरांगे-पाटील यांचे रोखठोक प्रतिपादन**

**लोकप्रतिनिधींची प्रमाणपत्रे कशी रद्द केली?**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

दडपशाही आणि दादागिरी करुन कुणबी प्रमाणपत्र नोंदी रद्द करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. गोड बोलून, गुळ चारुन मारण्याचा हा जणू राजकीय कट आहे. मात्र, मराठा समाज हे षडयंत्र कधीही सहन करणार नाही, असे रोखठोक प्रतिपादन मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांनी केले.

मराठा आरक्षणाचा लढा तीव्र करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्र दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. या अनुषंगाने शनिवार, दि.८ ऑगस्ट २०२६ रोजी ते सोलापुरात आले होते. यावेळी प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

मराठा लोकप्रतिनिधींची कुणबी प्रमाणपत्रे का आणि कशी रद्द केली? असा संतापजनक सवाल करीत ते पुढे म्हणाले, एकदा आंतरवली जाम झाली की सरकार अडचणीत आलेच म्हणून समजा. दि.२९ ऑगस्ट २०२६ पासून सुरु होणाऱ्या आंदोलनातून आता माघार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी मी गेल्या वर्षभरात एक शब्दही काढला नाही. मात्र महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने मराठ्यांच्या काही लोकप्रतिनिधींची कुणबी प्रमाणपत्रे रद्द होवू लागल्याने मी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्याची सुरुवात श्रीक्षेत्र तुळजापूर येथील कुलस्वामिनी श्रीतुळजाभवानी मातेच्या आशीर्वादाने आणि सोलापुरातून करण्यात आले. गोरगरीब मराठ्यांच्या कल्याणासाठी प्रत्येकाने या आंदोलनात योगदान दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, मनोज जरांगे-पाटील यांचे सोलापुरात आगमन होताच मराठा बांधवांनी त्यांचे अभूतपूर्व असे स्वागत केले. यावेळी फटाक्याची आतषबाजी आणि घोषणाबाजी करण्यात आली. सोलापुरातून जरांगे-पाटील हे जिल्ह्यातील इतर गावात दौरा करण्यासाठी रवाना झाले.

## महापौर विनायक कोंड्याल यांनी केले मनोज जरांगे-पाटील यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांचे शनिवारी सोलापूर शहरात आगमन झाले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निर्मला जंगम, मध्यवर्ती महामंडळाचे पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, राजन जाधव, विनोद भोसले, गुरुशांत धुत्तरगावकर, जयवंत सलगर, लता फुटणे, प्रकाश ननवरे, मतीन बागवान, नागेश वडणे, सचिन स्वामी, देविदास घुले, बसवराज कोळी, बजरंग जाधव आदी उपस्थित होते.

### ऐतिहासिक वैभवात पडली भर

भिंतीशिल्पाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास, पराक्रम आणि स्वराज्याची प्रेरणा नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. सोलापूर शहराच्या ऐतिहासिक वैभवात या शिल्पाची निश्चितच भर पडली असल्याच्या प्रतिक्रिया मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी नोंदविल्या.





### शिवभिंतीशिल्पाचे उद्घाटन

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरात बसविण्यात आलेल्या आकर्षक व ऐतिहासिक भिंतीशिल्पाचे उद्घाटन मनोज जरांगे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निर्मला जंगम, माजी उपमहापौरद्वय पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, नगरसेवक विनोद भोसले यांच्यासह राजन जाधव, गुरुशांत धुत्तरगांवकर, माऊली पवार, जयवंत सलगर, लता फुटाणे, प्रकाश ननवरे, मतीन बागवान, नागेश वडणे, सचिन स्वामी, देवीदास घुले, बसवराज कोळी, बजरंग जाधव आदी उपस्थित होते.

---

## २५७ रोजंदारी, बदली कर्मचाऱ्यांना कायम सेवेच्या विषयाला लागला मुहूर्त

**महापालिका स्थायी समितीपुढे आला प्रस्ताव**

**मंजुरीनंतर सर्वसाधारण सभेची मान्यता घेणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महापालिकेतील रोजंदारी आणि बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. २५७ पैकी सध्या कार्यरत असलेल्या २०१ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर ऑगस्ट महिन्यातील सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

शहराची हद्दवाढ झाल्यानंतर १९९५ मध्ये महापालिकेत मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली होती. त्यामुळे आरोग्य, नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता आणि उद्यान विभागात मोठ्या प्रमाणावर तात्पुरत्या स्वरूपात रोजंदारी सेवकांची नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती आदेश नसतानाही हे कर्मचारी संबंधित विभागांत नियमितपणे कार्यरत होते.याप्रकरणी महापालिकेने १९९५ मध्ये उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून त्यापूर्वीचे रोजंदारी सेवक सामावून घेतल्याशिवाय नवीन रोजंदारी भरती करणार नसल्याचे नमूद केले होते.

मात्र त्यानंतर विविध विभागांत सक्षम मान्यतेशिवाय कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात आले. महापालिकेने विविध विभागांकडून माहिती संकलित करून २५७ सेवकांची यादी तयार केली होती. यातील मृत, सेवानिवृत्त, दीर्घकाळ गैरहजर तसेच न्यायालयीन आदेशानुसार कायम झालेले कर्मचारी वगळल्यानंतर सध्या २०१ कर्मचारी कार्यरत आहेत. रोजंदारी आणि बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी विविध कर्मचारी संघटनांनी सातत्याने पाठपुरावा केला. महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रस्ताव सभेपुढे ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

मात्र मागील सर्वसाधारण सभेत विषय न आल्याने संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. आता अखेर स्थायी समितीपुढे प्रस्ताव आल्याने या कर्मचाऱ्यांच्या कायम सेवेच्या प्रक्रियेला वेग येण्याची शक्यता आहे. या प्रश्नावर शासनस्तरावरही यापूर्वी चर्चा झाली असून, सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. विविध लोकप्रतिनिधींनीही यासाठी पाठपुरावा केला आहे. आता स्थायी समिती आणि त्यानंतर सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यास प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

### महापालिकेवर ७.२५ कोटींचा भार

सेवेत कायम केल्यानंतर २०१ कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी महापालिकेला ७ कोटी २५ लाख ७७ हजार २४८ रुपये खर्च करावा लागणार असल्याचे प्रस्तावात नमूद आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा निर्णय झाल्यास महापालिकेच्या वेतन खर्चात वाढ होणार असल्याचे सांगण्यात येते.

## ‘मिडवाईफ’पासून ते ‘मेट्रन’पर्यंतचा ३१ वर्षांचा प्रेरणादायी सेवाप्रवास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**



प्रसूतिगृहातील रात्रपाळी, अचानक आलेली प्रसूती आणि आईच्या चेहऱ्यावरची चिंता अशा अनेक संवेदनशील क्षणांची साक्षीदार होत सोलापूर महापालिकेच्या आरोग्य विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी तब्बल ३१ वर्षे रुग्णसेवा केली. ७ ऑगस्ट १९९५ रोजी मिडवाईफ म्हणून सुरू झालेला त्यांचा सेवाप्रवास आज मेट्रन पदापर्यंत पोहोचला आहे. असंख्य माता आणि नवजात बालकांची सेवा करत त्यांनी कर्तव्यनिष्ठेचा आदर्श निर्माण केला.

संगीता लेकुरवाळे, संगीता गुरव, अर्चना शेलार, सुनिता सावंत आणि ज्योती कांबळे यांनी ७ ऑगस्ट १९९५ रोजी मिडवाईफ म्हणून सेवेला सुरुवात केली. राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूतिगृह, डफरीन चौक येथील प्रसूतिगृह, भावनाऋषी प्रसूतिगृह, रामवाडी आणि जिजामाता प्रसूतिगृह यांसह महापालिकेच्या विविध आरोग्य संस्थांमध्ये त्यांनी सेवा बजावली.

प्रसूतीपूर्व काळजी, प्रसूतीच्या वेळी आवश्यक सहकार्य तसेच प्रसूतीनंतर माता व नवजात बालकांची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. रात्री-अपरात्री, सण-उत्सव अथवा सुट्टीचा दिवस असला तरी रुग्णसेवेला प्राधान्य देत त्यांनी आपले कर्तव्य बजावले. अनेक कुटुंबांसाठी त्यांच्या सेवेमुळे प्रसूतीचा कठीण काळ अधिक सुरक्षित आणि दिलासादायक ठरला. महापालिकेच्या आरोग्य विभागातील या महिला कर्मचाऱ्यांचा सेवाप्रवास कर्तव्यनिष्ठा, सेवाभाव आणि रुग्णांप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

### असंख्य माता-बालकांची सेवा करण्याची संधी

३१ वर्षांचा हा प्रवास आमच्यासाठी केवळ नोकरीचा कालावधी नसून समाजसेवेचा प्रवास आहे. असंख्य माता आणि नवजात बालकांची सेवा करण्याची संधी मिळाली. त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हेच आमच्यासाठी सर्वांत मोठे समाधान आहे. सहकारी, डॉक्टर आणि महापालिका प्रशासनाच्या सहकार्यामुळे मिडवाईफपासून मेट्रनपर्यंतचा प्रवास शक्य झाला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.




## ‘ऑर्किड’च्या बालवैज्ञानिकांनी घेतली जणू अंतराळात झेप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

नागेश करजगी ऑर्किड स्कूलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनद्वारे ‘आर्किड’च्या बालवैज्ञानिकांनी जणू अंतराळात झेप घेतल्याचे दिसून आले. बालवैज्ञानिकांनी अंतराळ मोहिमा, मंगळ ग्रह, चंद्र मोहीम, रोबोटिक्स तंत्रज्ञान आणि स्वयंचलित उपकरण असे एकापेक्षा एक सरस मॉडेल्स सादर केले होते.

डॉ.लक्ष्मण करळे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करुन या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी तुकाराम चंद्रकांत साळुंखे, क्रांतिवीर शिवराम महिंद्रकर, डॉ. अशोक सोरगावी, संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार करजगी, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, मार्गदर्शिका मिना पारखे उपस्थित होते.

या प्रदर्शनात ४९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या या कल्पकतेने आणि आत्मविश्वासाने उपस्थितांची मने जिंकून घेतली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी व संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन कल्पनेचे कौतुक केले. सान्वी चव्हाण व संज्ञा मोहिते या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले.




## विडी कामगारांना किमान वेतन लागू; २९ वर्षांच्या लढ्याला आले यश

**महिला कामगारांनी केला एकच जल्लोष**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट-**

विडी कामगारांसाठी झोन १ मध्ये प्रतिदिन ३७९ रुपये तर झोन २ मध्ये प्रतिदिन ३६१ रुपये किमान वेतन लागू करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने जाहीर केले आहे. विडी कामगारांच्या किमान वेतनाच्या हक्कासाठी ‘सीटू’सह विविध कामगार संघटनांनी लढा पुकारला होता.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने जाहीर केलेल्या या निर्णयाने गेल्या २९ वर्षांपासून पुकारण्यात आलेल्या लढ्याला यश आले आहे. हा निर्णय जाहीर होताच कष्टकरी विडी कामगार महिला पूर्वभागातील दत्त नगर येथील ‘माकपा’च्या लालबावटा कार्यालय येथे एकत्रित येत एकच जल्लोष केला.

माजी आमदार नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली लालबावटा विडी कामगार युनियनने याप्रश्नी आवाज उठविला होता. शासनाने दि.१४ नोव्हेंबर २०१४ रोजी विडी कामगारांसाठी किमान वेतन व विशेष भत्ता अधिसूचित केला होता. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने कामगार संघटनांकडून पाठपुरावा करण्यात आला.

राज्याचे कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.८ मे, २० मे आणि २ जून २०२६ रोजी सर्व संबंधितांच्या बैठका झाल्या. त्यानंतर विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायातून २०१४ मध्ये निश्चित केलेले वेतनदर वेतन संहिता, २०१९ अंतर्गत वैध व अंमलबजावणी योग्य असल्याचे स्पष्ट झाले.

### कामगारांवर टाकला जात आहे दबाव

किमान वेतनापेक्षा कमी मजुरी स्वीकारण्यासाठी काही ठिकाणी कामगारांवर दबाव टाकला जात आहे. अशा प्रकारचा दबाव अजिबात सहन केला जाणार नाही, असे ‘सीटू’कडून स्पष्ट करण्यात आले.

### रोख मजुरी व पेन्शनसाठीची लढाई

किमान वेतनाचा लढा जिंकला. आता रोख मजुरी आणि सरासरी १० हजार रुपये पेन्शनसाठीची लढाईही जिंकायची आहे, असे माजी आमदार तथा कामगार नेते नरसय्या आडम यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## वीर कोतवाल शिक्षण संस्थेमार्फत गुणवंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट -**

येथील वीर कोतवाल शिक्षण संस्थेमार्फत गुणवंत विद्यार्थी व गुणवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा.डॉ. सोमनाथ यादव, प्रा.ज्ञानेश्वर काळे, डॉ.अनिल हुलसुलकर, डॉ.सुहास राऊत, डॉ.सुहास जगदाळे, पोलिस उपनिरीक्षक शहाजी दुधाळ, नागेश चौधरी, ॲड.विकास तिन्हेकर, सुरेश गवळी, सचिन चौधरी, देवदास शिंदे, विजयकुमार माने, भगवानराव काशीद, गणेश दळवी, दिनेश गवळी, संजय येऊलकर, समाधान चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पांडुरंग चौधरी, भगवानराव काशीद, भीमराव गंगदरे, मधुकर श्रीवास्तव यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. दत्तक पालक योजनेमध्ये ४१ विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य तर दहावीच्या ५१ विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले.

सहाय्यक कृषी अधिकारी रोशन खंडागळे, माजी प्राचार्य विश्वंभर काळे, बिबीशन माने, माजी मुख्याध्यापक सुरेश गवळी, समादेशक राहुल इंगळे, मृणालिनी शिंदे, लेखक प्रशांत वाघमारे या गुणवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन संतोष भालेराव यांनी केले. सुरेश गवळी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिशु शाळेत इंग्रजी हा विषय कसा शिकवावा? याबाबत कार्यशाळा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

मराठी शाळेमध्ये इंग्रजी हा विषय नर्सरी पासून कसा शिकवावा आणि त्याची तयारी पालकांनीही कशी करून घ्यावी या संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. इंग्रजी भाषा ही जगाची भाषा आहे आपल्या विद्यार्थ्यांना ती अधिक चांगल्या प्रकारे अवगत कशी होईल आणि त्यांचा इंग्रजीचा पाया पक्का कसा होईल यासाठी पालकांनीही विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची गोडी घरी लावावी आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी पालकांनी कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले असे मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळेला प्रमुख मार्गदर्शिका धनश्री विधाते यांनी पालकांच्या मनातील इंग्रजीची भीती जाण्यासाठी म्हणून पालकांचे विविध खेळ घेतले या प्रकारचे खेळ घरी देखील पालकांनी मुलांचे घ्यावेत त्याचबरोबर पीपीटी द्वारे मार्गदर्शन केले. पालकांनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि कार्यशाळा घेतल्याबद्दल शाळेला धन्यवाद दिले.

सूत्रसंचालन व आभार सायली देशमुख यांनी मानले. अलका ओक मृणाल देशपांडे स्नेहा गजेंद्र गडकर सारिका कुलकर्णी त्याचबरोबर सर्व शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १५२७

**मृगजळाचीं गा तळीं ।**
**तेथे दिठी दुरुनिचि न्याहाळीं ।**
**वांचूनि तेणें पाणीयें साळी केळी ।**
**लाविसी काई ।।**

संसार वृक्षाचे भगवंतांनी स्पष्ट केलेले स्वरुप विचारात घेतले तर, त्याची भयाकनता, त्याचा विस्तार आपल्या लक्षात येतो. या वृक्षाला जवळपास सर्वच लोक अविनाशी समजत असतात. पण ज्ञानी भक्त या वृक्षाला ख-या अर्थाने जाणत असल्याने तो संसारवृक्षाची कसलीच भिती बाळगत नाही. या संसारवृक्षाला कसे उपटून टाकायचे ? या अर्जुनाच्या प्रश्नावर भगवंत बोलत आहेत. मुळात हा वृक्ष अस्तित्वाच नसतो, ही सर्व कल्पना असल्याने त्याला उपडण्यासाठी वेगळे श्रम करण्याची गरज नाही, असे भगवंत म्हणाले. लहान लेकराची भिती नाहीशी करण्या करीता बागुलबुवाला पळवून लावावे लागते काय ? प्रत्यक्षात बागुलबुवा आपणच कल्पनेने तयार केला असल्याने, त्याला पळवून लावण्यासाठी वेगळे कांही करावे लागत नाही. सशाचे शिंग मोडावे लागतील काय ? आकाशातील ढगांचा किल्ला पाडावा लागतो काय ? या प्रश्नाची उत्तरे नाही अशी आहेत. त्या प्रमाणे संसार वृक्ष नष्ट करण्याच्या प्रश्नाचे उत्तर नाही असेच आहे.मुळात हा वृक्ष खराच नसल्याने त्याला उपटून टाकण्याची भिती बाळगण्याचे कारण नाही. ही सर्व माया आहे. स्वप्नातल्या गोष्टीचे जागेपणी भय धरण्याचे कारण नसावे. त्याप्रमाणे या वृक्षाचे आहे. मुळात हा वृक्ष खरा असता, तर तो कोणालाही उपटता आला नसता. या संसारवृक्षाचा खोटेपणा,भासमानता स्पष्ट करतांना भगवंत म्हणाले,



**मृगजळाचीया तळीं ।**
**तेथे दिठी दुरुनिचि न्याहाळीं ।**
**वांचूनि तेणें पाणीयें साळी केळी ।**
**लाविसी काई ।।**

अर्थात, मृगजळाने भरलेली तळी, दुरुनच गोजीरवाणी वाटतात, त्या तळयावरील पाण्याने धान्य, केळी निर्माण करता येणे शक्त नसते. तसेच संसारवृक्ष ही फक्त कल्पना /आभास असल्याने त्या बाबत कल्पनेची उतरंड रचण्याचे कारण नाही. प्रपंचरुपी अज्ञानाचे मूळ हे मुळातच खोटे असल्याने त्यातून निर्माण होणारा विस्तार मिथ्या असल्याचे लक्षात घ्यावे. विवेक जोपर्यन्त मायेला दूर लोटत नाही, तो पर्यन्त हे सर्व खरे वाटू लागते. अशा खोटारडया खरेपणात जर आयुष्य गेले, तर जीवनच व्यर्थ गेले म्हणून समजावे. आपले जीवन व्यर्थ जावू नये, म्हणून आपल्या विवेकाला आपण जागे केले पाहीजे. विवेक आणि माया एकत्र नांदत नाहीत. विवेक जागा होताच माया पळून हाते. माया जोपर्यन्त आपले स्थान सोडत नाही, तो पर्यन्तच माणूस मी, माझ, हे मी केले, माझ्यामुळेच हे झाले वगैरे म्हणत असतो. मायेमुळे निर्माण झालेला हा मीपणा, सुखाला जवळ येवूच देत नाही. मायेचा हा पडदा माणसाला मी मध्ये गुरफटून टाकतो. या पडदयामुळे दु:ख, मोह, चिंता, स्वार्थ, द्वेष, मत्सर, अहंकार हे शत्रु निर्माण होतात. या शत्रुंशी लढण्यात आयुष्य संपले तरी, माये मुळे माणूस जिंकु शकत नाही .या शंत्रुना आपल्यात प्रवेशच करु दयायचा नसेल तर आपण आपला विवेक, सदसद्बूध्दी जागृत केलीच पाहिजे. आपली सद्सद्विवेक बुध्दी जागृत करण्यासाठी मार्गदर्शन म्हणुन श्री ज्ञानेश्वरी पुरेसी आहे, असे आम्हास अनेक संत वचनांवरुन तसे स्वानुभवावरुन वाटते.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. ९ ऑगस्ट २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ कृ. एकादशी**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- मार्गशीर्ष (१४.४३)**
**योग - हर्षण (२६.०४)**
**करण - कौलव (२१.३४)**
**राहू काल : रविवार स. ०४.३० ते ०६.००**
**दिनविशेष :**

**ऑगस्ट क्रांती दिन: १९४२ मध्ये याच दिवशी महात्मा गांधींनी ब्रिटिशांविरुद्ध 'छोडो भारत आंदोलनाची हाक दिली.**
**जागतिक आदिवासी दिन: जगातील मूळ निवासी (आदिवासी) लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.**
**१९२५: चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या क्रांतीकारी साथीदारांनी ऐतिहासिक काकोरी रेल्वे डकैती घडवून आणली.**

## अहंकार हा अधोगतीचा पाया




ज्यांचे मी पण गळून पडते त्यांनाच जीवन कळते, तेच जीवनात यशस्वी होतात. मी म्हणजे सर्वे सर्वा असा अहंकार बाळगू नका. अहंकार हा अधोगतीचा पाया ठरतो. आपल्या व्यक्तिमत्त्वाला नम्रतेचं कोंदण हवं', असे प्रतिपादन परमपूज्य अक्षय श्रीजी महाराज यांनी केले.इबलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या, ज्ञानी माणसं नेहमीच शालीन, विनम्र असतात. याउलट ज्याच्या अंगी मी पणा असतो ती व्यक्ती अतिशय उद्धट, उर्मट असते. त्यांच्यातला अहंकार सतत टपकत असतो. जी व्यक्ती नम्र असते तिलाच समाजात मानसन्मान असतो. नम्रतेशिवाय ज्ञानही प्राप्त होत नाही. मी आणि माझे हा स्वभाव व्यक्तीचा लहानपणापासूनच असतो. परंतु पुढे मोठे झाल्यानंतर ज्यावेळेस समाजात वावरतो, त्यावेळेस त्याला समजते की मानसन्मान कोणाला आहे. जगात काय चालते आणि कोणाचे चालते, याचा तो अभ्यास करतो आणि त्याप्रमाणे वागतो. आपली गती आणि आपला मार्ग कोणत्याही परिस्थितीत सोडू नका. मुळात मार्ग निवडतानाच योग्य मार्ग निवडा. मार्ग योग्य असेल तर कोणत्याही अडचणींवर मात करता येते. मार्ग चुकीचा असेल तर मात्र आपले काही खरे नाही. आज जो तो जडच्या आधारावर जगत आहे. प्रत्येक जण भ्रमात आहे. व्यक्ती खूप धनवान आहे परंतु त्याच्याकडे नम्रता नसेल तर त्याला कोणीही विचारत नाहीत. नुसते धनवान असून उपयोग नाही, नम्रही रहा. कोणत्याही परिस्थितीत मार्ग बदलू नका,भटकू नका. आज आपले पुण्य बलवान आहे म्हणून आपल्याकडे सर्व सुखवस्तु आहेत परंतु जेव्हा पापाचा उदय होईल तेव्हा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागत नाही.यासाठी आपल्या जीवनाचा पाया मजबूत हवा.

**-मल्लेश पुरवंत**

# १५ ऑगस्टला ठरणार 'आवास प्लस'ची अंतिम यादी

*** मसुदा यादीवर हरकती-सूचना नोंदविण्याची संधी**
*** पात्र लाभार्थ्यांनी ग्रामसभेला उपस्थित राहण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत 'आवास प्लस-२०२४' मोहिमेतील लाभार्थ्यांची कायम प्रतीक्षा यादी आता ग्रामसभेच्या माध्यमातून अंतिम केली जाणार आहे. यासाठी १५ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा घेण्यात येणार असून, यासभेत मसुदा लाभार्थी यादी नागरिकांसमोर ठेवली जाणार आहे. त्यामुळे घरकुलाच्या प्रतीक्षेत असलेल्या पात्र नागरिकांसाठी ही ग्रामसभा महत्त्वाची ठरणार आहे.

ग्रामसभेत सादर करण्यात येणाऱ्या मसुदा यादीतील प्रत्येक लाभार्थ्याची माहिती व पात्रता तपासली जाणार आहे. यादीत चुकीचे नाव समाविष्ट असल्यास, पात्र व्यक्तीचे नाव वगळले असल्यास किंवा एखादा लाभार्थी अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांना त्याबाबत हरकत अथवा सूचना मांडता येणार आहे. ग्रामसभेतील चर्चेनंतर प्राप्त हरकती व शिफारशींच्या आधारे कायम प्रतीक्षा यादी अंतिम केली जाणार आहे.

आवास प्लसच्या मसुदा यादीत नाव असलेल्या लाभार्थ्यांनी १५ ऑगस्टच्या ग्रामसभेला आवर्जून उपस्थित राहून आपले नाव, पात्रता व नोंदविलेली माहिती तपासावी. नावाबाबत काही त्रुटी आढळल्यास ग्रामसभेतच त्याबाबत हरकत किंवा सूचना नोंदवावी. यामुळे अंतिम यादी तयार करताना संबंधित बाबीचा विचार होण्यास मदत होणार आहे.

ग्रामपंचायतींना मसुदा लाभार्थी यादी ग्रामसभेपूर्वीच नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामसभेत मंजूर झालेल्या शिफारशींनुसार अुररीडेर्षी प्रणालीमध्ये आवश्यक बदल नोंदविण्यात येणार आहेत.

दरम्यान, ग्रामसभा सुरू होण्यापूर्वी कायम प्रतीक्षा यादी उपलब्ध ठेवणे, तसेच कागदपत्रांची नोंद करताना काळजी घेण्याच्या सूचना ग्रामसेवक आणि गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. अपूर्ण अथवा चुकीची कागदपत्रे प्रणालीवर अपलोड करू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

घरकुलाच्या प्रतीक्षेतील नागरिकांसाठी १५ ऑगस्टची ग्रामसभा केवळ औपचारिकता नसून, अंतिम यादीत आपले नाव निश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची संधी ठरणार आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी ग्राम सभेला उपस्थित राहून आपली माहिती तपासावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रक्रियेत पारदर्शकतेवर भर**

ग्रामसभेची कार्यवाही आणि जिओ-टॅग छायाचित्रे ऑनलाइन अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अंतिम यादी तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया ग्रामसभेच्या शिफारशींवर आधारित राहणार असल्याने पात्र-अपात्र लाभार्थ्यांची छाननी स्थानिक पातळीवरच होणार आहे.



## नगरसेवक किरण देशमुख यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद शाळा बाळे येथे डॉ. किरण देशमुख मित्र परिवार व श्री सिद्धिविनायक प्रतिष्ठान, दर्शनाळ यांच्या संयुक्त विद्यमाने नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख जीवराज खोबरे हे होते. यावेळी मंडल अध्यक्ष देवीदास बनसोडे, मुख्याध्यापक सोजर मस्के, शालेय समिती अध्यक्षा मीनाताई पवार, बाळे सोसायटी माजी चेअरमन तोडकरी, उमेश तरवळे, प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष सुमित बिराजदार, सचिन लकडे, राहुल शाहबादे, बाहुबली जिरगे उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज चौकात ऐतिहासिक भिंतीशिल्पाचे लोकार्पण

### मनोज जरांगे-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळा परिसरात उभारण्यात आलेल्या आकर्षक आणि ऐतिहासिक भिंतीशिल्पाचे उद्घाटन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम, मध्यवर्ती महामंडळाचे पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, राजन जाधव, नगरसेवक विनोद भोसले, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, जयवंत सलगर, लता फुटणे, प्रकाश ननवरे, मतीन बागवान, नागेश वडणे, सचिन स्वामी, देविदास घुले, बसवराज कोळी, बजरंग जाधव उपस्थित होते. कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवर आणि शिवप्रेमी नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून त्यांच्या महान कार्याचे स्मरण केले.

## वक्तृत्व स्पर्धेत शर्वरी लोखंडे तृतीय

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

संभाजीराव शिंदे विद्यामंदिर संकुल,विडी घरकुल विभागाच्यावतीने शिक्षणमहर्षी स्व.विष्णुपंत कोठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित, जिल्हास्तरीय कनिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत शर्वरी ब्रह्मदेव लोखंडे (११ वी विज्ञान) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. पारितोषिकाच्या स्वरूपात तिला रुपये ७५१ /- स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त झाले.तर, अर्पिता चंद्रशेखर धप्पाधुळे (११वी-विज्ञान) हिला, उत्तेजनार्थ ३५१/- रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह प्राप्त झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना चेतन तुपकर व चंद्रशेखर कस्तुरे यांनी मार्गदर्शन केले.

## १५ नोव्हेंबरला मुस्लिम समाजातील ५१ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

व्हिक्टर युथ असोसिएशन इज्तेमाई शादी कमिटी, सोलापूरच्या वतीने यंदा मुस्लिम समाजातील ५१ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष इम्तियाज कमिशनर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा विवाह सोहळा रविवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पानगल हायस्कूल, सिद्धेश्वर पेठ येथे होणार आहे. विवाह सोहळ्याचे हे २५ वे वर्ष आहे. सामुदायिक विवाह सोहळ्यात विवाह इच्छुक जोडप्यांचे विवाह इस्लामिक पद्धतीने (शरीयतनुसार) कमी खर्चात पार पाडण्यात येणार आहेत. वर आणि वधू पक्षाकडून येणाऱ्या प्रत्येकी १०० पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. नवदाम्पत्यांना विविध संसारोपयोगी साहित्य देण्यात येणार आहे. वराचे वय २१ वर्षे आणि वधूचे वय १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी १ नोव्हेंबर २०२६ पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी जन्म दाखला आणि शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक आहे. नावनोंदणीसाठी बेगमपेठ, विजापूर वेसजवळील फेमस हॉटेल परिसरातील कार्यालय. बख्तियार सय्यद - ९५६१०५५५९४, कय्युम शेख - ९७६६३०१७६० येथे संपर्क साधावा, असे आवाहन इज्तेमाई शादी कमिटीच्या वतीने करण्यात आले. या पत्रकार परिषदेस शोएब चौधरी, बख्तियार सय्यद, अशपाक कल्याणी, रफिक कोसकी आदी उपस्थित होते.



## क्रीडा उपसंचालक नाईक यांची नेताजी शिक्षण संकुलास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलास क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे विभागाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांनी सदिच्छा भेट दिली. प्रशालेच्या शैक्षणिक व क्रीडा विषयक कामकाजाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

प्राचार्य रविशंकर कुंभार यांनी क्रीडा उपसंचालक नाईक यांचा सत्कार केला. यावेळी सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक व क्रीडा महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार, प्रमोद चुंगे, सचिन गाडेकर, उज्ज्वल मलजी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते. यावेळी क्रीडा शिक्षक विठ्ठल कुंभार यांनी शिक्षण संकुलात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम, क्रीडा सुविधा याविषयी सांगितले. प्रशालेतर्फे मैदानावर अन्य विविध खेळांच्या क्रीडांगणे विकसित करण्यासाठी प्रस्ताव सादर केला. प्रस्तावास त्यांनी मंजुरी देत संबंधित कामाचे उदघाटन केले. सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले.

## श्वानदंशावरील उपचारासाठी अँटी-रेबीज लसीकरण सुरु करा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

शहरात मोकाट श्वानांची संख्या वाढल्याने श्वानदंशाच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. प्रभाग क्रमांक ३ मध्ये श्वानदंशानंतर एका मुलाचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमिवर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक राजकुमार पाटील यांनी केली आहे. श्वानदंश झालेल्या रुग्णांना सध्या अँटी-रेबीज सीरम (अठड) व अँटी-रेबीज व्हॅक्सिन (अठत) घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय तसेच डफरीन चौकातील मनपाच्या मदर तेरेसा पॉलीक्लिनिकमध्ये जावे लागते. त्यामुळे रुग्णांची होणारी धावपळ टाळण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयासमोरील मनपाच्या आयडीएच दवाखान्यात डॉक्टर व प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करून लसीकरणाची सुविधा तातडीने सुरू करावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

## ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटमध्ये इलेक्ट्रिक वाहन प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर लक्षात घेऊन कुशल ईव्ही तंत्रज्ञ तयार करण्यासाठी बजाज ऑटो लिमिटेड आणि जीटीटी फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी मध्ये अत्याधुनिक ईव्ही सर्व्हिस टेक्निशियन प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.



हे केंद्र बजाज सर्व्हिस टेक्निशियन एक्सलन्स प्रोग्राम अंतर्गत सुरू करण्यात आले आहे.बजाज स्टेप हा विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचा पूर्णवेळ आणि पूर्णपणे मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आहे. या अभ्यासक्रमात इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांची रचना, देखभाल, दुरुस्ती, फॉल्ट डायग्नोसिस, बॅटरी तंत्रज्ञान, चार्जर आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण दिले जाईल. सोबतच सॉफ्ट स्किल्स, व्यक्तिमत्त्व विकास आणि मुलाखत तयारीचे रोजगारभिमुख मार्गदर्शन केले जाईल. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन बजाजच्या अधिकृत डीलरशिप नेटवर्कमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.या उद्घाटन समारंभास बजाज ऑटोच्या व्यवस्थापक प्रियांशी शर्मा, शांतिकुमार (सर्व्हिस), शुभम, राहुल तसेच जीटीटी फाउंडेशनचे नवीला इश्तेयाक व क्लस्टर हेड उपस्थित होते. तसेच शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार आणि स्थानिक बजाज डीलर्स उपस्थित होते.

## झेडपी स्थायी समितीत विकासकामांना गती; 'शिवरत्न'च्या नामांतराची नांदी ठरणार का खरी?

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची बैठक म्हटलं की, नेहमीच विकासकामांचा आढावा, योजना, निधी आणि प्रशासकीय विषयांची चर्चा होते. मात्र यावेळच्या बैठकीत काही मुद्दे थेट गावागावातील सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडले गेले. विशेषत: शिक्षण, आरोग्य आणि विकास कामांना गती देण्याबरोबरच प्रत्येक तालुक्यात एक आदर्श शाळा उभारण्याचा निर्णय चर्चेचा विषय ठरला. त्याचबरोबर जिल्हा परिषदेच्या 'शिवरत्न सभागृहाचे' नामकरण करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने बैठकीला वेगळे राजकीय वळणही मिळाले.

जिल्ह्यात ११ तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यात एक शाळा निवडून तिचा सर्वांगीण विकास करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. शाळा म्हणजे फक्त चार भिंती, वर्गखोल्या आणि बाकं एवढीच गोष्ट राहू नये, तर विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी चांगले वातावरण, आधुनिक सुविधा आणि आवश्यक पायाभूत सोयी मिळाल्या पाहिजेत, हा यामागचा विचार आहे.

**आरोग्याचा प्रश्नही महत्त्वाचा**

बैठकीत आरोग्य व्यवस्थेवरही चर्चा झाली. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था म्हटली की अनेक प्रश्न समोर येतात. विशेषत: पावसाळ्यात सर्पदंशाच्या घटना वाढतात. अशा वेळी रुग्णाला वेळेत उपचार मिळाले नाहीत तर परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक औषधे आणि उपचाराची तयारी आधीपासूनच ठेवणे गरजेचे आहे.

रेबीज प्रतिबंधाच्या उपाययोजनांवरही लक्ष देण्यात आले. एखाद्या व्यक्तीला कुत्रा किंवा इतर प्राण्याने चावा घेतल्यानंतर उपचारासाठी दूर जावे लागू नये, आवश्यक औषध उपलब्ध असावे आणि आरोग्य यंत्रणा वेळेत प्रतिसाद देईल, अशी व्यवस्था उभी राहणे महत्त्वाचे आहे.

औषधांचा साठा ठेवण्यासाठी आरोग्य संस्थांमध्ये पुरेशी जागा असणे हा दिसायला छोटा विषय वाटला तरी प्रत्यक्षात त्याचे महत्त्व मोठे आहे. औषधांचा योग्य साठा आणि सुरक्षित व्यवस्था असेल तर गरजेच्या वेळी त्याचा उपयोग होतो. त्यामुळे आरोग्याच्या बाबतीत केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष सुविधा मजबूत करण्याची गरज आहे.

**कामे कागदावर नाही, प्रत्यक्ष दिसायला हवीत**

जिल्हा परिषदेकडून दरवर्षी विविध विकासकामांसाठी निधी दिला जातो. रस्ते, पाणी, शाळा, आरोग्य केंद्रे, ग्रामविकास आणि इतर कामे सुरू असतात. मात्र एखादे काम मंजूर झाले म्हणजे ते चांगले झाले असे होत नाही. कामाचा दर्जा काय आहे, ते वेळेत पूर्ण झाले का आणि त्यासाठी खर्च झालेला पैसा योग्य ठिकाणी वापरला गेला का, हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

याच मुद्द्यावर बैठकीत कामांच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. निधीचा योग्य वापर आणि पारदर्शकता यावर भर देण्यात आला. कारण शेवटी सरकारी पैसा हा जनतेचा पैसा आहे. त्यामुळे त्यातून होणारे कामही जनतेच्या उपयोगाचे आणि टिकाऊ असणे गरजेचे आहे. गावात एखादा रस्ता झाला, पाण्याची योजना आली किंवा शाळेची इमारत उभी राहिली, तर त्याचा फायदा सामान्य माणसाला दिसला पाहिजे. कागदावर काम पूर्ण आणि प्रत्यक्षात अडचणी कायम, अशी परिस्थिती राहू नये, हीच अपेक्षा आहे.

**योजनांचा लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणार का?**

जिल्हा परिषद आणि शासनाच्या अनेक योजना आहेत. मात्र या योजनांची खरी किंमत तेव्हा कळते, जेव्हा त्याचा फायदा गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचतो. योजना आहे, निधी आहे आणि मंजुरीही आहे; पण लाभार्थ्याला त्याची माहितीच नाही किंवा कागदपत्रांच्या अडचणीमुळे लाभ मिळत नाही, असे चित्र अनेकदा दिसते. म्हणूनच विभागांमध्ये समन्वय ठेवून योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची गरज बैठकीत अधोरेखित झाली. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात योग्य समन्वय राहिला तर अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात.

**जिल्हा परिषदेतून**



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

**'शिवरत्न'च्या नामांतराने वेगळी चर्चा**

या सर्व विकासाच्या मुद्द्यांबरोबरच बैठकीत जिल्हा परिषदेच्या 'शिवरत्न सभागृहाचे' 'भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह' असे नामकरण करण्याचा प्रस्ताव पुढे आला. त्यामुळे बैठकीतील विकासाच्या चर्चेला राजकीय रंगही मिळाला. नामांतराचा विषय हा केवळ नाव बदलण्यापुरता मर्यादित नसतो. त्यामागे भावना, इतिहास आणि राजकीय भूमिका जोडलेल्या असतात. त्यामुळे या प्रस्तावावर पुढे काय चर्चा होते आणि त्याचा अंतिम निर्णय काय होतो, याकडे आता लक्ष लागले आहे. एकीकडे जिल्ह्यातील शाळांचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न, ग्रामीण आरोग्य व्यवस्था मजबूत करण्याची गरज आणि विकासकामांचा दर्जा सुधारण्यावर भर दिला जात असताना दुसरीकडे सभागृहाच्या नामांतराचा विषय चर्चेत आला आहे. त्यामुळे स्थायी समितीची ही बैठक केवळ नेहमीच्या प्रशासकीय बैठकीपुरती राहिलेली नाही, असे म्हणावे लागेल. आता खरी गरज आहे ती या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची. ११ आदर्श शाळा खरोखर आदर्श ठरल्या, ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये वेळेवर उपचार मिळाले आणि विकासकामांचा दर्जा सुधारला, तर बैठकीतील निर्णयांचा अर्थ आहे. शेवटी कागदावरचे ठराव कितीही चांगले असले, तरी त्याचा परिणाम गावातील सामान्य माणसाच्या आयुष्यात दिसला तरच प्रशासनाच्या कामाला खरी दाद मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# खेळाडू मृत्यूप्रकरणी बीसीए पदाधिकाऱ्यांना दिलासा

## - गुन्ह्याच्या तपासाला उच्च न्यायालयाची स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

बार्शी येथील शिवशक्ती मैदानावर क्रिकेट खेळपट्टी तयार करताना झालेल्या अपघातात एका अल्पवयीन खेळाडूचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात बार्शी क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी आणि सभासद यांच्याविरुद्ध नोंदवलेल्या फौजदारी गुन्ह्याच्या पुढील तपासाला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे.

न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान अर्जदाराचे वकील ॲड. रुपेश बोबडे यांनी मांडलेला कायदेशीर युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला आणि हा दिलासादायक आदेश पारित केला. नेमके प्रकरण काय? ३० मे २०२६ रोजी बार्शीतील शिवशक्ती मैदानावर समर क्रिकेट कॅम्प सुरु असताना सकाळी ७ ते ७.३० च्या सुमारास एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली होती. खेळपट्टी सपाट करण्यासाठी वापरण्यात येणारा जड मॅन्युअल पिच रोलर ओढत असताना १५ वर्षीय आरव ऊर्फ विरेन योगीराज चौधरी या खेळाडूचा तोल गेला आणि तो त्या फिरत्या रोलरखाली आला. या अपघातात छातीला गंभीर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर मयत मुलाचे वडील योगीराज चौधरी यांच्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवध आणि समान हेतू अंतर्गत गुन्ह्याची नोंद केली होती. प्रत्यक्ष मैदानावर असलेल्या प्रशिक्षकांसह बार्शी तालुका क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनाही सहआरोपी केले होते.

बार्शी क्रिकेट असोसिएशनच्या काही सभासदांनी याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. ३१ जुलै रोजी न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत अर्जदाराच्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, मैदानावर घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी असली तरी ती निव्वळ एक अपघात होता. भारतीय न्याय संहितेचे कलम १०५ लागू होण्यासाठी गुन्हेगारी हेतू किंवा मृत्यू ओढवू शकतो याची जाणीव असणे आवश्यक आहे. मात्र, एका क्रीडा सरावादरम्यान घडलेल्या अपघातात असा कोणताही हेतू सिद्ध होत नाही. शिवाय, अर्जदार हे केवळ असोसिएशनचे एक पदाधिकारी आहेत आणि या प्रत्यक्ष घटनेत त्यांचा कोणताही थेट सहभाग नाही. थेट सहभागाअभावी त्यांच्यावर कलम १०५ लागू होऊ शकत नाही, त्यामुळे केवळ पदावर असल्याकारणाने त्यांच्यावर अशा प्रकारे गुन्हा दाखल करणे हा कायद्याचा गैरवापर असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. हे मान्य करत न्यायालयाने राज्य सरकार आणि इतर प्रतिवाद्यांना नोटीस काढली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ ऑगस्ट रोजी होणार आहे. तोपर्यंत या प्रकरणात अंतरिम दिलासा मंजूर करत सदर बार्शी पोलीस स्टेशनला नोंद गुन्ह्यात पुढील तपास व कारवाईला स्थगिती देण्याचे आदेश न्यायालयाने पारित केले आहेत.

राज्य शासनाच्यावतीने सरकारी वकील माधवी म्हात्रे यांनी बाजू पाहिली. उच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण आदेशामुळे बार्शी क्रिकेट असोसिएशन आणि क्रीडा क्षेत्रातील संस्था चालवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.

### प्रत्यक्ष घटनेत थेट सहभागाशिवाय गुन्हा गैरलागू

अर्जदार हे केवळ असोसिएशनचे एक पदाधिकारी आहेत आणि या प्रत्यक्ष घटनेत त्यांचा कोणताही थेट सहभाग नाही. थेट सहभागाअभावी त्यांच्यावर कलम १०५ लागू होऊ शकत नाही.

## महत्वाचे...



### गौडगांव-तुळजापूर रस्त्याचे खोदकाम सुरु, प्रवाशांच्या जीवाला धोका

**गौडगांव, दि. ८ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील गौडगाव ते धाराशिव सरहद्दीचे काम सुरु असून रस्त्याची एक बाजू खोदकाम करुन सोडून दिलेली आहे तर दूसरी बाजू माती टाकून वाहनांची गैरसोय करण्यात आली आहे . बार्शी तालुक्याचे विधानपरिषदेचे आमदार राजाभाऊ राऊत यांच्या प्रयत्नाने बार्शी ते तुळजापूर रस्त्यासाठी ८०० कोटी रुपये मंजूर झाले. परंतू गेल्या ४ वर्षापासून ठेकेदाराकडून पाहिजे तितक्या वेगाने काम होत नसून प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. ज्या बाजूने वाहनांची आवक जावक आहे त्या बाजूने संगमनेरजवळ काळी माती टाकल्यामुळे वाहने जाणे मुश्किल झाले आहे. प्रवाशांनी व वाहनधारकांनीच आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. शासनाने दिलेल्या प्रचलीत नियमानुसार रस्त्याचे काम होत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत असल्याची चर्चा प्रवाशामध्ये होत आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष द्यावे.




### नॅशनल अबॅकस स्पर्धेत संस्कृती शिंदेचे यश

**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

बार्शीतील प्रोॲक्टिव्ह अबॅकसची विद्यार्थिनी संस्कृती शिंदे हिने राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस (गणित) स्पर्धेत यश संपादन करत बार्शीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रोॲक्टिव्ह अबॅकस नॅशनल समर कॉम्पिटिशन २०२६ मध्ये देशभरातील सुमारे ७५० स्पर्धकांमधून ९ वर्षे वयोगटात संस्कृतीने अवघ्या ५ मिनिटे ५ सेकंदांत १०० पैकी १०० गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. संस्कृतीला बार्शी येथे जयश्री चाटे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अबॅकसचे प्रशिक्षण मिळाले.

### प्रा. विशाल गरड यांना अटल भूषण पुरस्कार जाहीर

**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील पांगरी गावचे रहिवासी, लोकव्याख्यानकार प्रा. विशाल गरड यांना अटल फाउंडेशनच्यावतीने देशपातळीवर प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'अटल भूषण पुरस्कार - २०२६' जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण दि. १९ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथील भारत मंडपम सभागृहात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. गेल्या १५ वर्षांपासून प्रा. गरड व्याख्यान, लेखन आणि प्रबोधनाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य सातत्याने करत आहेत. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये त्यांनी २,००० हून अधिक प्रभावी व्याख्याने देत लाखो युवक, विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांपर्यंत सकारात्मक विचार पोहोचवले आहेत. प्रा. गरड यांची आतापर्यंत ६ पुस्तके प्रकाशित झाली असून आणखी २ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. प्रभावी वक्ते आणि लेखक म्हणून ओळख असलेल्या प्रा. गरड यांनी चित्रकार, कवी, दिग्दर्शक, कॅलिग्राफर, मेंटर, कॉर्पोरेट ट्रेनर आणि कौन्सिलर अशा विविध क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. भाषण आणि लेखणीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचारांची पेरणी करण्याचे त्यांचे कार्य गेल्या दीड दशकांपासून अखंडपणे सुरू आहे. प्रा. विशाल गरड यांच्या या उल्लेखनीय यशामुळे बार्शी तालुक्याचे नाव देशपातळीवर उजळले असून साहित्य, व्याख्यान आणि प्रबोधन क्षेत्रातील कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.





## निर्मलाताई ठोकळ प्रशालेत राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई यांच्यावतीने आयोजित राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी प्रशालेतील इयत्ता पाचवी ते सातवी(गट क्र.३) तसेच इयत्ता आठवी ते दहावी (गट. क्र.४)च्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने नोंदणी केली होती. या केंद्रवर २०१ विद्यार्थी स्पर्धेसाठी प्रविष्ठ झाले होते. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई यांच्याकडून स्पर्धेच्या दिवशीच विषय उपलब्ध करून देण्यात आले होते. यात गट क्र. ३ साठी गावातील आठवडी बाजार, किल्ला बनवणारी मुले, बस स्थानकावरील प्रसंग तर गट क्र. ४ साठी वर्ग सजावट, फुटबॉल खेळणारी मुले, विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत प्रयोग करून दाखवणारे शिक्षक हे विषय देण्यात आले होते. स्पर्धेसाठी केंद्र प्रमुख प्राचार्य श्री डी. डी. गाजरे यांचे कुशल नियोजन व मार्गदर्शन लाभले. केंद्रातील विद्यार्थ्यांची नोंदणी, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व केंद्रसमन्व्यक म्हणून सहशिक्षक एन. सी. रमणशेट्टी यांनी काम पाहिले. बालचित्रकला स्पर्धेच्या यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे यांनी शाळेचे कौतुक केले.



## ग्रामपंचायत अधिकारी दक्षिण तालुकाध्यपदी रमेश गायकवाड

### सचिवपदी सज्जाद काझी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

दक्षिण तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची सभा ७ ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी दक्षिण तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची नूतन कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. तालुकाध्यपदी रमेश गायकवाड यांची निवड झाली.

संघटनेचे डीएनई १३६ शाखेची माजी जिल्हा सरचिटणीस डी. एम. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ मार्गदर्शक गुलाबचंद शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन कार्यकारिणी निवड करण्यात आली. सुनीता राठोड यांची उपाध्यक्ष तसेच सज्जाद काझी यांची सचिवपदी निवड करण्यात आली. निवडीनंतर डी. एम. पाटील तसेच ज्येष्ठ मार्गदर्शकांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारिणीचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नूतन कार्यकारिणी : कार्याध्यक्ष : देवेंद्र कोरे, कोषाध्यक्ष : मनीषा पाटील, सहसचिव : ज्ञानेश्वर कोळी, संघटक : अशोक म्हेत्रे, गुलाबचंद शहा, महिला संघटक : शोभा नरोळे, प्रसिद्धी प्रमुख : बी. व्ही. वडरे, कायदेशीर सल्लागार : शिवराज राठोड.

## भावसार प्रतिष्ठानतर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

भावसार प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणेच यंदाच्या वर्षीही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शिवस्मारक सभागृह येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी रूपाली भावसार तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रसाद जिरांकलगीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते 'गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात हिंगलाज मातेच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. प्रास्ताविक भावसार प्रतिष्ठानचे विद्यमान अध्यक्ष गिरीश माळवदकर यांनी केले. यावेळी एसएससी बोर्डात समाजातून प्रथम आलेले मिहीर शरद पेंडकर, पार्थ जवळकर यांचा सत्कार भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन करण्यात आले. एचएससी मधून प्रथम आलेले प्रणाली महिंद्रकर तसेच पियुष महिंद्रकर यांचा देखील सत्कार भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन करण्यात आले. याच कार्यक्रमांमध्ये एनआयटी सुरतकल कर्नाटक येथे एमटेकसाठी निवड झालेल्या निनाद नवले याचाही सत्कार भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन करण्यात आला. कार्यक्रमास सुनील डोईजोडे, सतीश हिबारे, नवीन तापसे, विजय पुकाळे, सुभाष पाखरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यामध्ये भावसार महिला मंडळाच्या नूतन अध्यक्षा कृष्णा धायफुले, रविंद्र आकुडे, जगदीप दंतकाळे, शशिकांत रंगदळ, प्रकाश जवळकर, अशोक महिंद्रकर, सुर्यकांत खमितकर, संतोष आकुडे, श्रीकांत अंबुरे, विशाल खमितकर, सतिश हंचाटे, सुदाम पिसे, किसन गर्जे उपस्थित होते. सूत्रसंचालन गोपी नवले यांनी केले.



# 'आयआरसीटीसी'कडून धार्मिक पर्यटनाची पर्वणी

## पुरीपासून काशी, राजस्थान ते वैष्णोदेवीपर्यंत विविध रेल्वे टूर पॅकेज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

भारतीय रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (आयआरसीटीसी) प्रवाशांसाठी विविध धार्मिक व पर्यटनस्थळांना भेट देणारी विशेष भारत गौरव स्पेशल डिलक्स ट्रेन तसेच इतर रेल्वे टूर पॅकेज जाहीर केली आहेत. सोलापूरसह महाराष्ट्रातील प्रवाशांना या पॅकेजचा लाभ घेता येणार असल्याची माहिती हर्षवर्धन सिंग रावत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुरी गंगासागर बैद्यनाथ धाम यात्रा' ही ८ रात्री व ९ दिवसांची यात्रा ३० सप्टेंबर रोजी सोलापूरहून सुरू होणार आहे. या यात्रेत पुरी, भुवनेश्वर, गंगासागर आणि बाबा बैद्यनाथ धाम या धार्मिक स्थळांचा समावेश आहे. पॅकेजची सुरुवातीची किंमत १६,२८० रुपये आहे. त्यानंतर 'दिव्य राजस्थान सह खाटू श्याम जी आणि उज्जैन यात्रा' २१ ऑक्टोबर रोजी सोलापूरहून रवाना होणार आहे. ११ रात्री व १२ दिवसांच्या या यात्रेत उदयपूर, अजमेर, जोधपूर, जयपूर, खाटू श्याम जी आणि उज्जैन आदी ठिकाणांचा समावेश आहे. या पॅकेजची सुरुवातीची किंमत १८,६७० रुपये आहे.

याशिवाय 'पुरी गंगासागर दिव्य काशी यात्रा' १३ डिसेंबर रोजी पुण्याहून सुरू होणार आहे. ११ रात्री व १२ दिवसांच्या या यात्रेत पुरी, गंगासागर, गया, जसीडीह, वाराणसी, अयोध्या आणि बाबा बैद्यनाथ धाम आदी धार्मिक स्थळांना भेट दिली जाणार आहे. या पॅकेजची सुरुवातीची किंमत २०,८६० रुपये आहे. आयआरसीटीसीने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, स्टॅच्यू ऑफ युनिटी (३ रात्री/४ दिवस) पॅकेजची किंमत १०,००० रुपयांपासून, नाशिकसह शिर्डी व शनि शिंगणापूर (२ रात्री/३ दिवस) १२,२५० रुपयांपासून, माता वैष्णोदेवी (४ रात्री/५ दिवस) १२,५०० रुपयांपासून, तर अमृतसर (४ रात्री/५ दिवस) १५,४०० रुपयांपासून उपलब्ध आहे. तसेच हिमाचल २८,९०० रुपये, अमृतसर-धर्मशाला-डलहौसी ३३,४७५ रुपये, हैदराबाद व श्रीशैलम १५,५७५ रुपये, ओंकारेश्वर-महाकालेश्वर १९,४०० रुपये, द्वारका-सोमनाथ २०,१०० रुपये, प्रयागराज-अयोध्या-वाराणसी २५,५५५ रुपये आणि कोल्हापूर महालक्ष्मी-तिरुपती ११,९०० रुपयांपासून पॅकेज उपलब्ध असल्याचे पत्रकात नमूद केले आहे. सोलापूरसह महाराष्ट्रातील भाविक व पर्यटकांसाठी ही धार्मिक पर्यटनाची संधी ठरणार असल्याची माहिती ग्रुप जनरल मॅनेजर गौरव शहा यांनी दिली.

### कन्फर्म रेल्वे तिकीटासह बस प्रवासाची सोय

पॅकेजमध्ये कन्फर्म रेल्वे तिकीट, बस प्रवास, राहण्याची सोय, जेवण, जीएसटी आणि प्रवास विमा आदी सुविधांचा समावेश असल्याची माहिती आयआरसीटीसीने दिली आहे. अधिक माहितीसाठी आयआरसीटीसी टुरिसम च्या संकेतस्थळावरून बुकिंग करता येणार असून, ८२८७९३१८८६ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

## इंडियन दलित सेनेच्या शहराध्यक्षपदी दीपक आठवले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

इंडियन दलित सेनेच्या सोलापूर शहराध्यक्षपदी दिपक आठवले यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेची मासिक बैठक शासकीय विश्रामगृह येथे झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक देविदास दुपारगुडे होते. बैठकीला सुहास जोशी, स्वदीप वाघमारे, प्रफुल्ल दिलपाक, मंगल बनसोडे, राजू सुरवसे उपस्थित होते. इंडियन दलित सेनेचे संस्थापक अध्यक्ष देवीदास दुपारगुडे यांनी ही नियुक्ती जाहीर केली.





## शिवशाही फाउंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ ऑगस्ट-**

शिवशाही फाउंडेशन भारत आयोजित स्कूल चले हम अभियान अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा भवानी नगर बादोले बु व जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा बादोले बु या दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप शिवशाही फाउंडेशन भारतचे संस्थापक अध्यक्ष बाळाराम रखमाजी माडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, माजी सरपंच बाजीराव खरात, विठ्ठल खरात, पांडुरंग सलगरे, विठ्ठल कत्ते, सिध्दाराम बिराजदार, भिमा कत्ते, सिकंदर भाईजान, बसवराज पाटील, मुख्याध्यापक अशोक लवटे, मुख्याध्यापक लायप्पा सुडगाडे, एस. एन. कलशेट्टी, व्ही. आर. पवार, नागनाथ बिराजदार, पुष्पा तेलंगे, निलिमा जाधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना माडकर म्हणाले की आम्ही शिवशाही फाउंडेशन भारत स्कुल चले हम या अभियान अंतर्गत आजपर्यंत विदर्भ, कोकण, आदिवासी भागात, दुर्गम, डोंगरी भागात असलेल्या शाळेतील २३५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती दिली. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या गोरगरीब विद्यार्थीचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही समाजोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. आणि दरवर्षी तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करीत असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन नागनाथ बिराजदार यांनी केले तर आभार मुख्याध्यापक अशोक लवटे यांनी मानले.

## सकल मराठा समाजातर्फे उद्या आ. राजेंद्र राऊत यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ ऑगस्ट-**

सकल मराठा समाज बार्शीच्यावतीने महाराष्ट्र विधान परिषद सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भरघोस मतांनी विजयी झाल्याबद्दल मराठा भूषण राजेंद्र राऊत यांचा भव्य सत्कार सोमवार दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता मराठा मंदीर, छत्रपती कॅालनी, कुरडुवाडी रोड, बार्शी येथे आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या हस्ते, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हभप जयवंत बोधले महाराज तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढारे, मराठा महासंघाचे नेते दास शेळके, सोलापूरचे माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, शंभूराजे युवा क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुनील मोरे, मराठा सेवा संघ सोलापूरचे जिल्हाध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तरी सर्व मराठा समाज बांधवांनी सहकुटुंब सहपरिवारासह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# युवकांनी मेडिकल क्षेत्रात यावे : डॉ. लांबतुरे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

वैद्यकीय (मेडिकल) क्षेत्र हे केवळ एक करिअर नसून, मानवी जीवनाला नवी दिशा देणारे आणि समाजसेवा करण्याचे उत्तम माध्यम आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या अमर्याद संधी उपलब्ध असून, नवीन तंत्रज्ञानामुळे संशोधनाला मोठा वाव असून युवकांनी मेडिकल क्षेत्रात यावे, असे प्रतिपादन डॉ. अशोक लांबतुरे यांनी केले.

सोलापूर जिल्हा सहकारी बोर्डाची ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा जगदाळे मंगल कार्यालय माढा येथे बोर्डाचे अध्यक्ष प्राचार्य विलास लेंगरे यांच्या अध्यक्षेत पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. सदर सभेस सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. जिल्हयातून आलेल्या सर्व सभासदांचे स्वागत जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक शहाजी साठे व प्रकाश आरे यांनी केले. या सभेत जेष्ठ समाजसेवक व दलितमित्र डॉ. अशोक लांबतुरे व सौ. सुरेखा लांबतुरे यांचा सत्कार पश्चिम महाराष्ट्र सहकारी संघाचे संचालक मानसिंगराव साठे व जयश्री साठे यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. स्वप्निल लांबतुरे यांचा सत्कार उपाध्यक्ष मल्लिनाथ बगले-पाटील यांच्या हस्ते तर राज्य लेबर फेडरेशनचे संचालक मनोज साठे यांचा सत्कार प्राचार्य विलास लेंगरे यांच्या हस्ते व पंचायत समिती सदस्या सोनाली साठे यांचा सत्कार संचालिका रत्नमाला माने यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हयातील पहिले सहकार महर्षी कै. गणपतराव साठे यांनी सुरू केलेली सहकारी चळवळ विकसित करण्यासाठी युवकांनी सहकारात यावे, असे आवाहन प्राचार्य विलास लेंगरे यांनी केले.

सदर सभेस संस्थेचे संचालक अरविंद पांढरे, बजरंग पांढरमिसे, अशोक लेंडवे, समीर शेख, अंबादास बिराजदार, उत्तम रणदिवे तसेच कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी अनिल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कोळा येथे आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.८ ऑगस्ट-**

माजी आमदार गणपतराव देशमुख यांच्या शताब्दी जयंती वर्षानिमित्त कोळा (ता. सांगोला) येथे दक्षता हॉस्पिटल, श्री हॉस्पिटल आणि डॉ.बाबासाहेब देशमुख मेडिकल फॅकल्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिर पार पडले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी गणपतराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण तुकाराम आलदर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी सोपान कोळेकर, कुंडलिक आलदर, दिलीप देशमुख, मारुती सरगर, शहाजी हातेकर, सीताराम सरगर, रमेश कोळेकर, शिवाजी आलदर, डॉ.सादिक पटेल, अशोक आलदर, दिलीप कोळेकर, दगडू कोळेकर, ॲड.धायप्पा आलदर, ॲड.निलेश मदने, दत्ता सरगर, बाळासाहेब कोळेकर, अंबादास सरगर, डॉ.बापूसाहेब सरगर, वंदना सरगर, बंडू व्हनमाने, अजर खाटीक, तुषार माने, डॉ.किरण सरगर-मस्के, डॉ.निरंजन केदार, डॉ.सागर तेली, सचिन चांदणे उपस्थित होते.



## महत्त्वाचे...



### पंढरपूर यात्रेचे उत्कृष्ट नियोजन; पालकमंत्री गोरे यांचा सत्कार

**सांगोला, दि. ८ ऑगस्ट-**

पंढरपूर आषाढी यात्रेच्या यशस्वी नियोजनाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेतर्फे बोराटवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजा माने, प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, महासचिव विकास भोसले, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष धनंजय पाणसंडे, सचिव लिंगराज साखरे, सातारा जिल्हाध्यक्ष संतोष शिराळे, डॉ.संतोष जोगदंड उपस्थित होते. पंढरपूर यात्रेदरम्यान राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पंढरपूरमध्ये दाखल झाले होते. या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, भाविकांची सुरक्षितता, निवास, पाणी, आरोग्य तसेच इतर मूलभूत सुविधांचे योग्य नियोजन करणे हे मोठे आव्हान होते. मात्र, संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून यात्रा नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडल्याबद्दल यावेळी समाधान व्यक्त करण्यात आले. राज्यातील विकासकामे, ग्रामविकासाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासाला मिळणारी गती व डिजिटल माध्यम क्षेत्रातील पत्रकारांच्या प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा झाली.




### रोटरी क्लब अकलूजचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**अकलूज, दि. ८ ऑगस्ट-**

रोटरी क्लब अकलूजच्या २०२६-२७ च्या कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा पार पडला. स्मृतीभवन शंकरनगर- अकलूज येथे हा सोहळा झाला. मावळते अध्यक्ष रो.केतन बोरावके व सचिव रो. अजिंक्य जाधव यांनी प्रमुख अतिथी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे २०२७-२८ नियुक्त प्रांतपाल रो. क्षितिज झावरे व २०२६-२७ चे सहाय्यक प्रांतपाल रो.डॉ. साजिक पाटील यांच्या उपस्थितीत नूतन अध्यक्ष रो. डॉ. मनिष गायकवाड व सचिव रो. अभिषेक टेके यांच्याकडे पदभार सोपविला. क्षितिज झावरे यांची ओळख रोटरी डिस्ट्रिक्ट मेंबरशिप डायरेक्टर सीए नितीन कुदळे यांनी केली. प्रमुख अतिथींनी रोटरीचे सामाजिक कार्य, विविध सेवा प्रकल्प आणि समाजासाठी रोटरीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.नूतन अध्यक्ष गायकवाड यांनी आगामी वर्षातील विविध प्रकल्पांची रूपरेषा मांडली. यावेळी नूतन संचालक मंडळाची घोषणा करण्यात आली. यावेळी कवयित्री गुंजन पाटील यांचे खुमासदार कविता सादरीकरण. आपल्या विनोदी तसेच विचार करायला भाग पाडणाऱ्या कवितांनी त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.




### चिकाटी, कष्टाची तयारी असल्यास यशाची निश्चिती : प्रदीप गोरड

**माळशिरस, दि. ८ ऑगस्ट-**

चिकाटी व कष्ट करण्याची तयारी असेल तर कोणतेही यश मिळते, शिस्त असेल आपण यशस्वी होऊ शकतो असे, प्रतिपादन प्रदीप गोरड यांनी गोपाळराव देव प्रशालेच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलताना केले. यावेळी श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष ॲड. माधव मिरासदार ,कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, कार्यवाह रामचंद्र दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले, सर्व संचालक, मुख्याध्यापक सूर्यकांत जानकर, नगरसेवक माणिक वाघमोडे, बाळासाहेब सरगर, सचिन वावरे, आप्पासाहेब वाघमोडे, सुरेश टेळे उपस्थित होते. सुरवात प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापक सूर्यकांत जानकर यांनी केले. सूत्रसंचालन काटकर यांनी तर पारितोषिक वाचन राजमाने यांनी केले. आभार कुलकर्णी यांनी मांडले. कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापिका दिक्षित, पर्यवेक्षक बाबर उपस्थित होते.

### जनरल कामगार सेनेच्या शहर सचिवपदी लक्ष्मण भोसले

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये जय महाराष्ट्र माथाडी आणि जनरल कामगार सेनेच्या लक्ष्मण आबा भोसले यांची शहर सचिवपदी निवडीचे पत्र शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी खासदार धैर्यशील माने, खासदार ज्योती वाघमारे, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, महेश साठे, अमोल शिंदे, उत्तमप्रकाश खंदारे उपस्थित होते. यावेळी संघटनेचे सरचिटणीस राजेश महाडीक, उपाध्यक्ष अमर लोखंडे, सचिव अनिल भोदूर, दिलीप भोरे, महिंद्र जाधव उपस्थित होते.

## केळीच्या दरात महिनाभरात प्रतिकिलो १५ रुपयांची घसरण

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ८ ऑगस्ट-**

केळीच्या दरात महिनाभरात ३५ रुपये प्रतिकिलोवरुन २० रुपयांपर्यंत घसरण झाली आहे. महिनाभरातच दरात एवढी मोठी घसरण झाल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. पिलीव परिसरात मोठ्या प्रमाणात केळी लागवड झालेली आहे. मात्र सद्य स्थितीत उत्पादन खर्चाचा ताळमेळ लागत नसल्याने निराशा आहे.

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात शेतकरी सध्या ऊसा ऐवजी केळीच्या शेतीकडे वळला आहे. केळी पकापासून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होत होता. गतवर्षी आखाती देशात सुरु असलेल्या युद्धामुळे खरेतर भारतातून केळी त्या देशात निर्यात झालीच नाही. परिणामी केळी उत्पादक शेतकऱ्यांना चांगलाच फटका बसला. मात्र आता युद्धजन्य परिस्थिती संपल्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा मोठ्या



प्रमाणावर केळीची लागवड केली आहे. शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्याची अपेक्षा आहे. गेल्या महिन्यात अगदी ३५ रुपये प्रतिकिलो एवढा चांगला दर होता. त्यावेळी केळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. पण हा महिना संपताच केळीच्या दरात अचानकच जवळपास १५ रुपये प्रती किलो एवढी घसरण झाली. शेतीची मशागत करुन केळीची रोपे लावण्यापासून ते केळी विक्री पर्यंत असा एकुण एकरी दोन लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. सध्या हा दर जवळपास २० रुपये किलोवर आला आहे. मात्र या दरातून उत्पादन खर्चाचा ताळमेळ जमत नाही. श्रावण महीना चार दिवसावर आला आहे. या महिन्यात लोक उपवास करतात. यामुळे केळीला मोठी मागणी यामुळे दरवाढ होईल अशी अपेक्षा आहे. पिलीव परीसरातील शेतकरी ऊस शेतीऐवजी केळी लागवडीकडे वळले, मात्र दर मिळत नसल्याने त्यांचा हिरमोड झाला आहे.

> आम्ही केळी लागवडीसाठी मोठा खर्च केला आहे. गेल्या महिन्यात चांगला दर होता, पण या महिन्यात अचानकच दर कमी झाला. परिणामी आमच्यापुढील चिंता वाढली आहे. दरवाढ व्हावी अशी अपेक्षा आहे.
> - **विजय मदने,** केळी उत्पादक शेतकरी, झिंजेवस्ती.

## भोसरेतील आरोग्य उपकेंद्र अखेर सुरु

### अनेक वर्षापासून रखडलेले काम पूर्ण; हद्दवाढ भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मिटला

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ८ ऑगस्ट-**

भोसरे गावातील हद्दवाढ भागातील आरोग्य सेवेसाठी कोणतीही सोय उपलब्ध नव्हती. अनेक वर्ष प्रलंबित असलेला हा प्रश्न माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या शिफारशीने सुटला आहे. हद्दवाढ भागासाठी नेमणूक असलेल्या 'एएनएम' मार्फत आरोग्य सेवा सुरू आज सुरू करण्यात आली.



जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडे सतत पाठपुरावा करून प्रभाग क्र. २ च्या सदस्या सूलन बागल यांनी लसीकरण केंद्र इमारतीसाठी निधी मंजूर करून बांधकाम पूर्ण केले होते. सदर ठिकाणी सेवा उपलब्ध झाल्यास तेथील नागरिकांची सोय होणार आहे. पंचायत समिती सदस्य गटनेते डॉ. आशिष रजपूत यांच्या पाठपुराव्याने तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी स्वतंत्र भोसरे प्राथमिक आरोग्य केंद्र २ एएनएम म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यामुळे गरोदर मातांना नियमित तपासणी, लसीकरण आणि प्रसूतीपूर्व मार्गदर्शनासाठी दूर इतर रुग्णालयांत पायपीट करावी लागणार नाही. बालके, नवजात बालकांच्या लसीकरण मोहिम, वृद्ध व आजारी व्यक्तींना प्रथमोपचार किंवा रक्तदाब, मधुमेह यांसारख्या आजारांवरील नियमित गोळ्या घेण्यासाठी खाजगी वाहनाचा खर्च वाचणार आहे. लसीकरण केंद्रात शुभांगी माळी रुजू झाल्या आहेत. त्यांचे स्वागत माढा तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती शीला रजपूत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे गटनेते डॉ. आशिष रजपूत भोसरे, गावचे उपसरपंच अमोल खोत, माजी ग्रामपंचायत सदस्य राजू भालेराव, संभाजी ब्रिगेडचे अल्ताफ शेख. जि.प. शाळेचे मुख्याध्यापक गणेश गोसावी, आंगणवाडीच्या शिरसठ, कोळी उपस्थित होते.

## आल्या गेल्याचा विचार करु नका : सुषमा अंधारे

### विचार विनिमय बैठकीत शिवसैनिकांना सल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ ऑगस्ट-**

उद्धव ठाकरे हे शिवसैनिक पेरणारे आहेत. त्यामुळे आल्या गेल्याचा विचार करत बसू नका. आपल्याला दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडा. शिवसेनेच्या रामरक्षा कार्यक्रमाची तयारी करा, असा सल्ला शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी दिला .

शिवसेनेच्या वतीने मोहोळ येथील शुभम हॉल येथे विचार विनिमय बैठक पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या . यावेळी उपस्थित शिवसैनिकांची मते जाणून घेण्यात आली. उपजिल्हाप्रमुखासह तालुका स्तरावरील रिक्त पदाच्या नियुक्त्या करण्याबाबत इच्छुकांची नावे घेण्यात आली आहेत. लवकरच या निवडी जाहीर करण्यात येतील असेही अंधारे म्हणाल्या. उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुखासह विधानसभा प्रमुखांच्या इच्छुकांशी नावे आजमावून घेत लवकरच याबाबत निवडी केल्या जाणार असल्याचे सांगितले. यावेळी सेनेचे जिल्हाप्रमुख प्रवीण काकडे, पंढरपूर विभागाचे जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे, उपजिल्हाप्रमुख विक्रांत काकडे, मोहोळ विधानसभा संपर्कप्रमुख हुजूर इनामदार, तालुकाप्रमुख अशोक भोसले, युवा सेनाप्रमुख महेश देशमुख, मनोज नागणे, माजी नगरसेविका सीमा पाटील, नगरसेविका वृषाली जाधव, माजी नगरसेवक सत्यवान देशमुख, सौरभ देशमुख, तुकाराम माने, बाळासाहेब वाघमोडे, दिलीप टेकाळे, दिलीप मोटे, दिपक शिरसट उपस्थित होते.




> **स्थानिक नेते विरोधकांना मॅनेज होतात**
> निवडणूकीच्या वेळी स्थानिक नेते विरोधकांना मॅनेज होतात. परिणामी ग्रामीण भागातील प्रामाणिक शिवसैनिकांची अडचण होते. काम करता येत नाही.
> - विनोद भोसले, शिवसैनिक.




## सुनेत्रा पवार यांच्यावरील वक्तव्याविरुध्द संताप; मोहोळमध्ये निषेध आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ ऑगस्ट-**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुंगी गुडिया असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्याच्या निषेधार्थ आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार), मोहोळ शहरच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या छायाचित्रास जोडे मारून आंदोलनकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच वक्तव्याचा तीव्र निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष सुमित पवार, महिला तालुकाध्यक्ष प्रज्ञा बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष सौदागर बाबर, शहर कार्याध्यक्ष साजिद हुंडेकरी, सुनील चव्हाण, वैशाली बनसोडे, लतिका बनसोडे, गणेश टेळे, भैय्या सोलनकर, सोनू पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुनेत्रा पवार यांच्याबाबत केलेले वक्तव्य हे अत्यंत अयोग्य आहे. त्यातून महिलांचा अवमान केला आहे, असा आरोप पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला.

## अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर 'भारतरत्न' द्या

### खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची पंतप्रधानांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ ऑगस्ट-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या असाधारण साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.





खासदार मोहिते-पाटील यांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या पत्रात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आणि साहित्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. अण्णाभाऊंनी १३ लोकनाट्ये, ३ नाटके, १३ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, १ शाहिरी ग्रंथ, १५ पोवाडे, १ प्रवासवर्णन आणि ७ चित्रपट कथांचे लेखन केले आहे. त्यांची फकीरा ही कादंबरी मराठी साहित्यातील अमूल्य ठेवा मानली जाते. तिला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार मिळाला आहे. २७ भारतीय व परदेशी भाषांमध्ये तिचा अनुवाद झाला आहे. अण्णाभाऊंचे साहित्य केवळ मराठी भाषेपुरते मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाचे एक सशक्त माध्यम बनल्याचाही उल्लेख खासदार मोहिते-पाटील यांनी पत्रात केला आहे.

जनभावना आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे अद्वितिय राष्ट्रीय योगदान विचारात घेऊन त्यांना मरणोत्तर भारतरत्न देऊन सन्मानित करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी, अशी विनंती खासदार मोहिते-पाटील यांनी केंद्र सरकारला केली आहे.

## क्रांतीसूर्य प्रतिष्ठानतर्फे वह्या वाटप

**सोलापूर, दि. ८ ऑगस्ट-**

साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीसूर्य प्रतिष्ठानतर्फे शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. प्रथमत: अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेविका राजश्री दोडमनी, मिनल दास, मिनाक्षी पेठे, श्रीकांत बोराडे, अशोक लोंढे, अनिल उकरंडे, शशिकांत उकरंडे, प्रदिप ठाकूर, अजय धडे, बाळासाहेब लोंढे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आदर्श धडे, रेहान बिराजदार उपस्थित होते. प्रास्ताविक सोनलकर यसांनी केले तर आभार आदर्श धडे यांनी मानले.

## बार्शीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ८ ऑगस्ट-**

बार्शी शहरात ऐनापूर मारुती मंदिर परिसरातील तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

प्रसाद पवार (वय २८, रा. आदर्शनगर, साई मंदिराजवळ, गाडेगाव रोड, बार्शी) असे मृत तरुणाचे नाव आहे. ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजण्यापूर्वी ऐनापूर मारुती मंदिराजवळील 'जोशी एंटरप्रायजेस' या पशुखाद्य विक्रीच्या दुकानात ही घटना घडली. प्रसाद पवार हा या दुकानात कामगार म्हणून कार्यरत होता. दुकानाच्या वरील बाजूस असलेल्या लोखंडी हुकाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत प्रसाद पवार आढळून आल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली. घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी सुरेश जोशी (वय ६२, रा. वाणी प्लॉट, बार्शी) यांनी पोलिसांना खबर दिली. त्यानंतर बार्शी शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद झाली आहे. घटनेचा तपास हवालदार प्रमोद केकान करत आहेत.

## बार्शीत विनापरवाना डीजेवर कारवाईचे सत्र सुरु

### टेम्पोसह साऊंड सिस्टीम जप्त; चालक व डीजे ऑपरेटरवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ८ ऑगस्ट-**

बार्शी शहरातील ऐनापूर मारुती चौक परिसरात सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता डीजे वाजवून ध्वनीप्रक्षेपण केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी कॉ.कादर तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वाहनचालक अक्षय शिंदे (वय २८, रा. वानेवाडी, ता. बार्शी) व डीजे ऑपरेटर शिवलिंग खेडकर, (रा. पंकजनगर, बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अभय माकणे, सपोफौ अजित वरपे व सहकारी पोलीस शिपाई यांची ऐनापूर मारुती चौक परिसरात गस्त सुरु होती. त्यावेळी एमएच २५ बी ६५१० क्रमांकाच्या टेम्पोमध्ये डीजे लावून ध्वनीप्रक्षेपण सुरु असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. यावेळी पाचपेक्षा अधिक व्यक्ती तेथे जमल्या असून डीजेच्या तालावर नृत्य सुरु असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

डीजे ऑपरेटरकडे ध्वनीक्षेपक वापरण्याची वैध परवानगी नसल्याचे समोर आले. त्यानंतर वाहनचालक व डीजे ऑपरेटरवर पोलिसांनी कारवाई केली.

सोलापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाच्या ३ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशानुसार ५ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार आदेश लागू करण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप संबंधितांवर ठेवण्यात आला आहे.



या कारवाईत पोलिसांनी एमएच २५ बी ६५१० क्रमांकाचा टेम्पो आणि डीजेची बेस-टॉप साऊंड सिस्टीम ताब्यात घेतली. पोलिसांच्या नोंदीनुसार वाहनाची किंमत सुमारे ३ लाख रुपये, तर बेस व टॉपची किंमत सुमारे ८० हजार रुपये, अशी एकूण अंदाजे ३ लाख ८० हजार रुपयांची मालमत्ता तपासासाठी जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून, यापुढेही शहरात विनापरवाना डीजेवर कारवाईचे सत्र सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणाचा पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.



एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटना

## आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त

दैनिक तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...!

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद- कर्मवीर

कर्मवीर पारितोषिक प्राप्त आदर्श विद्यालय

रयत शिक्षण संस्थेचे

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलिपे जुनिअर कॉलेज

पिलीव ता. माळशिरस जि. सोलापूर.

**उपलब्ध सुविधा-**

1) प्रत्येक वर्गात SMART INTRACTIVE BOARD (AI) द्वारे अध्यापन
2) ARTIFICIAL INTELLIGENCE (कृत्रिम बुद्धिमत्ता) अभ्यासक्रमाची सोय
3) विविध खेळासाठी मैदाने
4) विविध स्पर्धा परीक्षांची परिपूर्ण तयारी व उत्कृष्ट निकालाची परंपरा
5) एस.एस.सी व एच.एस.सी. उत्कृष्ट निकालाची परंपरा
6) संपूर्ण विद्यालय परिसर, सर्व वर्गखोल्या CCTV निरीक्षणाखाली
7) संदर्भ ग्रंथांसाठी समृद्ध ग्रंथालय
8) रयत अनिवासी गुरुकुल प्रकल्प (इ.५ वी ते इ.१० वी)
9) विविध क्षेत्रातील व्यवसाय संधीसाठी बाह्य तज्ज्ञांचे मार्गदर्शन
10) NEET, JEE MAIN & MHT-CET तयारी
11) अध्यायवत व सुसज्ज PHYSICS, CHEMISTRY, BIOLOGY लॅब




पर्यवेक्षक श्री. मासाळ जे.एस.

मुख्याध्यापक श्री. बागल एस. ए.

---

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

**अरुल पेंट्स**

7720001144 / 8149831344

Paints | Waterproofing | Putty | Primer

All Types of Wallpapers

asianpaints | Berger | Birla Opus

भारती विद्यापीठ जवळील चैतन्य शॉपिंग सेंटर, गाळा नं. 2 डॉ. काळे यांच्या शेजारी, जुळे सोलापूर, सोलापूर.413004

---

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

भारत सरकार नोटरी



मो. 9850277944 / 9423327580

## ॲड. श्री.आर.यू. वैद्य

(उपळाईकर) B.A.,LL.B.

जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.

ॲड. श्री. के.पी. राऊत, ॲड. एस.पी. शहा

ऑफिस : ''श्री विठ्ठल निवास'' आदित्य कृष्णानगर उपळाई रोड, दोन लिंबा जवळ, बार्शी, जि. सोलापूर

---

सोलापूर 'तरुण भारत' वर्धापनदिन

चिरायु होवो..!

* शुभेच्छुक *



## श्री. ज्ञानेश्वर नारायण दुधाणे

---

'सोलापूर तरुण भारत'

वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

## Dattatray S. Mule

Govt. Contractor

- DIGVIJAY READYMIX CONCRETE
- DIGVIJAY CONSTRUCTION & HOT MIX
- DIGVIJAY TRADERS
- DIGVIJAY INFRACON




2, Smruti Prakash Towers, Opp. Kinara Hotel, Solapur. datta.mule99@gmail.com M. 9822023939

---

दै.तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

**रुद्रशक्ती गुरुकुल मर्दानी खेळ प्रशिक्षण केंद्र, सोलापूर**

गुरुकुलमध्ये शिकवले जाणारे प्रकार

* लाठी युद्ध * लाठी काठी * तलवारबाजी * दांडपट्टा * फरीगदगा * उर्मी * फास * भाला * कराटे * योंगमुडो (कोरियन मार्शल आर्ट)

शाखा १: राजर्षी शाहू प्रशाला, जुना विडी घरकुल, सोलापूर.
शाखा २: एच ग्रुप, जुना विडी घरकुल, सोलापूर.
शाखा ३: छत्रपती शिवस्मारक, नवी पेठ शिंदे चौक, सोलापूर.

मुख्य प्रशिक्षक : विवेक मिस्कीन

सेंकड दान ब्लॅक बेल्ट (कोरिया). मोबाईल: ९५०३०३९६२७

---

तरुण भारतच्या ४२व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -

**खासदार धैर्यशील (भैय्यासाहेब) मोहिते पाटील**
अध्यक्ष, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन

**महेश (भैय्या) धाराशिवकर**
अध्यक्ष, सोलापूर चेस अकॅडमी

**सुमुख गायकवाड**
सचिव सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन

संपर्क ९४२३२८०२५२/८८८८०४५३४४

---

दै.सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

## छत्रपती संभाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,सोलापूर

३३०, पूर्व मंगळवार पेठ, दक्षिणमुखी मारूती मंदिरासमोर, कुंभार वेस, सोलापूर संपर्क ८३२९२७९२२७

* सतत अ वर्ग दर्जा
* मागील वर्षी सभासदांना १० टक्के लाभांश
* नफ्यामध्ये दरवर्षी सातत्याने भरीव वाढ

## तृतीय वर्धापन दिनानिमित्त ठेवीवर

सातत्याने यशस्वीतेकडे वाटचाल

## ११% व्याजदर

**अधिक माहितीसाठी संपर्क 8329279227**

# विकासाच्या उंबरठ्यावरील वैराग...



## संधी, आव्हाने आणि अपेक्षांचा वेध!

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील वैराग हे केवळ एक गाव किंवा नगरपंचायत राहिलेले नाही, तर ते जवळपास ५६ ते ६० ग्रामीण खेड्यांचा मुख्य केंद्रबिंदू आणि हक्काची बाजारपेठ बनले आहे. सुमारे २५ ते ३० हजारांच्या आसपास लोकसंख्या असलेल्या या शहराला मोठा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सहकाराचा वारसा लाभला आहे.**



प्रभाकर क्षीरसागर
भ्र. ७२१८३३८००९

गेल्या दशकभरात बार्शी– वैराग– सोलापूर या राज्य महामार्गाचे झालेले रुंदीकरण आणि ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत झालेले रूपांतर यामुळे वैरागच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली असली, तरी वाढती बेरोजगारी, तरुणांमधील व्यसनाधीनता, औद्योगिक मागासलेपण आणि हक्काच्या तालुक्याचा दर्जा न मिळाल्याने स्थानिक पातळीवर अनेक गंभीर प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहेत.

**१. महामार्ग रुंदीकरण : प्रवासाला गती, पण अपघातांचे सत्र आणि जड वाहतुकीचा ताण**

बार्शी– वैराग– सोलापूर रस्त्याच्या सुधारणा आणि रुंदीकरण प्रकल्पामुळे या भागाचे चित्र बदलले आहे. मात्र, या बदलाचे दोन्ही पैलू समोर येत आहेत.

**फायदे –**

पूर्वी खड्डे आणि अरुंद रस्त्यामुळे बार्शी ते सोलापूर प्रवासाला २ ते अडीच तास लागायचे, आता हे अंतर अवघ्या १ ते दीड तासात पार करणे शक्य झाले आहे. वैराग परिसरातील कृषी उत्पादने, दूध व भाजीपाला सोलापूर आणि बार्शीच्या मुख्य बाजारपेठेत जलद गतीने पोहोचत आहेत. गंभीर रुग्णांना सोलापूरच्या रुग्णालयांमध्ये वेळेत पोहोचवणे शक्य झाल्याने गोल्डन अवरमध्ये अनेकांचे प्राण वाचत आहेत.

**वाढते अपघात आणि आव्हाने–**

रस्ता गुळगुळीत व प्रशस्त झाल्यामुळे वाहनांचा वेग प्रचंड वाढला आहे. योग्य गतिरोधक आणि जंक्शनवर पुरेशी सुरक्षा यंत्रणा नसल्यामुळे बार्शी– सोलापूर महामार्गावर अपघातांचे प्रमाण अत्यंत चिंताजनक रीतीने वाढले असून अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

व्यवसायांना फटका व वाहतूक कोंडी: रस्ता काही गावांबाहेरून (बायपास) गेल्याने रस्त्यालगतचे छोटे हॉटेल व्यावसायिक आणि टपऱ्यांचा व्यवसाय मंदावला आहे. तसेच, लातूर– धाराशिवकडून सोलापूर– पुण्याकडे जाणारी अतिजड वाहने याच मार्गाचा वापर करत असल्याने वैराग नाक्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

**२. नगरपंचायत स्थापना: नागरीकरणाची नवी पहाट आणि नवे प्रश्न**

१८ मे २०२१ रोजी वैराग नगरपंचायतीची स्थापना झाली. या ऐतिहासिक निर्णयामुळे शहराच्या रचनेत मोठे प्रशासकीय बदल झाले आहेत.

**सकारात्मक बदल:**

ग्रामपंचायतीच्या तुलनेत आता नगरपंचायतीला थेट मोठा विकासनिधी मिळत आहे. यामुळे अंतर्गत सिमेंट रस्ते, भुयारी गटारे, आधुनिक पथदिवे आणि कचरा व्यवस्थापनाला गती मिळाली आहे. मुख्याधिकारी आणि सक्षम कर्मचारी वर्ग तैनात झाल्यामुळे कामाचा वेग वाढला आहे.

**नवे प्रश्न आणि आव्हाने: –**

नगरपंचायतीमुळे कररचनेत मोठी वाढ झाली असून रहिवाशांना नागरी दराने कर भरावा लागत आहे. बांधकाम करण्यासाठी आता नगररचना विभागाची मंजुरी बंधनकारक झाल्याने कायदेशीर प्रक्रिया आणि खर्च वाढला आहे. राजकीय पातळीवर, एक सरपंच असण्याऐवजी आता १७ प्रभागांचे १७ नगरसेवक आणि नगराध्यक्ष अशी नवी राजकीय फळी तयार झाली असून स्थानिक राजकारण अधिक सक्रिय झाले आहे.

**३. औद्योगिक मागासलेपण, बेरोजगारीचे सावट आणि तरुणांचे स्थलांतर–**

वैराग हे जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे केंद्र असूनही येथे अद्याप स्वतंत्र एमआयडीसी अधिकृतरीत्या सुरू होऊ शकलेली नाही. त्यातच वैराग भागातील सहकार क्षेत्राचा कणा असलेला संतनाथ (पूर्वीचा भोगावती) सहकारी साखर कारखाना गेल्या दोन दशकांहून अधिक काळ (साधारण २००४–०५ पासून) पूर्णपणे बंद अवस्थेत आहे.

**तरुणांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर:–**

स्थानिक पातळीवर मोठे उद्योग किंवा नोकऱ्या उपलब्ध नसल्यामुळे वैराग व परिसरातील ५७ खेड्यांमधील सुशिक्षित तरुण रोजगारासाठी पुणे, मुंबई किंवा सोलापूरसारख्या मोठ्या शहरांकडे स्थलांतर करत आहेत.

**व्यसनाधीनतेचा विळखा:–**

हाताला काम नसणे आणि बेरोजगारी यामुळे स्थानिक तरुण पिढीमध्ये नैराश्याची भावना वाढत असून, तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढताना दिसत आहे, जी समाजासाठी एक धोक्याची घंटा आहे.

**कृषी क्षेत्राला फटका–**

कारखाना बंद पडल्याने ऊस गाळपासाठी शेतकऱ्यांना शेजारच्या धाराशिव किंवा इतर तालुक्यांवर अवलंबून राहावे लागत असून वाहतूक खर्च वाढला आहे. शेतीमालावर प्रक्रिया करणारे कोल्ड स्टोरेज किंवा फूड प्रोसेसिंग प्लांट नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सोसावा लागत आहे.

**४. शैक्षणिक क्रांती आणि कृषी पर्यटनाची नवी आशा–**

वैराग शहराचा शिक्षणाचे मुख्य केंद्र म्हणून मोठा नावलौकिक आहे. दररोज परिसरातील हजारो विद्यार्थी– विद्यार्थिनी येथे उच्च शिक्षणासाठी येतात. गेल्या काही वर्षांत येथे कला, वाणिज्य, विज्ञान शाखांसोबतच संगणक, आयटी आणि स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करणाऱ्या अकॅडमींचे जाळे विस्तारले आहे.

**कृषी पर्यटनाची नवी पहाट –**

बदलत्या काळानुसार वैराग भागात आता नव्याने कृषी पर्यटनाची संकल्पना रुजू लागली आहे. यामुळे शहरी नागरिकांना ग्रामीण



संस्कृतीची ओळख होत असून, भविष्यात या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

**डिजिटल बदल व थेट विक्री–**

कोरोना काळानंतर येथील शिक्षण अधिक डिजिटल झाले आहे. तसेच, तरुण शेतकऱ्यांनी दलालांची साखळी तोडून सोशल मीडिया व थेट बाजारपेठेच्या माध्यमातून कृषी उत्पादने थेट सोलापूर– पुण्यापर्यंत पोहोचवण्यास सुरुवात केली आहे. भूगर्भातील घटती पाण्याची पातळी पाहता, लोकसहभागातून जलसंधारणाची व जलसाक्षरतेची कामे या भागात वेगाने सुरू झाली आहेत.

**५. बाजारपेठेचा विस्तार आणि स्वतंत्र तालुका निर्मितीची हक्काची मागणी –**

वैरागची वाढती आर्थिक उलाढाल पाहून गेल्या १० वर्षांत विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांच्या शाखा सुरू झाल्या आहेत. वैरागचा प्रसिद्ध आनंद बाजार आणि जनावरांचा बाजार आजही तितक्याच उत्साहात भरतो. मात्र, मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणांमुळे या बाजारपेठेला शिस्त लावण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. वाढत्या शहरीकरणामुळे शेतजमिनींचे भाव गगनाला भिडले असून गुंठेवारीचे प्रमाण वाढले आहे.

**मुख्य मागणी–** वैराग येथे पोलीस ठाणे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असले, तरी तहसील कार्यालय, न्यायालय आणि इतर मुख्य प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना आजही बार्शीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे वैराग स्वतंत्र तालुका कधी होणार? हा येथील जनतेचा मुख्य प्रश्न आहे.

**निष्कर्ष आणि अपेक्षा–** एमआयडीसी आणि उद्योगांची गरज!

वैरागमध्ये विकास करण्याची क्षमता मोठी आहे–उत्तम रस्ते आहेत, बाजारपेठेचे जाळे आहे, शिक्षणाची उत्तम सोय आहे आणि तरुण पिढीची मोठी ताकद आहे. आज वैरागच्या बेरोजगार तरुणांची आणि व्यापारी वर्गाची एकच प्रमुख मागणी आहे की, येथे लवकरात लवकर स्वतंत्र एमआयडीसी मंजूर होऊन छोटे–मोठे उद्योग सुरू व्हावेत. जर वैरागमध्ये औद्योगिक विकास झाला आणि बाजारपेठेला अजून आधुनिक रूप मिळाले, तर स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होतील. परिणामी, तरुणांना पुणे, मुंबई किंवा सोलापूर सारख्या मोठ्या शहरांमध्ये जाण्याचीगरजभासणारनाही,तसेचस्थलांतरवव्यसनाधीनतेसारख्या समस्यांवर कायमचा आळा बसेल. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिल्यास वैराग हे सोलापूर जिल्ह्यातील एक आदर्श, स्वयंपूर्ण आणि प्रगत शहर म्हणून नावारूपास येईल, यात शंका नाही!

# जिद्द, डौल आणि धाडस! डर्बन ते सोलापूर अभिमानाची दौड

**डर्बन, दक्षिण आफ्रिका येथे १४ जून २०२६ रोजी पार पडलेल्या ९० किमी कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये डॉ. स्मिता राहुल झांजुर्णे यांनी सहभाग घेतला. ही अत्यंत कठीण मॅरेथॉन १० तास २५ मिनिटांत पूर्ण करून एक अनोखा विक्रम नोंदवला. सलग दोन वेळा ही स्पर्धा पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या सोलापूरकर ठरल्या. डॉ. स्मिता या मूळच्या सोलापूरच्या असून लग्नानंतर पुण्यात वास्तव्यास आहेत. २०२५ मध्ये सोलापुरातील तीन भावंडांनी (डॉ. सत्यजित वाघचवरे, डॉ. स्मिता वाघचवरे- झांजुर्णे आणि डॉ. अभिजीत वाघचवरे ) यांनी एकत्र येऊन ही ९० किमी कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन पूर्ण केली होती. हा एक प्रकारचा जागतिक विक्रमच होता. यावर्षी मात्र डॉ. स्मिता यांनी सलग दुसऱ्यांदा ही मोहीम फत्ते करत बॅक टू बॅक कॉम्रेड मॅरेथॉन फिनिशर हा बहुमान मिळवला. सोलापूरसाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.**



**दंतवैद्यक ते बॅक टू बॅक कॉम्रेड फिनिशर**

**सलग दोनदा कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉन जिंकणाऱ्या डॉ. स्मिता वाघचवरे- झांजुर्णे पहिल्या सोलापूरकर**



डॉ. सत्यजित वाघचवरे
सोलापूर

पेशाने डेंटिस्ट असलेल्या डॉ. स्मिता यांना शालेय जीवनापासूनच खेळाची आवड होती. हरिभाई देवकरण प्रशालेच्या विद्यार्थिनी असताना त्यांनी खो– खो, बास्केटबॉल यांसारख्या खेळांमध्ये विशेष नैपुण्य दाखवले होते. आई–वडिलांच्या आणि मोठ्या भगिनीच्या प्रोत्साहनामुळे त्यांचा खेळाशी असलेला संबंध कायम राहिला. दंतवैद्यकीय शाखेत प्रवेश घेतल्यानंतर काहीकाळ खेळापासून दुरावलेल्या डॉ. स्मिता यांनी लग्न आणि संसाराच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत, स्वतःचा मझेड प्लस डेंटल स्टुडिओफहा व्यवसाय सांभाळत पुन्हा आपल्या क्रीडा छंदाला उजाळा दिला.

पती डॉ. राहुल नवनाथ झांजुर्णे (जे स्वतः आयर्न मॅन आणि ९० किमी कॉम्रेड मॅरेथॉन फिनिशर आहेत.) यांचे खंबीर मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन हे त्यांच्या यशामागचे मुख्य बलस्थान आहे. घरचे ज्येष्ठ सदस्य सासरे नवनाथ झांजुर्णे आणि सासूबाई उषा झांजुर्णे यांचे प्रोत्साहनही त्यांना नेहमीच लाभले आहे. व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनात उत्तम समतोल साधत, मुलांच्या अभ्यासाची आणि आहाराची योग्य काळजी घेत त्यांनी हे यश संपादन केले आहे. मुलांसाठी त्या एक आदर्श रोल मॉडेल ठरल्या आहेत.

**धावणे, सायकलिंग व जलतरण यातील**




## क्रीडा क्षेत्रातील प्रेरणादायी प्रवास

**कारकिर्दीचा आढावा-**

१. **आयर्न मॅन फिनिशर:** २०२१ ते २०२४ दरम्यान पाच वेळा (३.८ किमी समुद्रपोहुन, १८० किमी सायकलिंग व ४२ किमी रनिंग).

२. **कॉम्रेड मॅरेथॉन (डर्बन, दक्षिण आफ्रिका- ९० किमी):** ८ जून २०२५: १० तास २६ मिनिटे. १४ जून २०२६: १० तास २५ मिनिटे ( भारतातील तिसऱ्या क्रमांकाच्या वेगवान महिला धावपटू).

३. **डेक्कन क्लिप हँगर सायकल स्पर्धा (पुणे ते गोवा- ६४५ किमी):** रिले शर्यतीत दोन वेळा पहिल्या तीन क्रमांकांत.

४. **फुल मॅरेथॉन (४२ किमी):** सहा वेळा यशस्वी पूर्ण.

५. **पाच किमी स्विमॅथॉन:** दोन वेळा.

६. **हाफ मॅरेथॉन:** २० पेक्षा जास्त वेळा पूर्ण.

७. **कास अल्ट्रा मॅरेथॉन, सातारा (६५ किमी):** पहिल्या तीन क्रमांकांत फिनिश.

८. **हायरॉक्स (मुंबई):** पतीसह कपल पार्टिसिपेशन आणि यशस्वी फिनिश.

९. **किल्ले- दुर्ग चढाई:** १५० हून अधिक वेळा यशस्वी मोहीम.

मागील १० वर्षांपासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेत, दरवर्षी निश्चित केलेल्या ध्येयपूर्तीसाठीचा प्रवास अत्यंत आनंददायी असतो. कुटुंबाची साथ, कोचचे मार्गदर्शन आणि सहकाऱ्यांच्या मदतीने मिळणारा विजयाचा आनंद अमूल्य असतो. मुलगी शिकली कुटुंबाची प्रगती झाली याप्रमाणेच, घरातील स्त्रीने फिटनेसकडे लक्ष दिल्यास संपूर्ण कुटुंब शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी बनते. नियमित व्यायामामुळे सकारात्मक ऊर्जा मिळून बिकट प्रसंगी धैर्याने सामना करण्याची शिकवण मिळते. आयर्न मॅन किंवा मॅरेथॉनच्या तयारीमुळे आहार, झोप आणि स्क्रीन टाईमचे नियोजन आपोआप होते व चांगल्या लोकांचे सहकार्य लाभते.

## समाजप्रबोधन आणि मार्गदर्शन

स्वतः फिटनेसचा उच्च स्तर गाठल्यानंतर डॉ. स्मिता इतर महिलांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत. विशेषतः ब्युरोक्रेट्स, महिला उद्योजक, डॉक्टर, वकील, शिक्षक आणि इंजिनिअर महिलांना कौटुंबिक व व्यवसाय सांभाळून आरोग्याकडे कसे लक्ष द्यावे, याबद्दल त्या विविध माध्यमांतून आणि रेडिओ चॅनेल्सवरून मार्गदर्शन करतात. पुणे आणि सोलापूरमधील विविध शाळांमध्ये खेळाचे आरोग्यावरील महत्त्व सांगण्यासाठी त्यांना आवर्जून निमंत्रित केले जाते. तसेच, विविध वैद्यकीय परिषदांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी मस्पोर्ट्सफचे महत्त्व या विषयावर त्या व्याख्याने देतात. अनेक महिलांच्या प्रेरणास्थान असलेल्या डॉ. स्मिता यांच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा!



# सकारात्मक पत्रकारिता समाजजागृतीचा दीपस्तंभ



पूनम हनुमंत चव्हाण
सोलापूर

शब्दांनी पेटती ज्योत, विचारांना मिळते भरारी, समाजमन उजळविण्याची, हीच पत्रकारितेची खरी जबाबदारी. आज माहितीचा महापूर वाहत आहे. एका क्षणात हजारो बातम्या आपल्या हातात येतात; परंतु सत्य, वस्तुनिष्ठता आणि सामाजिक बांधिलकी जपत बातमी देणारी माध्यमे मोजकीच आहेत. अशा काळात तरुण भारतने नेहमीच जबाबदार पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला आहे. सनसनाटीपेक्षा सत्याला, नकारात्मकतेपेक्षा सकारात्मकतेला आणि अफवांपेक्षा विश्वासार्ह माहितीला प्राधान्य देत समाजाला विधायक दिशा देण्याचे कार्य या वर्तमानपत्राने सातत्याने केले आहे.

पत्रकारिता म्हणजे समाजाचा आरसा. मात्र आरसा केवळ वास्तव दाखवत नाही, तर समाजाने कोणत्या दिशेने वाटचाल करावी, याचाही विचार घडवतो. तरुण भारतने अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय विषयांवर सातत्याने विधायक भूमिका मांडत समाजमन जागृत ठेवले आहे. अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठविण्याबरोबरच चांगल्या कार्याचे कौतुक करण्याची उदात्त परंपराही या वर्तमानपत्राने जपली आहे.

सत्याची धरली कास, समाजहिताचा ध्यास, लेखणी झाली दीपस्तंभ, विश्वासाचा तरुण भारत श्वास.

शिक्षण क्षेत्रात तरुण भारतचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागापासून ते शहरांपर्यंत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला चालना देणारे अनेक उपक्रम, स्पर्धा, करिअर मार्गदर्शन, यशोगाथा, प्रेरणादायी लेख आणि शैक्षणिक घडामोडी सातत्याने प्रसिद्ध केल्या जातात.

विद्यार्थ्यांच्या यशामागील संघर्ष समाजापर्यंत पोहोचवून इतर विद्यार्थ्यांनाही नवी उमेद देण्याचे कार्य हे वर्तमानपत्र करत आले आहे.शाळांमध्ये राबविण्यात येणारे नाविन्यपूर्ण उपक्रम, प्रयोगशील शिक्षकांचे कार्य, विज्ञान प्रदर्शन, वाचन संस्कृती, पर्यावरण संवर्धन, क्रीडा, कला, सांस्कृतिक स्पर्धा आणि सामाजिक बांधिलकीची उदाहरणे यांना तरुण भारतने कायमच प्रतिष्ठेचे स्थान दिले आहे. एखाद्या छोट्याशा गावातील शिक्षकाचा अभिनव प्रयोग जेव्हा वर्तमानपत्राच्या माध्यमातून संपूर्ण राज्यासमोर येतो, तेव्हा तो अनेक शाळांसाठी प्रेरणेचा स्रोत बनतो. अशा प्रकारे तरुण भारत केवळ बातम्या प्रसिद्ध करत नाही, तर शिक्षणातील सकारात्मक परिवर्तनाची साखळी निर्माण करतो.

> वर्तमानपत्र हे केवळ बातम्या देणारे माध्यम नसते, तर ते समाजाला दिशा देणारे, विचारांना चालना देणारे आणि परिवर्तनाचा मार्ग उजळवणारे सशक्त व्यासपीठ असते. या विचाराचे मूर्त रूप म्हणजे तरुण भारत. समाजहिताची भूमिका, राष्ट्रहिताची जाणीव, संस्कारमूल्यांची जपणूक आणि सकारात्मक पत्रकारितेची परंपरा जपणारे तरुण भारत हे आज लाखो वाचकांच्या विश्वासाचे वर्तमानपत्र बनले आहे.

डिजिटल युगातही तरुण भारतने काळाची गरज ओळखून स्वतःला बदलले. मुद्रित वर्तमानपत्राबरोबरच डिजिटल माध्यमांतूनही विश्वासार्ह माहिती वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. तंत्रज्ञान स्वीकारताना पत्रकारितेची मूल्ये अबाधित ठेवण्याचा आदर्श या वर्तमानपत्राने घालून दिला आहे. समाजात आशावाद निर्माण करणाऱ्या बातम्या हे तरुण भारतचे वैशिष्ट्य आहे. संघर्षातून उभे राहिलेले यश, शिक्षणातून घडलेले परिवर्तन, सेवाभावी व्यक्तिमत्त्वे आणि सामाजिक सलोखा जपणारे उपक्रम यांना योग्य स्थान देऊन या वर्तमानपत्राने समाजात सकारात्मकतेचा दीप सतत प्रज्वलित ठेवला आहे.

आज नकारात्मकतेच्या गर्दीत आशेचा किरण दाखवणारे माध्यम म्हणून तरुण भारतची ओळख अधिक दृढ झाली आहे. नकारात्मकतेच्या धुक्यात, आशेचा दीप उजळतो, तरुण भारतच्या प्रत्येक शब्दातून, समाज नव्याने घडतो.

एका वर्तमानपत्राची खरी ओळख त्याच्या विश्वासार्हतेत असते. अनेक दशकांपासून सत्य, पारदर्शकता, राष्ट्रप्रेम, सामाजिक मूल्ये आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी या तत्त्वांवर तरुण भारतने आपली वाटचाल केली आहे. म्हणूनच प्रत्येक सकाळी असंख्य वाचकांचा दिवस या वर्तमानपत्राच्या सहवासाने सुरू होतो. हीच त्याच्या यशाची खरी पावती आहे.

सत्याचा दीप अखंड तेवत राहो,
समाजमनाला नवी दिशा लाभो.
शब्दांची ही पवित्र साधना
यशाच्या नव्या शिखरावर आरूढ होवो.

तरुण भारत हे केवळ वर्तमानपत्र नाही; ती एक विचारधारा आहे, एक सामाजिक चळवळ आहे आणि सत्य, संस्कार व समाजहित यांना समर्पित असलेली एक प्रेरणादायी परंपरा आहे.

ही परंपरा अशीच वृद्धिंगत होत राहो, समाजजीवन अधिक समृद्ध करो आणि येणाऱ्या पिढ्यांनाही विधायक विचारांची प्रेरणा देत राहो, हीच वर्धापन दिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. **(लेखीका श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर येथे सहशिक्षिका आहेत.)**

# श्री संतकवी शुभराय महाराज

## एक संस्कार वृक्ष...!

> यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत असे गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे. धर्माची ग्लानी म्हणजे श्रद्धेचा लोप पावणाऱ्या श्रद्धेची समाजात प्रतिष्ठेने पुन्हा प्रतिष्ठापना करण्याचे महान कार्य संतांनी केले आहे.



उमेश मोहोळकर
भ्र. ९६३७९६७७५५

सोलापूर हे अनेक भाषांचे माहेरघर..! इथे अनेक भाषा भगिनी सारख्या हातात हात घालून आनंदाने नांदतात. या सोलापूर शहराला ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. पैकी त्यातील धार्मिकतेचा पैलू तेजपुंज असाच आहे. श्री सिद्धरामेश्वरांच्या पदन्यासाने पुनीत झालेली सोलापूरची भूमी सोलापूरचे महान संत कवी श्री शुभराय महाराज यांच्या आगमनाने आणि त्यांच्या पुण्याने आणखी पावन झाली.

या थोर संतकवी शुभराय महाराजांचा जन्म बेंगलोर जवळील मालूर या गावी झाला. त्यांच्या जन्माचा काळ निश्चितपणे जरी उपलब्ध नसला तरी जन्म इ.सन. १७५० च्या सुमारास झाला असावा. श्री शुभराय यांचे मूळ नाव 'सुब्बाराव' असे होते. ते मोठे विद्वान पंडित होते. म्हैसूरचे राजे टिपू सुलतान यांच्या दरबारात उपपंतप्रधान पद भूषवित होते. पण त्यांचा मूळचा पिंड अध्यात्मिक असल्याने त्यांचे मन त्या पदावर रमले नाही म्हणून म्हैसूर सोडण्याचा ठाम निश्चय केला. सर्वसंग परित्याग करून त्यांनी आपले आई-वडील व पत्नीचाही त्याग करून ते आपल्या नियोजित कार्याच्या प्राप्तीस्तव म्हैसलगी नंतर पंढरपूर मार्गे इ. सन १७८१ मध्ये सोलापूर येथे स्थायिक झाले. अंतकरणांमध्ये विठ्ठलाचा वास असला तरी सद्गुरु शिवाय दर्शन नाहीच हे शुभराय महाराज जाणून होते. त्यामुळे परमपूज्य थिमप्पाच्या उपदेशानुसार महाराजांनी आपली ईशसेवा व नामस्मरण चालूच ठेवले होते. सद्गुरूंच्या असीम कृपेनेच महाराजांना तेथील वास्तव्यात एक दिवस पंढरीच्या विठ्ठलाचा दृष्टांत झाला. तो असा. तुझी अनन्य भक्ती पाहून मी तुला प्रसन्न झालो आहे मला तुझ्याकडून सेवा करून घेण्याची इच्छा आहे तरी पंढरपूरच्या चंद्रभागेतील पुंडलिकाच्या डोहात मी आहे तू मला येथे आणून माझी प्रतिष्ठापना कर.

पंढरपूरच्या विठू माऊलीने महाराजांना दिलेल्या अभिवचनानुसार प्रत्यक्ष पांडुरंग शुभराय मठात विराजमान झाले आहेत. त्याच शुभराय मठात माझा जन्म झाला. आमचं मोहोळकर कुटुंब मठामध्येच राहत होते. मठामध्ये बरीच कुटुंब होती कुटुंब जरी वेगवेगळी असली तरी मठात कोणताही उत्सव असला की सर्वजण आपल्या घरातीलच उत्सव आहे असे समजून एकत्र यायचा. श्री शुभराय महाराजांचा मठ हा त्यांच्या छत्रछायेत सुरक्षित होता, तसा मठातल्या सर्व कुटुंबांच्या आणि तिथल्या मोठ्या चिंचेच्या झाडाच्या सावलीत सुद्धा सुखावला होता. या मठामुळे माझ्या वडिलांना (कै. दत्तात्रय मोहोळकर) सगळ्यांपेक्षा वेगळं असं फार मोठं भाग्य मिळालं ते म्हणजे त्यांच्या वयाच्या ३५ पासून ते जवळजवळ वयाच्या बहात्तरपर्यंत शुभराय मठातील खुद्द शुभराय महाराजांनी स्थापन केलेल्या वालुकामय विठ्ठलाची पूजा करण्याचं..! त्यामुळे आमच्या कुटुंबाची नाळ मठाशी छान जोडली गेली होती ती आज तागायत आहे. माझे वडील त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षापासून मठातच राहिले. माझी आजी कै.उमाबाई शंकर मोहोळकर माझे दोन्ही काका कै. बाळकृष्ण शंकर मोहोळकर आणि कै.गजानन शंकर मोहोळकर हे सुद्धा मठातच लहानाचे मोठे झाले. आजी मठात असल्यामुळे तिथल्या भजनी मंडळात होती त्याचे नाव 'रामनाम व्रत आश्रम'. पुढे माझी आई श्रीमती मीरा दत्तात्रय मोहोळकर याच भजनी मंडळात होती त्यामुळे मठाशी असलेलं भक्तीचं नातं अजून दृढ झालं. शुभराय मठामध्ये सर्वच उत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरे केले जात होते ते अजूनही चालू आहेत. गुढीपाडव्यापासून ते आषाढी एकादशीची रथयात्रा. वाळूकामय विठ्ठलाची मूर्ती जेव्हा मठात आली तो दिवस आषाढ शुद्ध एकादशीचा सन १७८५..! तेव्हापासून ते आज तागायत आषाढ एकादशी आणि कार्तिकी एकादशीला रथाची मिरवणूक सोलापूर शहरातून निघत असते. नंतर गोकुळाष्टमी. यावेळी तर मठ अगदी गोकुळासारखा सजायचा प्रत्येका खांबाला नारळाची आणि केळाची डहाळी माझे बाबा लावायचे. बाबांबरोबर मी आणि माझी बहीण (पूर्वाश्रमीची अश्विनी मोहोळकर आणि आता सौ. मंजिरी साने) त्यांना मदतीला असायचो. काय वर्णन करू..? शब्द अपुरे पडतात..

रात्री बुवांचे ( मठाधिपती जयकृष्ण जनार्दन बुवा) किर्तन, त्यांच्याबरोबर तबला साथीला मी असायचो. त्यानंतर शुभराय महाराज पुण्यतिथी..! अदल्या दिवशी महाराजांची समाधी फुलांनी छान सजवली जात होती. अजूनही सजवतात. आम्ही लहान लहान मुलं रात्री भोपळा फोडण्यासाठी एकत्र येत होतो. पुण्यतिथीला सकाळी दहा वाजता काटकर आजी यांचे भजन ठरलेले असायचे. कोणीही जरी बोलवले नाही तरी त्या त्यांच्या ताफ्यासहित येत असत. हार्मोनियम त्या स्वतः वाजवायच्या. तबल्यावर साथ करायला जुन्या राम मंदिरातील पुजारी म्हणून येत असत. भजनानंतर महाआरती...! वा... वा... आता लिहिताना सुद्धा अंगावर काटा उभा राहतो समोर तो प्रसंग उभा राहतोय. अशा सर्वच उत्सवात आणि भक्ती सांप्रदायिक वातावरणात आम्ही लहानाचे मोठे झालो. माझ्या वडिलांना शुभराय मठातील पांडुरंगाची सेवा करण्याचे भाग्य मिळाले . दररोज पहाटे तीन वाजता उठायचे हातामध्ये झाडू घेऊन संपूर्ण मठ आणि मठाचा परिसर तसेच मठासमोरील भाग, दत्ताच्या देवळासमोरील भाग झाडून घ्यायचा. सडा टाकायचा, सुंदर रांगोळी रेखाटायची. हे सर्व करून पुन्हा घरी येऊन स्नान करून मठात जाऊन पूजा करायची. मग देवाचं तीर्थ घेऊन ते घरी यायचे. असा दिनक्रम जवळपास ३५ ते ४० वर्ष त्यांच्याकडून विठ्ठलानेच करून घेतला.

कार्तिक महिन्यात आणि अधिक महिन्यात पहाटे काकड आरती असायची. त्यावेळेला तर पहाटे अडीच वाजताच माझे बाबा उठायचे. माझी मुंज झाल्यापासून माझ्या बाबांनी मला घरातील पूजा करायला शिकवली होती. त्यामुळे मीही त्यांच्याबरोबर काकड आरतीसाठी जायचो बरोबर ५.१५ मिनिटांनी मठामध्ये जायचो.त्यानंतर बरोबर पावणेसहा वाजता काकडा सुरू व्हायचा. उठा साधकजन साधा आपुलाले हित.. साधा आपुलाले हित.. मठातील माँ अर्थात निर्मला जयकृष्ण बुवा! या हातामध्ये टाळ घेऊन डोळे बंद करून काकडा म्हणायच्या. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर वाटायचे की देव दिसतो की काय त्यांना...? कारण, काकडा म्हणताना हसत असायच्या. काकड आरतीमध्ये जसे सोपस्कार सांगितलेले आहेत त्याप्रमाणे माझे बाबा तयारी करून ठेवत. जसे की.. लोणी साखरेची वाटी आणू पांडुरंगासाठी असे म्हटले की.. देवासमोर लोणी आणि साखरेची वाटी ठेवायचे. कोणाची झाली दृष्ट माझ्या हो पंढरीराया लिंबलोण उतरू कशी ओवाळीन काया... विठ्ठलाला दृष्ट लागू नये म्हणून बाबा विठ्ठलाच्या गालाला तीट लावत. नंतर ते तीट लावायचा सोपस्कार माझ्याकडे आला. माझ्या वडिलांनी पांडुरंगावर आणि शुभराय महाराजांवर नित्सीम प्रेम केलं, सेवा केली. त्या सेवेचा फलित आमच्या पदरात पडत आहे. माझे वडील २४ जून २०१९ संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थानाच्या दिवशी पांडुरंग चरणी विलीन झाले. त्यांनी केलेल्या पुण्याचे फलित म्हणून की काय माझ्या हातून शुभांगी बुवा यांनी एक असे कार्य करून घेतले की.. त्याला तोडच नाही. मी माझ्या कामांमध्ये असताना अचानक शुभांगी बुवा यांचा फोन आला. उमेश... तू लवकर मठात ये. मी म्हणालो.. आलोच.. दहा मिनिटात! गेलो तर म्हणाल्या.. आपण आता एक उत्सव मूर्ती तयार केलेली आहे त्याची प्राणप्रतिष्ठापना तुझ्या आणि तुझ्या बायकोच्या हस्ते करायची आहे. मी दोन मिनिटं स्तब्ध झालो. प्राणप्रतिष्ठापना आणि माझ्याकडून..? त्या म्हणाल्या..हो.. त्यावेळी माझ्या डोळ्यातून आनंद अश्रू वाहत होते.. वाटलं, आज जर माझे वडील असले असते तर त्यांच्याच हस्ते हे कार्य घडले असते. पण देवाच्या मनात काय असतं याचा कुणाला थांगपत्ता नसतो. त्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापने मी आणि स्वरांगी माझी पत्नी पूजेसाठी मठात आलो.पुण्यवाचन झाले नंतर होमासाठी अग्नी तयार झाला.. तोही पारंपारिक पद्धतीने! लाकडावर लाकूड घासून. अग्नीदेवतेचे स्मरण करताच तोही प्रगट झाला. परमेश्वराची लीला आघात आहे. स्वहाकार झाला. त्या पाषाणाच्या मूर्तीला मी डोक्यावर घेतले. तेव्हा वाटलं या जगतनिर्मात्याला मी माझ्या स्वतःच्या डोक्यावर घेतले. काय सांगू तो प्रसंग... वाटलं कृतकृत्य झालो, जन्माचं सार्थक झाल्यासारखे वाटले. देव मठातल्या देवघरात आले. त्याची विधिवत पूजा झाली,आरती झाली. प्रसाद घेऊन आम्ही घरी आलो. मनात एक विचार आला. का बरं मला सांगितलं असेल प्राणप्रतिष्ठापना करायला...? मी हे शुभांगी ताईंना विचारले...तर त्या म्हणाल्या.. मी गेले आठ दिवस शोधत होते कुणाच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना करायची? काही केल्या मला समजेना..पहाटे चार वाजता मी जागी झाले.. मनात विचार आला दत्ता काकांच्या मुलाकडूनच हे कार्य घडून आणू आणि मग मला झोप लागली.. कसले संकेत म्हणायचे याला..? कोणते पुण्य घडले असेल माझ्याकडून...? नंतर लक्षात आले.. हे तर बाबांनी केलेल्या पुण्याचे फळ आहे. डोळ्यातून पाणी काही थांबेना.करता कविता परमेश्वर आहे हे पक्क झालं. मठात पांडुरंगाच्या उत्सव मूर्तीची आणि शुभराय महाराजांच्या समाधीची प्राणप्रतिष्ठापना झाली. एक कोटी नामजपाचा स्वाहाकार झाला.

अकरा ब्रह्म वृंदांच्या साक्षीने तो पार पडला. काही गोष्टी परमेश्वर आपल्याकडून करून घेतो हे नक्की! असाच एकदा शुभांगी ताईंचा फोन आला आणि म्हणाल्या.. शुभराय महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त एक नृत्यनाटिका बसवायची आहे त्यात तू रावजीबुवा म्हणजे शुभराय महाराजांचे सोलापुरातील पहिले शिष्य! आत्ताची ही रावजी बुवांची आठवी पिढी..त्यांची भूमिका करायची आहेस. मी ताडकन उडालो..बापरे...! नाटकात आणि मी! त्यांना म्हणालो... आतापर्यंत नाटकात काम केलेले नाही..त्यावर त्या म्हणाल्या.. महाराज करून घेतील तुझ्याकडून.. प्रॅक्टिसला ये.. सुरू झाली प्रॅक्टिस.. माझ्याकडून नाटकातील संवाद दिग्दर्शक माझाच भाऊ डॉक्टर राजू मोहोळकर यांनी व्यवस्थित बसवून घेतले. साधारणपणे आठ दिवसाच्या प्रॅक्टिसनंतर हुतात्मा स्मृती मंदिर येथे नाटकाचा उत्तम प्रयोग पार पडला.

नाटकाच्या भैरवीकडे जाताना मला माझ्या वडिलांची खूप खूप आठवण झाली. डोळे पाणावले होते.वाटलं.. आज जर ते असले असते तर मला डोक्यावर घेतलं असत..! काय करणार.. असो, पण त्यांनी हे नाटक पाहिलं असणार हे नक्कीच! पूर्व पुण्याईमुळे मला परमपूज्य रावजीबुवा यांची भूमिका करायला मिळाली. म्हणतात ना.. जन्मोजन्मी आम्ही बहु पुण्य केले मग त्या विठ्ठले कृपा केली.जन्मोनी संसारी झालो त्यांचा दास मज तो विश्वास पांडुरंग पूर्व सुकृताशिवाय या गोष्टी शक्य नाहीत हे पुन्हा एकदा सिद्ध झालं.. म्हणूनच म्हणावसं वाटतं श्री संतकवी शुभराय महाराजांचा मठ हा एक मनावर होणाऱ्या संस्काराचा मोठा वृक्ष आहे.





सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन चिरायू होवो..!

पिलीव विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित पिलीव, ता.माळशिरस, जि.सोलापूर

संस्थापक : कै. धोंडो आबाजी पाटील

चेअरमन
श्री. किसन सातपूते

व्हा. चेअरमन
सौ.रंजना जावळे

* संचालक मंडळ *
मा.संग्राम पाटील
मा.सुग्रीव लेंगरे (सर)
मा.विठ्ठल मदने (सर)
आनंद (संतोष) पाटील
नबाजी मदने, पंकज मदने
महादेव सुळे, पोपट गोडसे (माळी)
जाफर मुलाणी, सुलाबाई जरग
कुबेर भैस

सचिव
मा.उमेश निंबाळकर

क्लार्क
मा.विजय सपाटे

शिपाई
मा.सुरज काटकर

शॉप मॅनेजर
मा.महेश पाटील

तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा

ॲड. एस. एम. गुंड (लाडोळेकर)
मो. ९८२२१७८३१३

ॲड. ए. एस. गुंड (लाडोळेकर)
मो. ७८८७८८६००१

'सदानंद' ७३०/२/३७, कासारवाडी रोड, बार्शी.

|| कर्मयोगी ||

स्व.सुधाकरपंत परिचारक (मालक)

मा.आ.प्रशांतराव परिचारक (मालक)
चेअरमन

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

मा.विजय अंगद जाधव
संचालक : कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शिवशक्ती, आपली धनशक्ती...!

शिवशक्ती अर्बन को-ऑप बँक लि.,बार्शी

सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र असलेली व अल्पावधीत ठेवी, कर्ज व भांडवल यांचा हलता परंतु झेपावणारा आलेख, सर्व सुविधेसह आपल्या सेवेशी तत्पर असणारी बार्शीतील एक अग्रगण्य असणारी सहकारी बँक

* बँकेची ठळक वैशिष्ट्ये *

* भक्कम आर्थिक स्थितीला सुरक्षिततांची जोड * विविध आकर्षक ठेव योजनेसह ज्येष्ठ नागरिकांना जादा व्याजदर * सुसज्ज भव्य इमारत तसेच लॉकर सुविधा, एसएमएस सुविधा.
* भारतात कोठेही आरटीजीएस/एनईएफटी सुविधा * अल्पावधीत कर्ज मिळण्याची सोय.
* भविष्यात नेट बँकिंग/ई-लॉबी * कर्जावरील व्याजदर ९ ते १४ टक्के
* ठेवीवरील व्याजदर ८.०० टक्के पर्यंत * क्यू आर कोड सुविधा उपलब्ध

प्रा. राजेंद्र न. मोरे
व्हा. चेअरमन

डॉ. श्री. प्रकाश गो. बुरगुटे
चेअरमन

श्री. गणेश बारंगुळे
सहा. सरव्यवस्थापक

श्री. भारत उमाटे
सरव्यवस्थापक

सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद

७२५/१/४४ब, शिवाजी नगर, बार्शी. ता.बार्शी, जि. सोलापूर फोन (०२१८४)२२६५४३
नजिकच्या शाखेत भेट द्या.

प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक
सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *

स्वप्नील
किराणा व जनरल स्टोअर्स
पिलीव, ता.माळशिरस, जि.सोलापूर

* किराणा माल व इतर साहित्य योग्य दरात मिळण्याचे पिलीव परिसरातील एकमेव ठिकाण
* भुसार मालाची योग्य दराने खरेदी विक्री
* ग्राहकांच्या प्रचंड विश्वासास पात्र असणारे एकमेव ठिकाण

प्रो.प्रा.सूरज बाळकृष्ण खलिपे
Mo.: 9552432243

भुसार मालाचे व्यापारी

तरुण भारतच्या
वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!

शिवलीला स्पोर्टस्
कराटे अँड योगा असोसिएशन

स्व. संरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण काळाची गरज हे ब्रीदवाक्य घेऊन २०१३ पासून गुरुवर्य योगाचार्य कै.सुरेश जाधव (सर) यांच्या आशीर्वादाने अत्यंत माफक दरात व गरजूवंत मुलींकरिता मोफत प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे.

* प्रशिक्षक : सेनसाई शिवशरण वाणीपरीट * संस्था सचिव : स्मिता वाणीपरीट

प्रशिक्षण : योगाधारित कराटे व किक बॉक्सिंग, लाठीकाठी व कलरीपयत पध्दतीचे प्रशिक्षण

मुख्य शाखा : दमाणी नगर येथील सद्गुरु बाजी आण्णा महाराज मठ, प्रतिक्षा बंगलोज, जानकर नगर, सोलापूर
शाखा १ : इंद्रधनू टेनिस कोर्ट, मरिआई चौक, सोलापूर
शाखा २ : मनोहर सांस्कृतिक भवन, अवंती नगर, सोलापूर

प्रशिक्षण वेळ : दररोज सायं. ६.३० ते ७.३० संपर्क ९८२२९३३१०५/८०८७७७३८११

सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

मा. अशोकसिंह देशमुख
युवा उद्योजक
मो. ९७६६२७२४५५

मा. अजितसिंह देशमुख
कार्याध्यक्ष, माढा विधानसभा राष्ट्रवादी युवक काँग्रेस मो. ९९२२५९९५३६

मा. अभयसिंह देशमुख
जनरल मॅनेजर
रिलायन्स इंडस्ट्रीज पेट्रोलियम मुंबई

* शुभेच्छुक *

बांधकाम क्षेत्रातील विश्वसनीय नाव
कनकंबा एंटरप्रायजेस
प्रा.अशोकसिंह अमरसिंह देशमुख

अल्ट्राटेक सिमेंट, राजुरी स्टील, जेएस डब्ल्यू स्टीलचे अधिकृत डिलर, अल्ट्राटेक कंपनीचे एएसी ब्लॉक, बायडींग वायर, जीआय वायर, वॉटर प्रुफिंग लिक्विड, इतर बांधकाम साहित्य योग्य दरात मिळेल.

दै.सोलापूर तरुण भारतच्या
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *

मा. चांगदेव सोनवणे
कामगार नेते

मा. भालचंद्र साखरे
माजी चेअरमन
मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचारी पतसंस्था सोलापूर

मा. केरबा माने

मित्रपरिवार, सोलापूर



मा.ॲड.कुलदिपसिंह रेवण भोसले
B.S.L., L.L.B., L.L.M., M.A. (Political Scince)
किरण रियालिटी ॲण्ड डेव्हलपर्स धाराशिव व पुणे
प्रतिष्ठान
मंगलम प्रॉपर्टीज धाराशिव व पुणे
व्हिनस फॅब्रिक्स, ज्युपिटर टेक्सटाईल्स, सुदर्शन फॅब्रिक्स इचलकरंजी
प्रगती इंटरप्रायजेस, धाराशिव
विश्वसनीय पत्रकारिता... जनतेचा अविरत राहवी!
दैनिक तरुण भारत वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
आपण नेहमीच समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडत आला आहात, आपली लेखणी असेच सदैव समाजप्रबोधनाचे कार्य करत राहो, हीच शुभेच्छा !




तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
JIJAU MEMORIAL PRASHASAKIY SEVA MAHAVIDYALAY, LOHARA
महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक संलग्नीत ग्रामीण विकास संस्था, नागराळ संचलित जिजाऊ मेमोरीयल प्रशासकीय सेवा महाविद्यालय, लोहारा
प्रवेशासाठी संपर्क : ८७८८२८७४५२/७०२०६८६१४४
पत्ता : गोरे कॉम्प्लेक्स, आंबेडकर चौक, लोहारा, जि. धाराशिव
मोफत प्रवेशाची शेवटची संधी
BA Civil Services
पात्रता : १२ वी पास कोणतीही शाखा
MA Publie Administration
पात्रता : कोणत्याही शाखेतून ग्रॅज्युएशन पुर्ण




तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
जिनत कोहीनुर सय्यद
प्रदेशाध्यक्षा : सरपंच परिषद, पुणे महाराष्ट्र तथा महिला जिल्हाप्रमुख : शिवसेना (उबाठा) पक्ष, धाराशिव
कोहीनुर सय्यद
राज्य संघटक : सरपंच परिषद तथा शिक्षक नेते




तरुण भारत
धाराशिव कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
अल्पसंख्यांक शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. जि. धाराशिव
हार्दिक शुभेच्छा
संस्थेची ठळक वैशिष्ट्ये
* भागभांडवल ५ कोटी
* स्वतःहाची इमारत
* कर्ज मर्यादा १२ लाख, तातडीचे १ लाखापर्यंत कर्ज
* व्याज दर (कर्जावरील) ९%
* व्याज दर (मुदतठेव) ८%
* सतत ऑडिट वर्ग - अ
श्री. हाजी बशीर तांबोळी
संस्थापक अध्यक्ष
श्री. सौदागर बिलाल
सचिव
श्री. बागवान इलाही अल्लाहोद्दीन
व्हा. चेअरमन
संचालक मंडळ...
श्री. तांबोळी रहिम अन्सार (संचालक), श्री. वाघमारे मालोजी तुकाराम (संचालक), श्री. काळे मारूती नाना (संचालक), श्री. मोरवे मो. खिजर (संचालक), श्री. पठाण मुबारक शेखलाल (संचालक), श्रीम. डॉ. औसेकर शहनाजबाने अ. मजहर (संचालिका), श्रीम. बागबान बीबी तबस्सुम (संचालिका), श्रीम. शेख शाहेदाबेगम अलिमोद्दीन (संचालिका), श्री. शेख मुमताज अ. खालेक (स्वि. संचालक), श्रीम. कदम अनिषा रामकृष्ण (स्वि. संचालक)




तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्रीमती चौधरी वर्षा कमलाकर
सहशिक्षिका
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मार्डी तालुका लोहारा जिल्हा धाराशिव.




DR VEDPRAKASH PATIL EDUCATIONAL CAMPUS SINCE 2007
VP EDUCATIONAL CAMPUS
NH-52, Chhatrapati Sambhaji Nagar Road, Alani, Dharashiv 413501
Approved & Affiliated:
AICTE | DBATU | BAMU | MUHS | MAFSU | MSBTE | UGC
CAREER STARTS HERE
ADMISSION OPEN 2026-27
DR. PRATAPSINH PATIL
President - Dhaneshwari Educational Group
BHMS
MBA
MCA
M.Pharm
M.Ed
B.Sc Agri
B.Tech.
B.Pharm
B. Ed
BPTh
Polytechnic
D. Pharm
LMDP
ITI
XI/XII
85% Placement Rate
₹3.2L Average Package
30+ Recruiting Companies
₹8.5L Highest Package
MODERN Infrastructure
तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
FOR ADMISSION AND OTHER ENQUIRIES
+91 9044131999




तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
बाबुराव कोकाटे सर
मुख्याध्यापक
शुभेच्छुक
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तेरखेडा, ता. वाशी, जि. धाराशिव




युनिट1
श्री सिध्दीविनायक
युनिट2
वर्षानुवर्षे विश्वासाचा आवाज असलेल्या,
दैनिक तरुण भारत
वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्ताने हार्दिक शुभेच्छा!
श्रीसिध्दीविनायकॲग्रीटेक इंडस्ट्रीजलि.देवकुरुळी




तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा
धाराशिव कार्यालयाच्या वर्धापन दिनास
तहसील कार्यालय, लोहारा
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
तहसील कार्यालय, लोहारा
ता. लोहारा, जि. धाराशिव

# सोलापूर परिसरातील अहिल्यादेवींचे कार्य



**पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या कार्याचा डंका संपूर्ण जगात आहे. संपूर्ण हिंदुस्थानात केलेली लोकोपयोगी कामे प्रेरणादायी आहेत. सोलापूर परिसरात चौंडी, चोराखळी, पंढरपूर, तुळजापूर, बोहाळी, माळशिरस, जेजुरी आदी परिसरात त्यांनी केलेल्या कार्याची माहिती मिळते.**



उज्वलकुमार माने
भ्र. ९९२२४२४६१९

### अहिल्यादेवींचे जन्मगाव चौंडी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी येथे झाला. सोलापूर-अहिल्यानगर महामार्गावर हे छोटेसे गाव असून सोलापूर ते करमाळा १२३ किलोमीटर अंतर असून आणि करमाळ्यापासून २७ किलोमीटर अंतरावर चापडगावपासून अगदी चार ते पाच किलोमीटर अंतरावर हे गाव आहे.

सीना नदीच्या काठावर चौंडी हे गाव असून अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज शिंदे परिवार आजही येथे राहतात. या गावात ऐतिहासिक जुना वाडा आणि मोठा किल्ला आहे. गावातच चौंडेश्वर, महादेव आणि अहिल्येश्वर अशी मंदिरे आहेत. सीना नदीच्या काठावर याच गावात घाट बांधण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती व्हावी, यासाठी शिल्पसृष्टी बांधली असून अहिल्यादेवींच्या कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे.

### अहिल्यादेवींचे आजोळ चोराखळी :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म चौंडी येथे झाला असून त्यांचे आजोळ हे चोराखळी (सोनाखळी) आहे. सोलापूर- धुळे महामार्गावरील येडशीजवळ हे छोटे गाव असून सोलापूर ते येडशी ८५ किमी असून येडशी ते चोराखळी हे अंतर सात किलोमीटर आहे. धाराशिव जिल्ह्यातील हे गाव असून या गावात अहिल्यादेवींच्या आजोळच्या वंशातील मैंदाड- पाटील परिवारातील लोक आजही राहतात. चोराखळी या गावात अहिल्यादेवींच्या आईची आई म्हणजे आजी कृष्णाबाई बाळाजी मैंदाड- पाटील यांची समाधी आहे.

समाधीजवळच पौराणिक मंदिर आहे. या मंदिराजवळच विहीरदेखील आहे. चोराखळी गावापासून सुरे दोन किलोमिटर अंतरावर ऐतिहासिक मंदिर आहे. हा परिसर डोंगर आणि दंडकारण्याचा असून श्रीरामांचा पदस्पर्श या डोंगर परिसरात झाला असल्याचे सांगितले जाते. मंदिराजवळच बोधले महाराजांची समाधी आहे.

तसेच पापनाश मंदिराजवळ महादेव पिंडीच्या आकाराची टेकडीदेखील दिसून येते. याच परिसरात तत्कालीन खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या खासदार निधीतून ६० लाख रुपये खर्चून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुद्देशीय सभागृह बांधण्यात आले आहे. या गावाच्या विविध विकासासाठी अहिल्यादेवींनी त्यांच्या कार्यकाळात निधी दिला आहे.

### पंढरपूरचा ऐतिहासिक होळकरवाडा:

पंढरपूरचा विठोबा म्हणजे अख्ख्या महाराष्ट्राचे दैवत. अहिल्यादेवी होळकर यांनी पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी विठ्ठल मंदिरासमोर आणि चंद्रभागा नदीच्या काठावर सुमारे दोन एकर जागेवर भव्य असा ऐतिहासिक होळकरवाडा बांधला आहे.

सोलापूर ते पंढरपूर हे ७२ किलोमीटर अंतर असून चंद्रभागा नदीच्या काठावर असलेल्या या होळकरवाड्याला पाहण्यासाठी पर्यटक येतात. हा होळकरवाडा १७६७ मध्ये अहिल्यादेवींनी बांधला असून या वाड्याच्या बांधकामासाठी मध्यप्रदेशातील जंगलातून लाकूड आणण्यात आले होते. तसेच बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी वाड्यावरुन हत्ती फिरवण्यात आले होते.

याच मंदिरात श्रीरामाचे सुंदर मंदिर असून श्रीरामासह श्री लक्ष्मण आणि सीतेचीही मूर्ती आहे. या वाड्यात श्री हनुमानाचे देखील छोटे मंदिर आहे. वाड्यात एकूण २५ खोल्या असून सभागृहदेखील आहे.

अहिल्यादेवींचा कोरीव पुतळा देखील या वाड्यात बसविण्यात आला आहे. पंढरपूरच्या या होळकरवाड्याचे व्यवस्थापक म्हणून माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर हे काम पहात आहेत. अहिल्यादेवींनी श्री विठ्ठलासाठी दागदागिने अर्पण केले. असे सांगितले जाते. पंढरपुरात गावच्या दक्षिणेला तुळसीबाग अहिल्यादेवींनी सुरु केली होती. तसेच नामदेव पायरीजवळ घाटही बांधला आहे.









### पिण्याच्या पाण्यासाठी बोहाळीत विहीर :

पंढरपूर- कराड रस्त्यावर जाताना डावीकडे बोहाळी हे छोटे गाव आहे. या गावात अहिल्यादेवी यांनी त्यांच्या कारकिर्दीत पिण्याच्या पाण्यासाठी विहीर बांधली आहे. आजही या विहिरीला मुबलक पाणी असून लोक या विहिरीचे पाणी पितात. बोहाळी परिसरातच पशूपक्ष्यांच्या चारापाण्याची सोय व्हावी, यासाठी अहिल्यादेवींनी जमीन खरेदी केली. या जमिनीत पिके उत्पादित करुन पशूपक्ष्यांसाठी राखीव ठेवण्यात येत असे. पंढरपूर ते बोहाळी हे २१ किमी अंतर असून वाहनाने या गावाकडे जाता येते.

### माळशिरसजवळ पालखी मार्गावर दोन विहिरी–

पंढरपूर–नातेपुते या पालखी मार्गावर वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी अहिल्यादेवींनी दोन विहिरी खोदल्या आहेत. पंढरपूरपासून नातेपुते मार्गावर सुरे १५ किलोमीटरवर असलेल्या वाखरीजवळ विहिर बांधली असून या विहिरीला बाजीराव विहिर असे म्हटले जाते. दुसरी विहिर पंढरपूरपासून सुरे ३५ किलोमीटर अंतराव खुडूसजवळ आहे. दोन्ही विहिरी महादेव पिंडीच्या आकाराच्या असून आजही या विहिरींना मुबलक पाणी आहे.

### तुळजापुरात विहिर आणि खोल्यांचे बांधकाम –

तुळजापुरात येणाऱ्या भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी विहिर बांधली आहे. संपूर्ण बांधकाम हे दगडी बांधकाम असून पाणी उपसण्यासाठी दगडी मोटही तयार करण्यात आली होती. तुळजाभवानी मंदिरसमोर धाराशिव रस्त्यावर आ ही ही विहिर असून या विहिरीची पडझड झाली आहे. तुळजाभवानी मंदिरात गायमुखजवळ अहिल्यादेवी यांनी खोली बांधली. महिलांना कपडे बदलता यावेत यासाठी ही सोय करण्यात आली होती.

### जेजुरीत भव्य तलावाची निर्मिती–

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या जेजुरी या गावी अहिल्यादेवी होळकर यांनी १७७० मध्ये सुमारे १८ एकर क्षेत्रात पाण्याचा भव्य तलाव खोदला आहे. जेजुरीचा खंडेराया म्हणजे होळकरांचे कुलदैवत. त्यामुळे अहिल्यादेवींची विशेष श्रध्दा होती. जेजुरी परिसरात असलेल्या डोंगरावरील अनेक झऱ्यांचे पाणी शुध्द होऊन शिस्तबध्द पध्दतीने या तलावात सोडण्यात आले आहे. तलावाचे पाणी पिण्यासाठी आणि शेतीसाठी वापरता यावे यासाठी उत्तम नियोजन करण्यात आले आहे. तलावाच्या बाजूला पाणी उपसण्यासाठी दगडी मोट आजही आहे. या तलावाच्याच बाजूला चिंचेचे बन आणि होळकरवाडादेखील आहे. तलावाच्या भिंतीवर महाराजा होळकर इंदौर स्टेटचा संगमरवरी बोर्डदेखील पहायला मिळतो. हा चौकोनी आकाराचा तलाव असून संपूर्ण बांधकाम दगडाचे आहे. तलावाच्या बाजूला दोन विहिरीदेखील बांधण्यात आल्या आहेत.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ –

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती सर्वत्र व्हावी यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येत असून महाराष्ट्र सरकारने ५ मार्च २०१९ रोजी सोलापूरच्या विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ असे नाव देण्याचा निर्णय घेतला. या विद्यापीठात अहिल्यादेवींच्या नावाने अध्यासन केंद्र असून अहिल्यादेवींच्या जीवनचरित्रावर असलेले साहित्य, शिल्प आणि इतर माहिती उपलब्ध आहे. विद्यापीठात अहिल्यादेवींचे स्मारक बांधण्यात येत असून पूर्णाकृती पुतळादेखील उभारण्यात आला आहे. डॉ. प्रकाश महानवर हे विद्यापीठाचे कुलगुरु असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर हे आहेत. या विद्यापीठाच्या परिसरात आल्यानंतर अहिल्यादेवींच्या कार्याची ओळख दिसून येते.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासामध्ये ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या, त्यांच्यामध्ये अहिल्यादेवी होळकरांचे स्थान अद्वितीय. या कन्यारत्नाने आपल्या धार्मिक व सामाजिक, राजकीय कर्तृत्वाने भारतभर मोठी कीर्ती नावलौकिक मिळविले. इ. स. १७५४ मध्ये खंडेराव होळकराचा मृत्यू झाला व पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अकाली वैधव्य आले. पुढे इ.स. १७६६ मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाल्यामुळे राज्यकारभाराची सर्व जबाबदारी अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आली. बिकट परिस्थितीत अचाट धैर्याने सर्व राज्यकारभाराचे रक्षण तर केलेच, परंतु मल्हारराव होळकरांचा लौकिक कायम राखत होळकरशाहीचे वैभव कायम राखले व अनेक सत्कृत्ये करून 'पुण्यश्लोक' होण्याचा मान मिळविला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव घेताच, डोळ्यांसमोर सर्वप्रथम उभे राहतात, ते त्यांनी नदीकाठी उभारलेले देखणे घाट. केवळ घाटच नाही, तर असंख्य मंदिरे, किल्ले, राजवाडे, तलाव, विहिरी, बारवांच्या निर्मितीतूनही अहिल्यादेवींची सौंदर्यदृष्टी प्रतीत होते.

अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या सत्कृत्याची यादी फार मोठी आहे. अहिल्यादेवी शिवभक्त होत्या, त्यांनी देशभर खूप मंदिरांचा जीर्णोद्धार केला. उदा. आनंद काकन येथील विश्वेश्वराच्या मंदिराचा जीर्णोध्दार केला, काशी येथील काशी- विश्वेश्वरांच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, गया येथील विष्णू मंदिर, सोमनाथ येथील महादेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, तर परळी वैजनाथ व वेरूळ येथील घृष्णेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. याशिवाय भारतामध्ये अनेक ठिकाणी स्वखर्चातून मंदिराची उभारणी केली. त्यामध्ये आलामपूर, उज्जैन, ऋषिकेश, काशी, कुरूक्षेत्र, गंगोत्री, जेजुरी, नाशिक, पंढरपूर, चौंडी इत्यादी ठिकाणी मंदिराची उभारणी केली. यामध्ये सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण कार्य म्हणजे अहिल्यादेवी होळकरांनी फक्त मंदिरांचा जीर्णोद्धार व उभारणीच केली नाही, तर त्यांनी पुनःश्च हिंदू धर्म रक्षणाचा भक्कम पाया उभारण्याचा आरंभ केलेला दिसतो. त्यामुळेच त्यांना 'हिंदू धर्मरक्षक'देखील म्हटले जाते.





# अस्सल उद्योग सोलापुरी अन् सिध्दी-सिध्दी पाणी भरी!
















**१८ व्या शतकात औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांची केमिस्ट्री उदयास आली. मोठ्या उद्योगाच्या ठिकाणी शहर आपोआपच वाढीस लागते. त्यात सोलापूर ही आले. रेल्वे जंक्शन, विमानसेवा यांसह महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश आदी राज्यांना जोडणारे हमरस्ते, महाराष्ट्रातील सर्वाधिक साखर कारखाने, डाळिंब, द्राक्ष पिकांचे मोठ्या प्रमाणात होणारे उत्पादन, सोलापुरी चादर, टॉवेल, शेंगाचटणी, कडक भाकरी, शीक कढई आणि पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर, गाणगापूर यांसारखी तीर्थक्षेत्रे अशा मुद्यांच्या जोरावर सोलापूरची चौफेर प्रगती होत आहे. त्यामुळे अस्सल उद्योग सोलापुरी अन् सिध्दी- सिध्दी पाणी भरी, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरु नये.**



श्रीनिवास गाजूल
भ्र.-९३७०७५९७४६

एकेकाळी गिरण्यांचे शहर म्हणून सर्वदूर परिचित असलेले सोलापूर हे शहर कालांतराने हातमाग, यंत्रमाग, विडी, गारमेंट, औषधी रसायने, गणवेश व औद्योगिक उत्पादनांचे शहर म्हणून नावारुपास आले आहे. विशेष म्हणजे, मार्शल लॉच्या निमित्ताने स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य उपभोगलेले शहर म्हणून सोलापूरची ख्याती आजही सर्वदूर आहे. या शहरात मराठी, तेलुगु, कन्नड, हिंदी, गुजराती, उर्दू यांसारख्या विविध भाषाभगिनी एकत्र; तेही गुण्यागोविंदाने नांदत आहेत. या शहराने त्या-त्या क्षेत्रात अनेकांनेक चढउतार पाहिले पाहतही आहे. विशेषतः उद्योग क्षेत्रातील चढउतार अनुभवताना या शहराने लहान-मोठ्या प्रसंगांना तेवढ्याच धीरोदात्तपणे तोंड दिले-देत आहे.

हातमागावरील साड्या यांसह शबनम बंग, वॉल हँगिंग्ज् खरेदी करण्याकामी देश-विदेशातील लोक मोठ्या संख्येने सोलापुरात यायचे. भारताचे मॅन्चेस्टर म्हणून गणले गेलेल्या सोलापूरच्या कापड उद्योगात हातमागांची जागा कालांतराने यंत्रमागांनी घेतली. यंत्रमागधारकांना चादर व टर्किश टॉवेलच्या उत्पादनादरम्यान डाईंग, सायझिंग, फिनिशिंग आदी प्रक्रिया पार पाडावी लागतात. सोलापुरी चादर व टर्किश टॉवेलची मोठ्या प्रमाणात निर्यात व्हायची.. सन २००० सालापर्यंत ९०० ते १००० कोटी रुपयांच्या उत्पादनाची निर्यात एकट्या यंत्रमाग उद्योगातून झाली होती. दरम्यान, आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्याकामी मचादर-टॉवेलफच्या उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

सन १९४८ साली सोलापुरात सुमारे ५० ते ६० हजार हातमाग होते. कालांतराने हातमागांचे रुपांतर यंत्रमागात झाले असले तरी ही संख्या रोडावत चालली आहे, हे नाकबूल करुन चालणार नाही. या उद्योगावर ३० ते ४० हजार कामगारांची रोजीरोटी अवलंबून आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित सीटू, काँग्रेसप्रणित इंटक, शिवसेनाप्रणित कामगार सेना, भारतीय जनता पार्टीप्रणित कामगार आघाडी यांसह अन्य कामगार संघटना कामगारांच्या बाजूने उभे राहतात. यंत्रमागधारकांचे हित पाहण्यासाठी सोलापूर जिल्हा यंत्रमागधारक संघ तर या उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या सूताचा पुरवठा करण्याच्या अनुषंगाने सोलापूर सूत व्यापारी संघ कार्यरत आहे. यंत्रमाग उद्योगानंतर दुसरा मोठा उद्योग म्हणून विडी उद्योगाकडे पाहिले जाते. सोलापूर शहर- जिल्ह्यात सुमारे २९ विडी उद्योग समूहाचे ११५ ते १२० उत्पादन घटक आहेत. या सर्व घटकात मिळून घरखेप विड्या वळणारे सुमारे ७० हजार महिला कामगार आणि प्रत्यक्ष कारखान्यात काम करणारे १७०० ते १८०० कामगार कार्यरत आहेत. किमान वेतनासह गुल्ला कट्टा, छाट विड्या, खराब पानपुडे, कमी पडणारे तंबाखू आणि इतर काही महत्वाच्या प्रश्नांकडे शासन, प्रशासन, कारखानदार, कामगार संघटनांकडून म्हणावे तसे लक्ष दिले जात नसल्याने कष्टकरी महिला विडी कामगारांना तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागत आहे, हे नग्नसत्य आहे.

युनिफॉर्म अर्थात गणवेश उत्पादनात सोलापूर हे भारतातील प्रमुख शहर म्हणून उदयास आल्याचे एका अहवालातून स्पष्ट झाले आहे. सोलापुरात १२०० ते १४०० लहान- मोठे गारमेंट उत्पादन कारखाने आहेत. या उद्योगावर हजारो महिला-पुरुषांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे. याठिकाणी शालेय गणवेशबरोबरच कॉर्पोरेट कंपन्या, हॉस्पिटल्स आणि रेल्वे, एसटी महामंडळ यांसारख्या सरकारी संस्थांचेही गणवेश तयार केले जातात. गणवेशची राजधानी अशी ख्याती मिळविलेल्या सोलापुरातून ३० ते ३२ जास्त देशांमध्ये गणवेशाची निर्यात केली जाते. याद्वारे शेकडो कोटी रुपयांची उलाढाल होते.

भारताच्या एकूण युनिफॉर्म अर्थात गणवेश बाजारपेठेत 'सोलापूर'चा वाटा ६ ते ७ टक्के इतके आहे.

औषधी रसायनांच्या उत्पादनामध्ये बालाजी अमाईन्स, स्मृती ऑरगॅनिक्स, आदिती फार्मा यांसारख्या कंपन्या आघाडीवर आहेत. या कंपन्यांच्या माध्यमातून दरवर्षी शेकडो कोटी रुपयांची औषधी रसायने तयार केली जातात. बालाजी अमाईन्ससह बालाजी सरोवर या पंचतारांकित हॉटेलने तर सोलापूरचे नाव अटकेपार नेले आहे. प्रिसिजन कॅम्पशॉफ्ट्स, एलएचपी यांसारखे उद्योग सोलापूरकरांच्या दृष्टीने नवनवीन क्षितीजे मिळवून दिले-देत आहेत.

प्रिसिजन कॅम्पशॉफ्ट्सने भारताबरोबरच चीन, ब्राझील, जर्मनी यांसारख्या देशातही आपले पाय घट्ट रोवले आहे. तर दुसरीकडे कृषी प्रक्रिया, दूध डेअरी, गोमय उत्पादने, साखर कारखान्यांच्या माध्यमातून हजारोंच्या हातांना काम मिळाले; आजही दिले जात आहे. (**मुख्य वरिष्ठ उपसंपादक, दैनिक सोलापूर तरुण भारत**)



## वाचलं पाहिजे



सोनाली बिराजदार
शीर्पनहळ्ळी

वाचन ही एक सर्वश्रेष्ठ अशी आवड आहे ती प्रत्येकाने जपली पाहिजे. ते म्हणतात ना की, वाचाल तर वाचाल हे अगदी खर आहे. हा पण वाचन संस्कृती जपणाऱ्यालाच त्याचे महत्त्व कळेल. मला ना वाचनाची प्रचंड आवड आहे. मी खूप पुस्तकं वाचलीत आणि अजून वाचतेय. प्रत्येक पुस्तकातून मला काही ना काही मिळालं जे जीवन जगत असताना उपयोगी पडत आहे. समाजलक्षी व आत्मलक्षी जाणीवांचा प्रवास समजतो तो या वाचण्यामुळे. असहिष्णुतेच्या मानवी वर्तन काळाचे कंगोरे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे या पुस्तकांनी, समकालीन विश्वातील राजकीय वृत्ती प्रवृत्तीची आक्रमकता, स्त्रियांच्या वाट्याला येणारे नानाविध दुःखे, दैनंदिन जीवनात सर्वत्र दिसणारी हिंसा, जगण्यातील अस्वस्थता दुष्काळ आणि महापूर अशा अनेक जाणिवांची ओळख करून देते ते पुस्तके! म्हणून वाचलं पाहिजे .वाचनाने माणूस प्रगल्भ बनत जातो आणि परिपक्वता येते.

पुस्तकांची साथ आणि वाचनाची आवड ही अशी गोष्ट आहे की, आपण ते आयुष्यभर जपू शकतो. माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात १) वाचलेली पुस्तके आणि २) भेटलेली माणसं. त्यामुळे मी असं म्हणेन की, माणसाच्या डोळ्यातील भावही वाचता आलं पाहिजे.

१) मंगला कुलकर्णी: मितवा २) अरुण हरकरे: कुरूप असणं बरं! ३) किरण आचार्य: अनुपमा आणि ४) दिनेश काळे: कर्तव्य. ही काही अशी पुस्तके आहेत जी प्रत्येकाने वाचली पाहिजे. प्रत्येक कादंबरीतून आपल्याला काही ना काही नक्कीच मिळेल. मैत्रिणींनो, वाचनाचे महत्त्व वाचणाऱ्यांनाच कळते आजकाल काय होतंय की, वाचन संस्कृती कुठे मागे पडते की काय अशी भीती वाटतेय. कारण आज कोणालाच वाचायला वेळ नाही इतके व्यस्त आहेत सगळे. वाचनाची आवड ही अशी आहे की, एकदा लागली की ती सवय होऊन जाते आणि माणूस हा सवयीचा गुलाम असतो. त्यामुळे आपण जर वाचनाचे गुलाम बनलो तर आयुष्य हे खूप सोप्प व आनंदी बनून जाईल. बघा प्रयत्न करून तुम्हालाही ही गोष्ट पटेल. मैत्रिणींनो, तुम्हाला मी इथे आवर्जून सांगेन की चेतन भगत यांचं: one night a call center. हे पुस्तक जर मिळालं तर अवश्य वाचा खूप सुंदर पुस्तक आहे. कारण वाचनामुळेच तर कल्पनाशक्तीला मिळते. आणि चांगले वाचन व्यक्तिमत्त्वाचा विकास करत असते. विचारांना दिशा मिळते ते वाचण्याने, मी म्हणेन की वाचन हे कंटाळा घालवण्याचे आणि ताण कमी करण्याचे उत्तम साधन आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे वाचण्यामुळे व्यक्तिमत्व उंचावते. त्यामुळे मला असं वाटतं की, वाचाल तर वाचाल या म्हणीनुसार वाचन हे आयुष्याच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.



झेपावलेले सोलापूर
सोलापूर
तरुण भारत
४२ वा वर्धापन दिन
रविवार, ९ ऑगस्ट २०२६
४




तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालय वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
आधुनिक लहुजी सेना
महाराष्ट्र राज्य
स्व. सोमनाथ (भाऊ) कांबळे
आधुनिक फकीरा
नगीनाताई सोमनाथ कांबळे
संस्थापक अध्यक्षा,
आधुनिक लहुजी सेना, महाराष्ट्र राज्य
श्री. लक्ष्मण नागनाथ क्षिरसागर
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
श्री. मृणाल सोमनाथ कांबळे
संस्थापक कार्याध्यक्ष




तरुण भारत
धाराशिव कार्यालयाच्या
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक
श्री. महादेव (तात्या) लोकरे
अध्यक्ष : वाशी भाजपा तालुका उद्योग आघाडी
श्री. महादेव (तात्या) लोकरे
अध्यक्ष : वाशी भाजपा तालुका उद्योग आघाडी




सोलापूर
तरुण भारत
शब्दांना सत्याची धार...
विचारांना समाजहिताचा आधार!
सोलापूर
तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
शिवसेना
खा. ओमप्रकाश पवन राजेनिंबाळकर
लोकसभा सदस्य,
धाराशिव (उस्मानाबाद)
Om Rajenimbalkar - ओम राजेनिंबाळकर




1 शेतकरी कल्याण आणि नुकसान भरपाई (अतिवृष्टी व गारपीट)
१६५ कोटी रुपये अनुदान मंजूर
2 शैक्षणिक न्याय आणि ओबीसी विद्यार्थ्यांचे कल्याण
3 धार्मिक व सांस्कृतिक वारसा जतन (तीर्थक्षेत्र दर्जा)
'क' दर्जा तीर्थक्षेत्र
4 रस्ते विकास आणि रस्ते सुरक्षा
5 सिंचन आणि पाणीप्रश्न (प्रस्तावित व मंजुरीच्या टप्प्यातील कामे)
पाणी आले, समृद्धी आली!
6 सहा नवीन स्टेशन मंजुरी
7 ९ सब स्टेशन ची क्षमता वाढ
8 नाला खोलीकरण व जलतारा प्रकल्प
जलतारा प्रकल्प
9 एन एच 65 वरील रखडलेले काम पूर्ण
10 हायवे सुरक्षा उपाययोजना
आपल्या विश्वासाची पावती म्हणून
विकासाची हि वाटचाल
अशीच सुरू राहील
आपले आशिर्वाद असेच कायम राहो.
दैनिक
तरुण भारत
वर्धापन दिन
निमित्त सर्व जनतेस हार्दिक
शुभेच्छा
प्रविण विरभद्रय्या स्वामी
आमदार लोहारा-उमरगा मतदारसंघ




रुपामाता
परिवार-धाराशिव
नातं व्यवसायापलीकडचं...
RUPAMATA
रुपामाता अर्बन व मल्टीस्टेट
ERA International School
RUPAMATA NATURAL SUGAR Unit No. 01
RUPAMATA NATURAL SUGAR Unit No. 02
RUPAMATA NATURAL SUGAR Unit No. 03
उद्योग | विधी | सहकार | अर्थ | कृषी | दुग्ध | शिक्षण | सामाजिक |
युवा व महिला सक्षमीकरण | आरोग्य | क्रीडा | सांस्कृतिक
DIGITAL KARBHAR 7350960616




भारतीय राष्ट्रीय शिक्षण संस्था लोहारा, संचलित
शंकरराव जावळे-पाटील, कला, विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय, लोहारा
वसंतदादा पाटील हायस्कूल संलग्न
नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ
महाविद्यालय, लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (अभ्यासकेंद्र २६५५ A)
१२ वी परिक्षेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे
हार्दिक अभिनंदन
धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील शैक्षणिक वाटचालीस ३० वर्षापासून कार्यरत शिक्षण संस्थेत
B.A., B.Sc., B.Com, B. Lib, M. Com वर्गात अभ्यासक्रमासाठी प्रवेश देणे सुरु आहे.
Science Faculty B.Sc. I, II, III
Commerce Faculty B.Com. I, II, III
Art Faculty B.A. I, II, III
महाविद्यालयाची प्रमुख वैशिष्ट्ये
१) तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग अद्यावत डिजिटल तंत्रज्ञानाचा अध्यापनामध्ये वापर
२) भव्य क्रिडांगण व सुसज्य ग्रंथालय
३) डिजीटल वर्ग खोल्या
४) स्पर्धा परिक्षा अभ्यासिकेची सुविधा
५) विद्यार्थ्यांना ऐच्छीक विषयाची सुविधा उपलब्ध
६) विद्यार्थ्यांच्या कलागुणावर भर
७) उत्तम विद्यार्थी घडविण्यावर भर
८) पदवी प्राप्त केल्यानंतर प्लेसमेंट कॅम्पचे आयोजन.
९) भव्य क्रीडांगन आऊटडोअर जॉगींग ट्रॅक.
१०) अद्यावत संगणक कक्ष व २४ तास इंटरनेट, वायफाय सुविधा.
११) सांस्कृतिक क्रिस व संशोधन प्रदर्शन स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याकरिता महाविद्यालयाच्या पतीने विशेष सुविधा.
१२) मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती व गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या व पारितोषिके,
१३) स्पर्धा परिक्षा व मार्गदर्शन केंद्र. १४) राष्ट्रीय सेवा योजना (NSS) सुविधा उपलब्ध.
महाविद्यालयाचा नावलौकीक
१) देशपातळीवरील NAAC बेंगलोर यांच्याकडून महाविद्यालयास B+ दर्जा प्राप्त
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षणा मध्ये B दर्जा प्राप्त.
इ.५ वी ते १० वी प्रवेश देणे सुरू तसेच ११ वी, १२ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखांना प्रवेश देणे सुरू
सौ. उर्मिला पाटील
अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय शिक्षण संस्था, लोहारा
डॉ. शेषेराव जावळे पाटील
प्राचार्य शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोहारा
सौ. उर्मिला पाटील
प्राचार्य: नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालय, लोहारा